सन १९५७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
स. नं. ८०९

REFBK-0007632




स्टर्न इंडिया बुकस्टॉल पुणे २

# क्रान्तिकारक खटले

( गाजलेल्या राजकीय खटल्यांची चित्तथरारक हकीगत )

★

लेखक

भा. द. खेर, बी. ए.

★

वेस्टर्न इंडिया बुकस्टॉल, पुणें २

REFBK-0007632

# न्यायालयात प्रवेश करण्यापूर्वी —

हे सारे खटले केवळ नैबंधिक दृष्टिकोनांतून लिहिलेले नाहीत. ज्या ज्या थोर व्यक्तीला यां ना त्या कारणासाठी न्यायासनासमोर अुभें रहावे लागलें त्या त्या व्यक्तीची स्पष्ट भूमिका यां लेखमालेंतून रंगविण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. 'क्रांतिकारक खटले' याचा अर्थ केवळ 'क्रांतिकारकांचे खटले' असा मात्र कोणीं करूं नये. कारण हे सारे थोर लोक मुळांत क्रांतिकारकच होते असें नाही. जे खटले सर्वसाधारणपणे गाजले अशांचीच नोंद या लेखमालेंत केलेली आहे. तथापि अजून अनेक तत्सम खटले लिहावयांचे राहून गेले यां गोष्टीची स्पष्ट जाणीव प्रस्तुत लेखकाला आहे. अथांग सागरांतील कोणत्याहि जलबिंदूचे गुणधर्म हे समग्र सागरजलाशीं साधर्म्य पावतात या न्यायाने मी अितर अुर्वरित क्रान्तिकारकांचे खटले लिहिण्यास प्रवृत्त झालों नाही. शिवाय कांही खटले लिहिणें सद्यःस्थितींत शक्य नाही नि अिष्टहि नाही. त्यांच्यावर कालाचा हात अजून फिरावयाचा आहे. अशा परिस्थितींत त्यांचें यथायोग्य परीक्षण करणें शक्य होणार नाही.

यां क्रांतिकारकांच्याविषयी मला वाटणारा अत्यादर मीं अर्पण-पत्रिकेंत व्यक्त केलेलाच आहे. अेकाच वाक्यांत त्या क्रांतिकारकांना जर श्रद्धांजली अर्पण करावयाची असेल तर ती मी अशी करीन कीं, "ते होते म्हणून आज आम्ही आहोंत!"

२ नारायण पेठ,<br>पुणें २

भा. द. खेर

# ते होते म्हणून आम्ही आहोंत ! —

भासमान वस्तुमात्रावर आसक्ति जडविणें हा मानवी मनाचा प्रमुख गुणधर्म आहे; परंतु या दृश्य जगतापलीकडे अेक अदृश्य जगत वसंत असतें या गोष्टीची कल्पना फारच थोड्या लोकांना असते. अेखादी प्रचंड अिमारत अवलोकन केली की, मानवी मनाला हर्ष होतो. ही वस्तुस्थिति साहजिक असली तरी त्या अिमारतीला तें भव्य स्वरूप प्राप्त करून देण्यास पायांतील अदृश्य फत्तरच कारणीभूत झालेले असतात हें सत्य किती जणांना ज्ञात असतें ! किंबहुना पायांतील त्या फत्तरांनी जर आपलें अस्तित्व अज्ञाताच्या गर्तेत अर्पण केलें नसतें तर अेवढी भव्य अिमारत जगाला दिसलीच नसती. आज आपल्या भारत देशात स्वातंत्र्याची भव्य अिमारत अुभी असलेली आपणांस दिसते. परंतु ती अिमारत अुभी करण्यासाठी लक्षावधि क्रांतिकारकांना त्या अिमारतीच्या पायांत आत्मार्पण करावें लागलें. अशा स्थितींत त्या अिमारतीच्या कळसाने दिमाखानें आपलें मस्तक अुन्नत करून त्या अिमारतीच्या अस्तित्वाचें सारें श्रेय आपल्याकडे घेतलें तर तो अधिक्षेप पायांतील त्या दगडांना सहन होणार नाही. कारण कळस हें जर त्या अिमारतीचें भरतवाक्य मानलें तर पायांतील दगड ही त्या अिमारतीची नांदी होय. नांदीविना या जगांत भरतवाक्य कदापि नांदू शकणार नाही. सारांश, ही स्वातंत्र्याची अिमारत अुभी करण्यासाठी क्रांतिकारकांनी आपल्या अमोल जीवितांचा हविर्भाग त्या अिमारतीच्या पायाला स्वेच्छेने अर्पण केला आहे यांत कसलाहि संदेह नाही. म्हणून या स्वातंत्र्य-भवनाचें पूजन करतांना या साऱ्या क्रांतिकारकांचा मान हा अग्रपूजेचा मान आहे. तो यथोचित सन्मान मी त्यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण करतों.

— लेखक

# क्रान्तिकारक खटले

महालय ठाणे
७४३२

## वीराग्रणी तात्या टोपे : १

विश्वासघाताशिवाय ती गोष्ट घडलीच नसती !

जेव्हा समोरासमोर सामन्याची शक्यता संपते तेव्हाच विश्वास-घाताचा जन्म होतो. नाही तर पौराणिक कालांत कौरवांकडून द्यूताचा व्यूह रचलाच गेला नसता, पांडवांना समूळ नष्ट करण्या-साठी जतुगृहाची कल्पना संभवलीच नसती, प्रभु रामचंद्रांना दुःखाच्या खाईंत लोटण्यासाठी मारिचाला कांचनमृगाचें 'मायावी स्वरूप धारण करावेंच लागलें नसतें. तसेंच अितिहासकालांत छत्रपति शिवाजी महाराजांना आग्र्याचें निमंत्रण आलेंच नसतें, त्यांची नि अफझलखानाची अितिहासप्रसिद्ध भेट घडलीच नसती किंवा सूर्याजी पिसाळाने शत्रूला वश होअून किल्ल्याच्या चोरवाटा दाखविल्याच नसत्या. सारांश, पौराणिक कालांत काय किंवा अितिहासकालांत काय, जेव्हा जेव्हा समोरासमोर सामना देण्याची शक्यता संपुष्टांत आलेली

आहे, तेव्हाच फंदफितुरीचा – विश्वासघाताचा जन्म झालेला तुम्हांला आढळेल. नाही तर तात्या टोपे याच्यासारखा नरसिंह शत्रूच्या हातीं अितक्या सहजासहजी लागलाच नसता. जी गोष्ट अिंग्रजांच्या प्रचंड दळभाराला शक्य झाली नाही तीच गोष्ट केवळ विश्वासघाताने शक्य करून दाखविली. किंबहुना अितर सारे प्रयत्न फसले तेव्हाच कर्नल मीडने या आडमार्गाचा अवलंब केला.

मध्यरात्रीचा सुमार होता. परणच्या जंगलांत तात्या टोपे शांतपणाने झोपी गेला होता. झोप कसली, काळनिद्राच होती ती ! आपल्या साऱ्या प्रयत्नांचें वैयर्थ्य त्याला आता कळून चुकलें होतें. त्याच्यासमोर सारा अंधकार पसरला होता. बुडत्या बोटीला ज्याप्रमाणे अुंदीर देखील सोडून जातात त्याप्रमाणे त्याचे सारे मित्र त्याला सोडून गेले होते. ज्यांच्याकडे आपले हमखास मित्र या नव्या आशेने त्याने बघावें त्यांनी देखील लगेच पाठ दाखवावी, असें प्रत्यहीं घडूं लागलें. अेके काळीं त्याच्या खांद्याला खांदा लावून लढलेले लोक शत्रूच्या गोटांत प्रामुख्याने झळकूं लागले. भयंकर पर्जन्यवृष्टि व्हावी आणि जिकडे तिकडे पाण्याचा प्रचंड लोंढाच लोंढा दिसूं लागावा; परंतु लगेच कांही काळाने आकाश निरभ्र होअून पर्जन्यवृष्टि थांबावी आणि पाण्याचा लोंढा ओसरूं लागावा, त्याप्रमाणे क्रांतिकारकांच्या सैन्याची परिस्थिति झाली होती. ३१ मे १८५७ हा दिवस सामुदायिक अुठावणीचा म्हणून ठरला असतांना देखील मंगल पांडे नांवाच्या अुतावीळ तरुणाने तत्पूर्वीच अुठावणी करून आपला देह फासावर चढवला होता आणि आपल्या हौतात्म्याने त्याने जगाची धन्यता मिळविली होती. नंतर ठिकठिकाणीं क्रांतीने पेट घेतला होता आणि क्रांतीच्या त्या ज्वाला भडकत भडकत अितक्या विस्तीर्ण होत गेल्या होत्या की, त्यांमध्ये अिंग्रजांच्या अुभ्या साम्राज्याची आहुति पडण्याची वेळ समीप येअून ठेपली होती. परंतु ज्या वेगाने ही क्रांतीची लाट पसरली त्याच वेगाने तिचा हळुहळू अुपशम होअूं

लागला. ज्या लोकांचीं अंतःकरणें क्रांतीच्या महामंत्राने पेटलीं होतीं त्यांनी शेवटपर्यंत अटीतटीचा सामना दिला होता आणि आपले देह धारातीर्थीं अर्पण केले होते. जे लोक केवळ स्वार्थी हेतूने या क्रांतींत सामील झाले होते त्यांना जेव्हा पुढे स्वार्थ दिसेनासा झाला तेव्हा त्यांनी या क्रांतीकडे पाठ फिरविली होती आणि अुघड अुघड ते शत्रूला जाअून मिळाले होते. जे देशभक्त होते ते हुतात्मे ठरले आणि जे बाजारबुणगे होते ते देशद्रोह्यांच्या मालिकेंत जाअून बसले.

तरी देखील तात्या टोपे यांच्यासारख्या क्रांतिकारकांनी आपला मार्ग सोडला नाही. ज्यांना त्यांनी प्रथम शत्रु म्हणून अुघड अुघड संबोधिलें आणि ज्यांच्या विरुद्ध युद्धकुंडांत अुडी घेतली त्यांना त्यांनी अखेरपर्यंत शत्रु म्हणूनच लेखलें आणि त्या युद्धकुंडांत आपली पूर्णाहुति अर्पण केली तेव्हाच ते थांबले. तात्या टोपे यांच्यासारखे हुतात्मे अेकदा कोणतेंहि प्राप्त कर्तव्य हातीं घेतलें म्हणजे मध्येच थांबत नसतात. 'अेक तर मारीन तरी, नाही तर मरेन तरी' याच अेका कृतनिश्चयाने ते रणांगणांत अुतरतात आणि शत्रूला तरी नष्ट करतात किंवा स्वतःच नष्ट होअून वीराचें मरण पदरांत पाडून स्वर्गाची वाट सुधारतात.

केवळ याच अेका कृतनिश्चयाने ३ जून १८५८ या दिवशीं कानपूरला पेशव्यांनी प्रथम अुठावणी केली. त्या दिवसानंतर बरोबर अेक वर्षाच्या अवधींतच तात्या टोपे याने ग्वाल्हेरला अेक राज्यारोहण-समारंभ घडवून आणला. श्रीमंत रावसाहेब पेशवे हे पेशव्यांच्या सिंहासनावर पुनरपि आरूढ झाले. लगेच शिंदे सरकारच्या फुलबागेंत राजदरबार भरला. पेशव्यांचे पूर्वीचे सारे मानकरी आपापल्या स्थानांवर आधिष्ठित झाले. अितक्यांत पेशव्यांनी प्रकट केलें की, या पेशवे सरकारचे सर सेनापति म्हणून तात्या टोपे यांची नियुक्ति करण्यांत येत आहे. ही घोषणा होतांच जिकडे तिकडे टाळ्यांचा अेकच अेक गजर झाला आणि

त्या दरबारांत अुपस्थित असलेल्या मंडळींनी त्या गोष्टीला आपली संमति दर्शविली. लगेच तात्याने अधोमुख होअून सस्मित वदनाने त्या स्वागताचा स्वीकार केला; आणि आपल्या सरसेनापतींच्या पेशाला साजतील अशीं डौलदार पावलें टाकीत तो आपल्या नियुक्त स्थानावर विराजमान झाला आणि मोठ्या आत्मविश्वासाने त्याने सभेकडे अेकवार बघितलें. जणुं अुदयाचलीं आरूढ झालेला सहस्ररश्मि भास्करच विशाल विश्वाकडे आपली नजर टाकीत आहे, असा भास सर्वांना झाला. तात्या खरोखरच त्या सर्वांचा जीव की प्राण होता. श्रीमंत रावसाहेब पेशवे हे जरी सिंहासनावर आधिष्ठित झाले होते तरी तें सिंहासन वस्तुतः तात्यानेच निर्माण केलेलें होतें; आणि आता स्वनिर्मित सिंहासनाकडे तो आत्मविश्वासाने बघत होता. लगेच भालदार नि चोपदार यांच्या ललकाऱ्या सुरू झाल्या त्या कांही केल्या थांबेनात. समरवाद्यांचा अेकच अेक गजर झाला आणि तेथे अुपस्थित असलेल्या प्रत्येकाच्या अंगांत वीरश्रीचें स्फुरण होअू लागलें. कांही वीरांचे देह तर अितके फुगले की, त्यांना आपल्या बंड्यांचे बंद ढिले करावे लागले. मग तोफांची सरवत्ती सुरू झाली. जणुं साऱ्या जगाला त्या योगाने कळविण्यांत आलें की, अिंग्रजी राज्य साफ बुडालें आणि पेशवाअी पुनरपि प्रस्थापित झाली. या गोष्टीने अिंग्रजांच्या अंगाचा थरकाप अुडाला आणि त्यांना आपल्या अस्तित्वाची काळजी निर्माण झाली.

अेवढ्याने ग्वाल्हेर दरबारचें कार्य संपलें नाही. तात्या टोपे याला सरसेनापति नेमल्यानंतर त्याला त्याच्या अतुलनीय कामगिरीसाठी अेक रत्नखचित तरवार अर्पण करण्यांत आली. पुन्हा टाळ्यांचा प्रचंड गजर झाला. मग झांशीची शूर महाराणी आणि बांदेवाले नबाब यांचा यथोचित सन्मान झाला. नंतर अष्टप्रधानांची नियुक्ति झाली. त्यानंतर निरनिराळ्यां वीरांना त्यांच्या पराक्रमाबद्दल लक्षावधि रुपये वांटण्यांत आले आणि अशा तऱ्हेने पुन्हा पेशवाअी प्रस्था-

पित झाल्याची दवंडी या दरबाराच्या रूपाने पिटविण्यांत येअून हा अितिहास-प्रसिद्ध दरबार बरखास्त झाला.

परंतु क्रांतिकालांतील रंगभूमीवरचा हा अुज्ज्वल देखावा फारच जलद पालटला आणि त्या ठिकाणीं दुसऱ्या अेका भयानक प्रवेशाला प्रारंभ झाला.

झांशीच्या शूर महाराणीने आपल्या पराक्रमाची शर्थ केली आणि तिच्या पवित्र देहाबरोबरच तिची झांशी पडली. ग्वाल्हेरच्या दरबारीं सिंहासनाधिष्ठित झालेले पेशवे पराभूत झाले. ग्वाल्हेरचे शिंदे हे वस्तुतः स्वदेशाचे आणि पेशव्यांचे मित्र असायला हवे होते. परंतु स्वार्थाने अंध होअून ते खऱ्या शत्रूला मित्र समजले आणि त्याच्याच बाजूने लढले. त्याचें पारितोषक म्हणून अिंग्रजांनी ग्वाल्हेरचें राज्य पुन्हा शिंद्यांना सुपूर्त केलें.

आता मात्र खरोखरच आकाश फाटलें. अेकभावनेने पेटलेला क्रांतिकारकांचा प्रचंड गट या दुर्दैवी घटनेनंतर दुभंगला. त्या तटाला खिंडार पडूं लागलें आणि त्यांतून शत्रु आंत घुसूं लागला. या आणीबाणीच्या वेळीं तात्याने दक्षिणेकडे मोठ्या आशेने नजर टाकली. परंतु वेळच अशी आली होती की, छत्रपति शिवाजींचा महाराष्ट्र तात्याला या वेळीं पारखा झाला होता. या घटनेनंतर तात्याला दक्षिणेचा दरवाजा जो बंद झाला तो कायमचाच!

वास्तविक ज्याच्याकडे आशेने बघावयाचें तोच महाराष्ट्र अशा तऱ्हेने पारखा झाल्यानंतर तात्या हवालदिल झाला. त्याला कोणी सगासोयरा अुरला नाही. ज्याचें दैव फिरतें त्याला जिवाभावाचे मित्र देखील पारखे होतात आणि त्याचे बलहीन शत्रु प्रबल बनतात. अशा प्रकारच्या दैवाच्या फेऱ्यांत तात्या या वेळीं सांपडला होता. त्याला आता आश्रयाला स्थान अुरलें नव्हतें. त्याची हक्काची मातृभूमि, पण त्या भूमीवर शत्रूचा नंगा नाच सर्वत्र सुरू झाल्यामुळे आणि घरभेदे त्या शत्रूला अुघड अुघड मिळाल्यामुळे, त्याच भूमीचे चटके त्याला

बसूं लागले. ज्याने वास्तविक आतापर्यंत हजारो सैनिकांचे दळभार पोसले त्याला स्वतःच्या टीचभर पोटाकरिता दोन घांस अन्न वेळेवर मिळेना.

या वेळीं तात्यापुढे केवळ तीन मार्ग अुभे होते. अेक तर शरणागति पत्करून आपल्या जिवाचें रक्षण करावयाचें, किंवा अेकाकी युद्ध चालू ठेवून जीविताचा शेवट करून घ्यावयाचा, किंवा गुप्त-वेष धारण करून वनांतरीं शेवटपर्यंत पिचत आयुष्य कंठावयाचें. परंतु तात्या हा शूर वीर होता. त्याला पहिला अगर तिसरा मार्ग पत्करणें शक्य नव्हतें. त्याने मधलाच मार्ग पत्करायला हवा होता. केवळ कर्तव्या-करिता कर्तव्य करून, तें करीत असतांना आलेला मृत्यु आनंदाने पत्करणें हाच तात्याचा अेकमेव आवडता मार्ग होता; आणि त्या मार्गानेच त्याने जायला हवें होतें.

नाही तर युद्ध थांबविण्यांत तरी आता कोणता अर्थ अुरला होता? मग युद्ध सुरू करण्याची आवश्यकताच कुठे होती? आपल्या माय-देशांतील फिरंग्यांचें अुपरें राज्य नष्ट करून त्या ठिकाणीं पुनरपि स्वराज्य स्थापन करण्याकरिताच हें युद्ध निर्माण झालें होतें ना? मग फिरंग्यांचें राज्य नष्ट झालें होतें का? आणि शिवाय युद्ध थांब-विण्याचा तात्याला काय अधिकार होता? पेशवे हे त्याचे धनि; त्यांनी त्याला युद्ध करण्याची आज्ञा दिली, त्याला सरसेनापति नेमला तो काय युद्ध थांबविण्यासाठी? त्यांची तशी आज्ञा होती का?

हे सारे प्रश्न तात्याच्या मनासमोर अेकामागून अेक अुभे राहिले आणि प्रत्येक वेळीं त्याच्या अंतःकरणाच्या विशाल अवकाशांतून, 'तुला युद्ध केलेंच पाहिजे! होय; अगदी अखेरपर्यंत!' हा ध्वनि अुमटत राहिला.

अशा वेळीं गहन संकटांचा, प्रबळ शत्रूंचा, विपत्कालीं त्याला अेकटे सोडून गेलेल्या मित्रांचा, निश्चित दिसणाऱ्या अपयशाचा, किंवा आपल्या प्राणाचा, विचार तात्याला कर्तव्य नव्हता. धन्याची

आज्ञा आणि तिचें पालन या दोनच गोष्टी त्याच्यापुढे अुभ्या होत्या आणि म्हणूनच त्या वीरवराने आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली की, मी अेकटा अुरलों तरी आणि अेकटा अुरल्यावरहि कधी रणाला पाठ दर्शविणार नाही. मृत्यु प्रत्यक्ष समोर दिसत असतांना देखील कृत-निश्चयाने शत्रूसमोर अुभा ठाकेन आणि अेक तर मारीन तरी किंवा मरेन तरी! जणुं मृत्युंजयच आत्मविश्वासाने याप्रमाणे निर्धार करीत होता.

अशा तऱ्हेने कित्येक दिवस त्याने कृतनिश्चयाने शत्रूला सामना दिला. तात्याचें तें अलौकिक शौर्य पाहून प्रत्यक्ष शत्रूने तोंडांत बोट घातलें. त्याचा पाठलाग करून त्याला पकडण्यासाठी अिंग्रज सेना-पतींमध्ये अहमहमिका सुरू झाली. आपल्या वृकयुद्ध-पद्धतीने तात्याने त्या सर्वांना जेरीस आणलें. "अवघ्या नअू दिवसांत ब्रिगेडिअर पार्कला २४० मैल व तितक्याच दिवसांत ब्रिगेडिअर समरसेटला २३० मैल त्याने नाचविलें. कर्नल होम्सने वाळवंट मैदानांतून २४ तासांत ५४ मैल त्याचा पाठलाग केला; आणि ब्रिगेडिअर होनरने ४ दिवसांत त्याच्या पाठीस लागून १४५ मैलांची मजल मारली व समर-सेटने ४८ तासांत ७० मैल त्याचा पाठलाग केला. अितक्या झपा-ट्याने अिंग्रज फौजा मजला मारीत असतांना देखील तात्या टोपे त्यांच्या हातीं लागला नाही."

अशा रीतीने समोरासमोर सामन्याची शक्यता संपली; आणि अितिहासाच्या रंगभूमीवर विश्वासघाताचें अेक नवीनच नाटक सुरू झालें.

तो पाहा त्या नाटकाचा पहिला प्रवेश. कर्नल मीड आणि ग्वाल्हे-रचा सरदार मानसिंह या दोघांचा प्रवेश सुरू झालेला आहे. त्या प्रवेशाला साजेशी अशी जंगलाची पार्श्वभूमि त्यांना आयतीच लाभ-लेली आहे. आणि अशा निवांत स्थळीं त्यांच्या खलकृतीला आता लवकरच प्रारंभ होणार आहे.

आपण आता अिंग्रजांच्या पूर्णपणे तावडींत सांपडलों आहोंत,

आता आपल्या जीविताची सारी आशा संपली आहे, या भावनेने सरदार मानसिंह अगदी वेडा होअून गेला; आणि कांहीतरी करून आपला जीव वांचविण्याच्या मार्गाला तो लागला; आणि त्याला चटकन् तसा मार्ग सांपडला.

त्याची आणि कर्नल मीड याची अेकांतांत गांठ पडल्यानंतर मीड मानसिंहाला म्हणाला, "अरे, तुम्ही लोकांनी प्रस्थापित सत्ते-विरुद्ध बंड अुभारलें. आता सरकार तुमची मुळीच गय करणार नाही; आणि तुम्हांला तशी दया दाखविण्याचें आता कारणच काय अुरलें आहे ? तुम्हां लोकांना आम्ही सरसहा फांशी देणार आहोंत !"

हें अैकून आधीच भेदरलेला सरदार मानसिंह आणखीच गर्भ-गळित झाला. कर्नल मीड गप्पच होता. जणुं आपल्या बोलण्याचा त्याच्यावर कितपत परिणाम होतो आहे हें बारकाअीने तो अजमावीत होता. आता आपल्या प्राणावर बेतलीच आहे; तेव्हा अेकदा अखेरचा यत्न करून पाहावा म्हणून मानसिंह गयावया करून म्हणाला, "चुकीची माफी असावी सरकार. यापुढे आम्ही अिंग्रज सरकारशीं अिमान राखूं !"

सावज आपल्या जाळ्यांत अडकलेलें बघून कर्नल मीड थोड्या सावकाशीने म्हणाला, "पण तुम्ही बेअिमानी लोक. तुमच्या राज-निष्ठेची निशाणी काय ? पुन्हा फितलांत तर त्याला जबाबदार कोण ?"

यावर मानसिंह तत्परतेने म्हणाला, "ही माझी जान कुर्बान करतों सरकार ! माझा प्राण घ्या अगर वांचवा. तो सर्वस्वी तुमच्या ताब्यांत दिलेला आहे."

असें म्हणून मानसिंहाने आपली मान खरोखरच कर्नल मीडपुढे धरली. परंतु तो चतुर बगळा अितक्यावरच थांबला नाही. आपलें सावज आता आपल्या पूर्णपणे कह्यांत आलें आहे, याची खात्री पटून तो मान-सिंहाला म्हणाला, "अरे, तुम्ही आपले प्राण देअूं केले याची कसली अेवढी मातब्बरी ? प्रत्येक शूर शिपाअी जेव्हा शिपाअीपेशा पत्करतो

९३८८
१०।९१।१८२

तेव्हा तो आपले प्राण आधीच धडावेगळे करून ठेवीत असतो. त्यापेक्षा आमची दुसरी अेखादी महत्त्वाची कामगिरी तूं कर. ”

सरदार मानसिंहाने मीडकडे प्रश्नार्थक मुद्रेने बघितलें तेव्हा तो त्याच्या कानाशीं लागून हलक्या आवाजांत म्हणाला, “ तुमचा पुढारी – तो तात्या टोपे, त्याला पकडून आमच्या स्वाधीन कर. म्हणजे त्याच्या ओलीस आम्ही तुझे प्राण वाचवूं ! ”

या बोलण्यावर मानसिंह चमकला आणि आपली मान अेकसारखी नकारार्थीं हालवीत तो अुद्वेगाने पुटपटला, “ छे, छे ! प्राण गेला तरी तें कृत्य माझ्या हातून होणार नाही. ”

कर्नल मीड शांतपणाने म्हणाला, “ ठीक आहे तर ! मग आपले प्राण द्यायला सिद्ध हो ! ! ”

परंतु घडलें मात्र अगदी निराळें ! मनुष्यमात्राच्या अुत्कट जीवनेच्छेने अखेरीस आपलें डोकें वर काढलें. मानसिंहाला आपली ती अुत्कट अिच्छा कांही केल्या मारतां येअीना. आपल्या प्राणरक्षणार्थ तो तात्याचा म्हणजेच पर्यायाने क्रांतीचा विश्वासघात करण्यास मान्य झाला. विश्वासघाताचा त्याचा हा कांही पहिलाच प्रसंग नव्हता. यापूर्वी प्रत्यक्ष आपल्या चुलत्याला त्याने बिनदिक्कतपणाने अिंग्रजांच्या स्वाधीन केलें होतें.

मग मनाचा अेकदा निश्चय झाल्यानंतर मात्र तो आपल्या पुढील कार्याला चटकन लागला. प्रथम अिंग्रजांची शरणागति पत्करण्यासंबंधी तात्याचें मन वळविण्याचा त्याने पुष्कळ प्रयत्न करून बघितला. परंतु शरणागति आणि तात्या टोपे या दोन गोष्टी अैहिक जगांत अेकत्र नांदणें कदापि शक्य नव्हतें. त्याच वेळीं मिर्झा फेरोझशहाचें तात्याला निमंत्रणाचें पत्र आलें होतें, तेव्हा तात्या मानसिंहाला म्हणाला, “ मी आता फेरोझशहाच्या छावणींत जातों आणि विश्रांति घेतों. मला या अुरफोड धावण्याचा आता मनस्वी कंटाळा आलेला आहे. ”

यावर नीच नि स्वार्थी मानसिंह म्हणाला, "कशाला जातोस? थोडेसे शिपाअीप्यादे, कांही दारुगोळा व अल्पशी अन्नसामुग्री घेअून मीच तीनचार दिवसांत तुझ्या सहाय्याला धावून येतों. तूं मात्र तोंपर्यंत ही जागा सोडूं नकोस. कारण जंगलांतून तुझा माग काढणं फारच अवघड जातं. तेव्हा मी येअीपर्यंत अिथेच विश्रांति घे."

वीर लोक वीराच्या वचनावर तात्काळ विश्वास ठेवतात आणि तात्यासारख्या थोर पुरुषांचीं मनें सर्वसाधारणपणे निष्कपटीच असतात. तात्या त्याच्यावर विसंबला आणि निर्धास्तपणाने परणच्या जंगलांत राहिला.

दिवस मावळला आणि ७ अेप्रिल १८५९ चीं मध्यरात्र अुगवली. तात्या शांतपणाने झोंपी गेला होता. चहू बाजूंनी शत्रु पाठलाग करीत असतांना मजल दरमजल करावी लागल्यामुळे त्याचें शरीर मनस्वी थकून गेलें होतें. बिछान्यावर पडतांच तो निद्रेच्या आधीन झाला. आपलें कर्तव्य बजावल्याचा परमानंद त्याच्या मुखावर विलसत होता. कदाचित् भावी स्वराज्याचीं सुखद स्वप्नें तो बघत असावा. थोरांचीं स्वप्नेंहि थोरच!

परंतु निद्रा ही विश्वासघाताची जननी असली पाहिजे. मानसिंह त्याच्या वचनाप्रमाणे परत आला. पण विश्वासघाताची सर्व सामग्री बरोबर घेअून! आपलें पवित्र कर्तव्य पार पाडलेला तात्याचा निद्रिस्त देह पाहून विश्वासघातकी मानसिंह क्षणभर थबकला असेल. परंतु दुसऱ्याच क्षणीं त्याने कर्नल मीडला आंत आणून झोपलेला तात्या त्याला दाखवला. त्या वेळीं कर्नल मीडचा आनंद गगनांत मावेनासा झाला. जें कृत्य त्याला समोरासमोर समरांगणांत करतां आलें नाही तें त्याने अशा आडमार्गाने साधून घेतलें. तात्या झोपला होता तरी कर्नल मीडला त्याची जबरदस्त जरब बसली होती. त्याने त्याला तशाहि स्थितींत प्रथम निःशस्त्र केलें आणि मग मोठ्या बहादुरीचा आव आणून अेखाद्या शिकारी

कुत्र्याप्रमाणे त्याने त्या निद्रिस्त सिंहावर झडप घातली. तात्या खडबडून जागा झाला. परंतु वेळ गेली होती. पिंजऱ्यांत सिंह केव्हाच अडकला होता.

दुसरे दिवशीं त्याला सिप्री येथे कर्नल मीडच्या छावणींत हजर करण्यांत आलें. जेव्हा त्याला पकडून आणलें तेव्हा त्याच्याजवळ अेक तरवार, अेक कुकरी व ११८ मोहोरा असलेली पिशवी सापडली. ज्या वेळीं सिप्री येथील भव्य लष्करी गोटांत त्याला आणलें तेव्हा तो अगदी शांत दिसत होता. त्याच्या धनुष्याकृति भिवया, काळेभोर डोळे, दाढीमिशा व कल्ले यांमुळे त्याचा चेहरा फारच रुबाबदार दिसत होता. कोणत्याहि प्रकारचें भय त्याच्या चेहेऱ्यावर दृग्गोचर होत नव्हतें. विश्वासघाताने कां होअीना, पण आपण आता अिंग्रजांच्या तावडींत सांपडलों आहोंत, तेव्हा आपलें आता काय होणार हें तात्याला पुरतेपणीं कळून चुकलें होतें. त्याला आता न्यायासनासमोर अुभे राहण्याची मुळीच अिच्छा नव्हती. त्याची चौकशी पूर्ण होण्यापूर्वी त्याला त्याच्यावरील आरोप सांगण्यांत आला; आणि "तुला तुझ्या बाजूने कांही साक्षीपुरावा द्यावयाचा आहे काय?" असें त्याला विचारण्यांत आलें. तेव्हा तात्याने स्पष्ट शब्दांत सांगितलें, "तुमच्याविरुद्ध मी युद्धाचा खेळ खेळलों आहें म्हणून तुमचें कोणतेंहि न्यायालय मला नको आहे. त्या न्यायालयापुढे अुभे राहण्याची मला बिलकूल अिच्छा नाही; आणि त्यामध्ये मला कोणत्याहि प्रकारचा भागहि घ्यावयाचा नाही."

आपले शृंखलाबद्ध हात वर करून तात्या पुढे म्हणाला, "आता मला अेकच आशा आहे. ती :ही की, या शृंखलांपासून मुक्त होण्याकरिता मला अेकतर तोफेच्या तोंडीं देअून अुडवून द्या किंवा फासावर तरी टांगून मला नष्ट करा!"

हें बोलतांना त्याच्या मुखावर केवढा आत्मविश्वास दृग्गोचर होत होता! कारण त्याने आपलें पवित्र कर्तव्य पुरेपूर बजावलें होतें; आणि

तो आता मृत्यूला सिद्ध झालेला होता. परंतु तेवढ्याने त्याची पुरती विटंबना होणार नाही म्हणूनच की काय इंग्रजांनी त्याच्या चौकशीचें नाटक सुरू केलें आणि तें यथासांग पार पाडलें. छावणींतच लष्करी न्यायालय स्थापण्यांत आलें; व त्या न्यायालयासमोर तात्याची चौकशी सुरू झाली. इंग्रजांच्या प्रस्थापित सत्तेविरुद्ध बंड केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यांत आला.

तात्याने त्या न्यायालयासमोर फारच विस्तृत जबानी सादर केली. इंग्रजांनी विनंती केल्यावरून लढाओंतील आपल्या बारीक हालचालींचा तपशीलहि तात्याने न्यायालयासमोर निवेदन केला. ही त्याची जबानी जितक्या स्पष्टपणाने तितक्याच धीरोदात्तपणाने त्याने कथन केलेली आहे. लष्करी न्यायासनासमोर त्याने पुढील आशयाचें भाषण केलें.

तो म्हणाला, "माझें नांव तात्या टोपे. वडिलांचें नांव पांडुरंग. आम्ही मूळचे नगर पातोडा जिल्हा, जोल परगणा येथे राहणारे. अलीकडे बिठूर अगर ब्रह्मावर्त येथे आमची वस्ती असे. माझें वय अदमासे पंचेचाळीस वर्षांचें असून नानासाहेब पेशव्यांच्या खाजगीकडे माझी नेमणूक आहे."

येथपर्यंत मोठ्या शांतपणानें तो बोलला. पुढे हळुहळू त्याचा आवाज चढूं लागला आणि त्याच्या अंगांत आवेश अुत्पन्न झाला. तो म्हणाला, "मी जें जें काय केलें तें माझ्या स्वामीच्या आज्ञेनुसार केलें. काल्पीपर्यंत आणि त्यानंतरहि मी श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या आज्ञा शिरसावंद्य मानल्या. प्रत्यक्ष रणक्षेत्रावर जें जें विहित होतें तें तें मी केलें. परंतु रणक्षेत्राबाहेर मी अगर माझ्या धन्याने युरोपीय पुरुष, स्त्री अथवा मूल यांच्या केसालाहि कधी धक्का लावलेला नाही."

थोडा वेळ थांबून त्याने पुन्हा बोलण्यास प्रारंभ केला. तो म्हणाला, "मी अिंग्रजांचा सेवक कधीच नव्हतों. त्यामुळे मी बंडखोर कसा

ठरेन ? माझा जन्म अिंग्रजी राज्यांत झालेला नाही आणि त्यामुळे अिंग्रजांशीं राजनिष्ठ राहण्याची शपथ वाहण्याचें मला कारणहि पडलें नाही. मी पेशव्यांचा नोकर. ते माझे न्याय्य धनी. मी त्यांच्या अन्नावर पोसलों; त्यांच्या अन्नावरच लहानाचा मोठा झालों. तेव्हा त्यांच्याशीं राजनिष्ठ राहणें हें माझें पवित्र कर्तव्य होतें आणि तें मी पूर्णपणे पार पाडलें आहे. पेशव्यांचें राज्य छिनावण्याचा अिंग्रजांना कोणताच न्याय्य अधिकार नव्हता. त्यामुळे आपलें गेलेलें राज्य परत प्राप्त करून घेण्याचा पेशव्यांनी चंग बांधला आणि अिंग्रजांविरुद्ध त्यांनी रणशिंग फुंकलें. मी लगेच त्यांच्या — माझ्या धन्याच्या — निशाणाखाली येअून दाखल झालों. केवळ त्यांच्याच आज्ञा मी पालन केल्या आणि खऱ्या अर्थाने माझी स्वामिभक्ति मी बजावली. पेशव्यांचा अेकनिष्ठ नोकर म्हणून माझें तेंच अेक पवित्रतम कर्तव्य होतें. पेशव्यांच्या आज्ञेनुसार व पेशव्यांचा अेक प्रतिनिधि या नात्याने मी अिंग्रजांशीं अुघड अुघड युद्ध केलें व समोरासमोर अनेक सामने दिले. युद्धांत जें जें न्याय्य असतें तें तें मीं केलेलें आहे. मी शपथपूर्वक सांगतों की, मी कोणाचा कधी घातपात केला नाही किंवा अिंग्रजांच्या बायकामुलांची हत्या केली नाही. दुर्दैवाने युद्धांत माझा पराभव झाला आणि मी तुमच्या हातीं लागलों. म्हणून मी अपराधी ठरूं शकत नाही. वस्तुतः शत्रूचा सेनापति हातीं लागल्यानंतर तुम्ही त्याच्याशीं सन्मानाचें वर्तन ठेवावयास हवें. माझ्या बाबतींत तुमच्याकडून मी तीच अपेक्षा करतों. कारण रणांतील जयापजय हा केवळ दैवाचा खेळ आहे. माझ्या दैवाचा फासा अुलटा पडला म्हणून माझ्याकडे जिताची भूमिका आली आणि तुम्ही जेते ठरलांत. परंतु केवळ त्यामुळेच तुम्ही शूर ठरत नाही. जें युद्ध होतें तें शूरांमध्येच होतें आणि म्हणून जेत्या शूराने जित शूराला यथायोग्य सन्मानून गौरविलेंच पाहिजे. मी तुमचा प्रजानन कधीच नव्हतों आणि नाहीहि ! मी पेशव्यांचा

चाकर नि प्रजानन आहें. ते माझे राजे आहेत. तेव्हा त्यांच्याविषयी मी माझी स्वामिभक्ति नि राजनिष्ठा व्यक्तविली. त्यांच्या न्याय्य आज्ञा मी पालन केल्या. माझें कर्तव्य संपलें. तेव्हा तुमचा मजवर लादलेला बंडाचा आरोप मला मुळीच मान्य नाही. तो मला बिलकूल लागू पडत नाही."

तात्याने दिलेली जबानी त्याला पुन्हा वाचून दाखविण्यांत आली. ती त्याने मान्य केल्यानंतर त्याखाली तात्याने अिंग्रजीमध्ये आपली स्वाक्षरी केली.

नंतर कर्नल मीडने तात्याच्या या अितिहासप्रसिद्ध जबानीखाली पुढील मजकूर लिहिला.

"मुशैरी छावणींत आरोपी कैदी तात्या टोपे यांनी ता. १० ओप्रिल १८५९ रोजीं सदर जबानी राजिखुषीने दिली." या मजकुराखाली कर्नल मीडने आपली स्वाक्षरी केली आणि तो धन्यता पावला. अशा तऱ्हेने ओप्रिल महिन्याच्या मध्यावर हें चौकशीचें नाटक तीन दिवस चालून संपलें.

ओप्रिल १८ हा दिवस अुजाडला. अिंग्रजांच्या सैनिकी न्यायालयाने तात्याविरुद्ध बंडाचा आरोप शाबीत धरून त्याला फाशीची शिक्षा फर्मावली. १८ ओप्रिल १८५९ रोजीं दुपारीं चारचा सुमार होता. अिंग्रजांची तिसरी बंगाल सैनिक तुकडी सिद्ध झाली. त्या तुकडीच्या ताब्यांत तात्याला देण्यांत आलें. त्या सैनिकांच्या सक्त पहाऱ्यांत मोठ्या धीरोदात्तपणाने मंद मंद पावलें टाकीत तात्या वधमंचकाकडे चालला होता. वधस्थलापाशीं आल्यानंतर सैनिकांनी त्याच्या भोवती गराडा दिला. पायदळ सैनिक, घोडदळ सैनिक नि अितर सहस्त्रावधि लोकांची गर्दी तात्याचें अंत्यदर्शन घेण्यासाठी अुसळली.

आज तात्या अेकटाच गतप्राण होणार नव्हता. तर देशांतील सहस्त्रावधि लोकांचे प्राण तो आपल्याबरोबर घेअून जाणार होता.

त्या सर्व लोकांचें प्रतिनिधित्व पत्करून तो परलोकीं गमन करणार होता. तात्यासारखे जे हुतात्मे असतात त्यांचें सारें आयुष्य हें खरोखर प्रतीकात्मक स्वरूपाचें असतें. त्यांच्या मातृदेशांतील लोकांच्या ज्या प्रबल देशभावना असतात त्या या हुतात्म्यांच्या रूपाने स्फुरतात अेवढेंच ! कांही लोकांच्या अंगीं केवळ दुबळेपणामुळे त्या देशभावनांचा आविष्कार होअूं शकत नाही. तो आविष्कार तात्यासारख्या हुतात्म्यांच्या अंगांत प्रकर्षाने होअूं शकतो. कारण ते धैर्याचे मेरूमणी असतात. सारांश, धैर्याभावी विवक्षित भावनांचा आविष्कार कांही लोकांच्या ठिकाणीं झाला नाही तरी तो सुप्त रूपाने त्यांच्या अंगीं वसत असतो ही गोष्ट मात्र निश्चित !

आणि असेच लोक आज त्या ठिकाणीं जमले होते. वस्तुतः तात्याच्या मानेभोंवतीं जरी दोरीचा फास बसणार होता तरी त्याचें दुःख मात्र तेथे जमलेल्या सहस्रावधि लोकांना जाणवणार होतें. कारण त्यांचें प्रतिनिधित्व पत्करून ज्या महान् कार्यासाठी तात्या रणांत शत्रूविरुद्ध अुभा ठाकला होता तें महान् कार्य तात्याबरोबरच आज तरी नष्ट होणार होतें. पुढे मग तात्यासारखा बलिष्ठ नेता जन्म पावून त्याच्या संजीवनी मंत्राने जेव्हा स्वातंत्र्यसंपादनाच्या त्या महान् कार्याला पुनरपि चेतना येअील तोपर्यंत थांबणें त्यांना प्राप्त होतें. त्यांच्यापैकी खरोखर जे वृद्ध असतील त्यांच्या अंतःकरणांतून त्या आशेचा धागा समूळ नष्ट होअून गेला असेल. जे तरुण असतील त्यांचीं मनें आपल्याला तो 'सोनियाचा दिवस' प्राप्त होण्यास आणखी किती काल थांबावें लागेल या आशंकेने भारावून गेलीं असतील. खरोखर मोठा हृदयद्रावक देखावा होता तो ! जणुं तात्याच्या रूपाने देशाचा प्राणच आज नष्ट होणार होता.

परंतु तात्या मात्र शांत – अगदी शांत दिसत होता. कसल्याहि प्रकारची धास्ती त्याच्या चेहेऱ्यावर वसत नव्हती. अुलट स्वकर्तव्यपालनाच्या आनंदाने त्याचे काळेभोर नेत्र अधिकच चमकत होते;

आणि त्याच्या मुखावर अेक प्रकारचें अपूर्व तेज विलसत होतें.

वधस्तंभासमोर आणल्यानंतर त्याच्यावरचा आरोप त्याला पुन्हा वाचून दाखविण्यांत आला; आणि त्या आरोपासाठी त्याला फांशीची शिक्षा दिल्याचें सांगण्यांत आलें. हें झाल्यानंतर त्याच्या पायांतील जड शृंखला तोडण्यांत आल्या आणि त्याची शेवटची अिच्छा त्याला विचारण्यांत आली. आपली शेवटची अिच्छा प्रदर्शित करतांना तात्या म्हणाला, " मी ज्या गोष्टी केल्या त्या माझ्या वैयक्तिक जबाबदारीवरच केलेल्या आहेत. माझ्या या कृत्यांशीं ग्वाल्हेरीला असलेल्या माझ्या कुटुंबाचा अगर वृद्ध वडिलांचा कसल्याहि प्रकारचा संबंध पोचत नाही. तेव्हा कृपा करून तुम्ही माझ्या करिता माझ्या कुटुंबाला अगर वृद्ध पित्याला कोणत्याहि प्रकारे त्रास देअूं नका. "

ही अेकमेव अिच्छा व्यक्त करतांना तात्याचें अंतःकरण तिळतिळ तुटलें असेल. परंतु या अिच्छेव्यतिरिक्त मात्र त्याने दुसरी कोणतीहि अिच्छा व्यक्तविली नाही.

पायांतील शृंखला तोडल्यानंतर तात्या धीरगंभीरपणाने वधमंचकावर चढला. नेहमीच्या रिवाजानुसार तात्याचे हातपाय बांधण्यासाठी फांशी देणारे मांग वर आले; तेव्हा तात्या त्यांच्याकडे पाहून शांतपणाने हसला आणि म्हणाला, " छे; असल्या औपचारिक विधींची मुळीच आवश्यकता नाही ! "

अेवढें बोलून लगेच तात्याने आपली मान स्वतःच फासांत अडकविली. फास हळुंहळूं आवळत गेला. पायाखालील ठोकळा अुडाला आणि दुसऱ्याच क्षणीं या हुतात्म्याचा अमर आत्मा अनंत अंतराळांत क्रांतीच्या मागे धावून गेला; आणि तात्याचा पार्थिव देह तेवढाच फांशीच्या खांबावर लोंबकळत राहिला. तात्याच्या पार्थिव देहांतून रक्त बाहेर पडलें आणि त्याचबरोबर देशांतील महान् क्रांति विकलांग होअून जमीनदोस्त झाली. अशा तऱ्हेने अिंग्रजांचा प्रबळ शत्रु आणि क्रांतीचा महान् मित्र या विश्वांतून नाहीसा झाला.

सूर्यास्तापर्यंत तात्याचें निष्प्राण शरीर फांशीच्या खांबावर लटकत होतें. भोंवतालचें रक्षक सैन्य जेव्हा हें पवित्र कार्य (?) पार पाडल्यानंतर निघून गेलें, तेव्हा हजारो इंग्रज स्त्री-पुरुषांनी तात्याची स्मृति म्हणून त्याच्या केसांचे झुबके काढून घेतले. ती स्मृति जरी त्यांनी प्राप्त करून घेतली नसती तरी तात्याने इंग्रजांना आपल्या अतुल पराक्रमाची पुरेपूर स्मृति यापूर्वीच देऊन ठेवली होती; आणि दैवाचा फासा जर त्याला अनुकूल पडता तर ती स्मृति इंग्रजांच्या अेकच नव्हे तर पुढील सात पिढ्यांना पुरून उरली असती.

पण – पण स्वदेशबांधवाच्या अंतःकरणांतच विश्वासघाताचा जन्म झाला आणि १८५७ च्या मे महिन्यांत तात्यासारख्या देशवीरांनी विश्वासाने पेटविलेली क्रांतिज्योत सरदार मानसिंहाच्या विश्वासघाताने विझविली गेली ती कायमचीच! निदान त्या वेळेपुरती तरी!

## आद्य क्रान्तिकारक वासुदेव बळवंत : २

तें खचित स्वप्न नव्हतें! किंबहुना तें जर स्वप्न असतें तर हिंदुस्थानच्या अितिहासाचा रंग कदाचित् पार पालटला असता. वस्तुतः स्वप्नाला साजेशी पार्श्वभूमि निसर्गाने निर्माण केली होती. मध्यरात्रीचा सुमार होता. आकाश काळ्याकुट्ट मेघांनी गच्च भरून गेलें होतें आणि प्रलयकालाच्या मुसळधार पर्जन्यवृष्टीला प्रारंभ झाला होता. अंधार अितका काळाकुट्ट पडला होता की, त्यामध्ये वस्तुमात्राचें अस्तित्वहि जाणवत नव्हतें. बेडुक नि रातकिडे यांनी ओरडून ओरडून आसमंत अगदी बेजार करून सोडलें होतें; आणि त्यांतच कोल्हेकुअीचा आवाज मिसळल्यामुळे आज खचित कांही तरी अशुभ घडणार याविषयी शंका अुरली नव्हती.

परंतु निसर्गाच्या या भीषण स्वरूपाने वासुदेव बंळवंतांची झोप मुळीच चाळवली गेली नाही. जणुं त्या रात्रीं त्यांना काळनिद्राच लागली होती.

आणि खरोखर त्यांची ती काळनिद्राच ठरली! अेखाद्या हट्टी शिकाऱ्याने अेखाद्या वनराजाचा अविरत पाठलाग करावा त्याप्रमाणे मेजर डॅनिअलने त्यांचा अेकसारखा पाठलाग केला होता. अिंग्रज सरकारचें सारें लक्ष वासुदेव बळवंतांच्यावर केंद्रीभूत झालें होतें. या गोष्टीला तसेंच सबळ कारण होतें. अिंग्रज सरकारचें राज्य साफ बुडवून पुनरपि पेशवाअीची प्रस्थापना करण्याकरिता पुण्याच्या ब्राह्मणांचा कट चालू आहे, अशी मुंबअी सरकारची प्रबळ भावना झालेली होती. आणि त्या कटाचे वासुदेव बळवंत हे सूत्रधार आहेत याचीहि निश्चिति मुंबअी सरकारने आपल्या मनाशीं करून ठेवली होती. तेव्हा वासुदेव बळवंत हे या सर्व कटाचे अध्वर्यु असल्यामुळे त्यांना पकडून आणल्याशिवाय या कटाचा नायनाट होणें शक्य नाही, असा

सुस्पष्ट विचार करून सरकारने त्यांना पकडण्यासाठी कंबर कसली. वासुदेव बळवंतांना पकडून देण्यासाठी मोठमोठालीं अिनामें जाहीर करण्यांत आलीं. तशा प्रकारचे जाहीरनामे ठिकठिकाणीं लावण्यांत आले आणि याशिवाय पुण्याचा पोलीस प्रमुख मेजर डॅनिअल याची या कामावर नियुक्ति करण्यांत आली.

लगोलग तो आपल्या कामाला लागला. दशदिशांनी त्याचीं शोध-चक्रें फिरूं लागलीं. परंतु आपल्या कामांत यश मिळण्याचें चिन्ह त्याला कांही केल्या दिसेना. तो दिवसेंदिवस निराश होअूं लागला.

परंतु अेके दिवशीं अचानकपणाने डॅनिअलच्यापुढे आशेचा किरण चमकला!

त्याला खात्रीलायक बातमी लागली की, वासुदेव बळवंतांचा मुक्काम सध्या गाणगापुरांत आहे!

ही बातमी कशा तऱ्हेने लागली ही अेक मनोरंजक परंतु तित-कीच अुद्वेगजनक अशी हकीगत आहे. श्रीशैल मल्लिकार्जुन येथील आपला मुक्काम हालवून वासुदेव बळवंत श्रीदत्ताची सेवा करण्याच्या अिरादाने गाणगापुराकडे निघाले. वाटेंत बयाबाअी जोशी नांवाच्या अेका स्त्रीच्या घरीं त्यांचा मुक्काम पडला. वासुदेव बळवंतांच्या अेकंदर राजकीय हालचालींचें वर्तमान त्या स्त्रीच्या कानावरं आलेलें नव्हतें. त्या स्त्रीच्या घरीं आपलें दुपारचें भोजन आटोपून वासुदेव बळवंत मार्गस्थ झाले. सायंकाळीं ती बाअी देवदर्शनासाठी देवळांत गेली. त्या ठिकाणीं नेहमीप्रमाणे अनेक स्त्रिया देवदर्शनासाठी आल्या होत्या. त्यांच्याशीं सहज बोलतां बोलतां बया-बाअी जोशी या स्त्रीने वासुदेव बळवंत आज आपल्याकडे जेवावयास आले होते असें सांगितलें. झालें! अेखाद्या दारूच्या कोठारांत ठिणगी पडल्यानंतर जसा प्रचंड स्फोट व्हावा त्याप्रमाणे वासुदेव बळवंतांची हकीगत कर्णोपकर्णी झाली. त्या स्त्रियांमध्ये अेका पोलीस शिपायाची बायको होती. वासुदेव बळवंतांच्या अटकेसाठी सरकारने मोठें अिनाम

जाहीर केलें आहे ही गोष्ट त्या बाआीला ठाअूक होती. तिने लगेच ती गोष्ट आपल्या नवऱ्याच्या कानावर घातली. आपल्या या साध्या कृतीने आपण आपल्या मायदेशाचा किती दारुण घात करीत आहोंत या गोष्टीची त्या स्त्रियांपैकी कुणालाहि कल्पना आली नाही. परंतु दैवाने दावा साधला खरा. त्या पोलिसाने अेकाहि क्षणाचा विलंब न करतां ती हकीगत मेजर डॅनिअलला कळविली. ती हकीगत कळ-तांच त्याला पुन्हा आशेचा किरण दिसूं लागला आणि तो गाणगा-पूरच्या मार्गाकडे चालता झाला.

वासुदेव बळवंत गाणगापुरास येअून दाखल झाले तेव्हा त्यांना या गोष्टीची गंधवार्ताहि नव्हती. परंतु त्यांच्या कांही मित्रांना सर-कारी हालचालीचा संशय आला आणि त्या मित्रांनी वासुदेव बळ-वंतांना तसा स्पष्ट अिशारा दिला.

अेकाहि क्षणाचा विलंब न करतां वासुदेव बळवंतांनी गाणगापूर सोडलें. परंतु त्याच वेळीं त्यांचें सुदैवाहि त्यांना सोडून गेलें. सर्व बाजूंनीं ते दुर्दैवाच्या फेऱ्यांत अडकले. याच वेळीं त्यांना ज्वराने पछा-डलें. त्यांना रोज जोराचा ताप येअूं लागला आणि अशा स्थितींत शत्रूला मागे टाकून ते भराभर मजला मारूं लागले.

अखेरीस १८७९ सालाचा जुलै महिना अुजाडला. दर-रोज त्यांच्या मजला अेकसारख्या सुरूच होत्या आणि त्यांचा पाठलागहि थांबला नव्हता. अशा स्थितींत जुलै महिन्याच्या अखेरीस ते विजापूर जिल्ह्यांतील देवरनावडगी या गांवीं येअून दाखल झाले. ते आता मनस्वी थकले होते. ज्या दिवशीं त्यांनी या गांवांत प्रवेश केला त्या दिवशीं तर त्यांच्या पोटांत अन्नाचा अेक कणहि गेला नव्हता. अंगांत ताप नुसता फणफणत होता. अुपासामुळे पित्त खुस-ळलें होतें. शरीर तर अगदी थकून गेलें होतें. त्यांना आता विश्रांतीची आवश्यकता होती. कुठे तरी निवांतपणाने ती रात्र काढण्याचें त्यांनी ठरविलें. देवरनावडंगीजवळच्या अेका डोंगरांत बुद्धाचा भव्य विहार

होता. त्या ठिकाणीं श्रान्त झालेले वासुदेव बळवंत आपल्या साठे नांवाच्या सहकाऱ्यासमवेत जाऊन दाखल झाले. अंथरुणावर अंग टेकतांच ते निद्राधीन झाले. मात्र अशा वेळीं त्यांच्यासारख्या क्रांतिकारकानें सशस्त्र असण्याची जी दक्षता घ्यायला हवी होती ती त्यांनीं पुरेपूर घेतली होती. आपली ओळख पटूं नये म्हणून आपल्या विपुल दाढीवरून त्यांनी आपला फेटा लपेटला होता.

परंतु घात होण्याची वेळ समीप येऊन ठेपली होती. थोड्याच वेळांत या आद्य क्रांतिकारकाचें दैव संपुष्टांत येणार होतें आणि त्याच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या परमपवित्र प्रयत्नांना तिलांजलि मिळणार होती.

कोणत्याहि प्रकारची क्षिति न बाळगतां मेजर डॅनिअलने त्या बुद्धाच्या विहारांत प्रवेश केला आणि आपलें सावज आपल्या पुरेपूर आवाक्यांत आलेलें आहे असें पाहून त्यानें वासुदेव बळवंतांच्या विशाल छातीवर मांड मांडली. जणुं निद्रिस्त सिंहराजाच्या छातीवर लांडग्यानें आसन ठोकलें! केवढें हें त्याचें शौर्य! आणि त्या शौर्या-बद्दल (!) त्याची जगभर झालेली केवढी ती प्रशंसा! ब्रिटिश राज्याला 'त्राहि भगवन्' करून सोडणाऱ्या त्या क्रांतिसिंहाला निद्रिस्त स्थितींत कां होईना, पण पकडलें हा काय लहानसहान पराक्रम होता? आणि डॅनिअलने देखील त्याच्या ख्रिस्ती परंपरेला साजेल असाच पराक्रम केला नव्हता का? भारतांतील क्रांतिकारकांच्या धुरीणाला–त्या तात्या टोपेला–त्याच्या ख्रिस्ती पूर्वजांनी अशाच निद्रिस्त परिस्थितींत पकडला नव्हता का?

अर्धवट निद्रिस्त अवस्थेत आपल्या छातीवर बसलेल्या मेजर डॅनि-अलला बघून वासुदेव बळवंतांना तें स्वप्न वाटलें. आतापर्यंत त्यांना स्वदेशाच्या स्वातंत्र्याचीं अनेक लोभनीय स्वप्नें पडलीं होतीं. तशा प्रकारचीं स्वप्नें त्यांना केवळ निद्रिस्त अवस्थेंतच नव्हेत, तर एखाद्या योग्याप्रमाणे जागृतावस्थेंतहि पाहिलीं होतीं – नव्हे अनुभविलीं होतीं.

आताचें हें स्वप्न कदाचित् स्वातंत्र्य-विध्वंसनाचें असेल असें त्यांना प्रथम वाटलें. जेव्हा माणसाला अेखाद्या प्रिय गोष्टीचा निदिध्यास लागतो, तेव्हा क्वचित् प्रसंगीं त्या गोष्टीच्या अतिप्रेमानें त्या गोष्टीचा विध्वंस तर होणार नाहींना, अशा प्रकारचा धसका माणसाला अेकसारखा वाटत राहतो. तशा प्रकारचा तर हा धसका नव्हता ना? जन्मापासून आपल्या मातृभूमीचें स्वातंत्र्य आपण प्रिय मानलें. जेव्हा तेव्हा त्याच स्वातंत्र्याचा ध्यास आपल्या मनाला आपण लावून घेतला आणि आता तें स्वातंत्र्य नष्ट झालेलें तर आपणाला दिसत नाही ना? त्या स्वातंत्र्याच्या विध्वंसनाचें तर हें स्वप्न नव्हे ना?

परंतु तें खचित स्वप्न नव्हतें! –

तर जें स्वातंत्र्य-स्वप्न वासुदेव बळवंतांनी आपल्या अुराशीं अहर्निश बाळगलें होतें त्या स्वप्नाचा तो भंग होता. भंगलेल्या अवस्थेंत त्यांचें स्वप्न त्यांच्यापुढे अुभें होतें. त्या काळ्याकुट्ट रात्रीं त्यांच्या त्या अुज्वल स्वप्नाचा जो घात झाला तो कायमचाच!

वासुदेव बळवंतांना जेव्हा खरा प्रकार कळून आला तेव्हा त्यांची निद्रा साफ अुडाली. मेजर डॅनिअलच्या रूपानें त्यांच्यापुढे प्रत्यक्ष मृत्यु अुभा होता. परंतु ते मुळीच डगमगले नाहीत. त्यांना 'शरण ये' म्हणून सांगणाऱ्या आणि त्यांच्या छातीवर बसलेल्या डॅनिअलला ते म्हणाले, "अरे, तूं शूर आहेस; तेव्हा अेकाअेकी येअून निद्रिस्त स्थितींत मला तूं अटक केलीस ही खचित शौर्याची गोष्ट झाली नाही. तुझे आणि माझे दोन अुघड हात होअून त्या झटापटींत जर तूं मला धरलें असतेंस तर मी तुला शूराचा बच्चा समजलों असतों. थांब, अजूनहि वेळ गेली नाही. अद्यापि तुझी छाती असेल तर तूं मला मुक्त कर. आपण द्वंद्वयुद्ध करूं. तूं माझा पराभव करून विजयी झालास तर मी खुशाल तुझ्या स्वाधीन होअीन!"

जणु अनंत आकाशांत वीज कडाडली आणि आपण आता भस्म-

सात् होऊन जाऊं असें त्या वेळीं डॅनिअलला वाटलें. तो कांहीच न बोलतां नुसता हसला.

लगेच त्यांच्या हातापायांत बेड्या ठोकण्यांत आल्या. चावडीवर नेल्यानंतर त्यांची झडती घेण्यांत आली. ही झडती पहांटेपर्यंत चालली होती.

त्यानंतर गाणगापुरांत अटकेचें आणि झडतीचें सत्र सुरू झालें; आणि वासुदेव बळवंतांना पुण्यांत आणण्यांत आलें. त्यांची प्रकृति क्षीण झालेली होती. ताप त्यांची पाठ सोडीत नव्हता. त्यांचें मनहि खचलें होतें. त्यांतच तपासाच्या नांवाखाली पोलिसांनी त्यांचा अनन्वित छळ आरंभिला; आणि या छळांतून मुक्त होण्यासाठी त्यांना त्यांच्यापुढे अेकच मार्ग दिसूं लागला.

आत्महत्या ! –

आत्महत्या करून होणाऱ्या अनन्वित छळाचा अंत करावा असें त्यांना वाटूं लागलें तेव्हा ते मनांतून खास दचकले असतील. आपण वासुदेव बळवंत फडकेच आहोंत ना ? हा प्रश्न त्यांनी आपल्या मनाला पुनःपुन्हा विचारला असेल; आणि त्याला कारणहि तसेंच होतें.

या आत्मघातकी विचारांत सर्वस्वी बुडालेले वासुदेव बळवंत फडके आणि ब्रिटिश सरकारची पांचावर धारण बसविणारे फडके यांच्यामध्ये खरोखर केवढी तफावत होती ! त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांच्याच आयुष्यांतील अनेक चित्ताकर्षक प्रसंग अुभे राहिले.

त्यांपैकी अेक प्रसंग तर नुकताच घडलेला होता. त्या दिवशीं श्रीक्षेत्र गाणगापुराहून ते संगम येथे येअून दाखल झाले होते. मेजर डॅनिअल याने त्यांचा अेकसारखा पाठलाग चालविला होता. त्याला कांहीहि करून झुकांडी देणें आवश्यक होतें. त्यांनी क्षणभर विचार करून सभोवार नजर टाकली. अेका बाजूला भीमा नदी दुथडी भरून वाहात होती. जणूं आव्हान देअून ती त्यांना सांगत होती, "तुझी वेळ आता भरली आहे. मुकाट्यानं तूं शत्रूच्या स्वाधीन हो !" तें

आव्हान अैकून त्या वीरपुरुषाच्या बाहूंत स्फुरण आलें, डोळ्यांत तेज चमकलें आणि अंगांत त्वेष चढला. साऱ्या तीरावर अेकुलती अेक नाव अुभी होती. मनांत दुर्दमनीय अुत्साह अुभा करून त्यांनी त्या नावेच्या धन्याला तीरापलीकडे नेण्याबद्दल विचारलें. परंतु होडीच्या साहाय्यानें देखील नदीपार होण्याचें धैर्य त्या नावाड्याला होअीना. तेव्हा आपल्या अंगांतील सारें बळ अेकवटून वासुदेव बळवंत त्या नावाड्याला म्हणाले, "तूं जर आम्हाला पलीकडच्या तीरावर नेणार नसशील तर या अथांग वाहणाऱ्या नदींत अुडी झोकून आम्ही पलीकडे जाणारच जाणार! मग जें काय व्हायचं असेल तें होवो!"

जणू मूर्तिमंत शूरत्व जन्माला येअून दुथडी भरून वाहत चाल-लेल्या त्या भीमा नदीला त्यांच्या रूपाने आव्हान देत आहे असा भास त्या दिवशीं झाला.

असे अेक कीं दोन. त्यांच्या आतापर्यंतच्या अुज्ज्वल आयुष्यांत असे अनेक चित्ताकर्षक प्रसंग घडले होते. त्यावेळीं प्रत्यक्ष मृत्यु त्यांना भेदरला होता आणि त्यांच्यापासून लांब पळून गेला होता.

आणि त्या दिवशीं रात्रीं हा शूरांचा राजा, क्रांतिकारकांचा शिरोमणि आत्महत्या करूं अिच्छीत होता.

आत्महत्या करून ते कोणती गोष्ट साधणार होते? त्यांना शरीराच्या यातना सहन होत नव्हत्या आणि आत्महत्या करून त्या यातना विराम पावतील अेवढाच त्यांचा त्यांत हेतु होता ना? आपल्या देशाच्या स्वातंत्र्यार्थ झटणाऱ्या देशभक्ताला आपल्या हातीं सतीचें वाण घ्यावें लागतें ही गोष्ट त्यांना माहीत नव्हती का? मग वर निर्दिष्ट केलेल्या हेतूशिवाय आत्महत्या करण्यांत त्यांचा दुसरा कोणता हेतु होता?

स्वतःच्या जीवितपुष्पाचा स्वहस्तानें नाश आणि त्या योगानें आपल्या शारीरिक व्याधींची परिसमाप्ति!

बराच वेळ विचार केल्यानंतर त्यांनाच वाटूं लागलें असेल की हा

विहित मार्ग नव्हे! शारीरिक यातना या प्रत्येक मनुष्यमात्राला भोगाव्या लागतातच. मग त्यांना भिअून कसें चालेल? त्यांना भेदरून जर आपण आपल्या आयुष्याचा शेवट केला तर सामान्य माणसांत आणि आपल्यांत फरक कोणता राहिला? आपण सामान्य का आहोंत?

ती गोष्ट मान्य करण्यास त्यांचें मन धजेना. कारण ते केवळ असामान्यच नव्हेत, तर असामान्यांतील असामान्य असे महापुरुष होते. त्यांना 'सामान्यपणाचा' आरोप कसा मान्य होअील! मग त्यांनी सारीं पुराणें आपल्या मनाशीं तपासून पाहिली. ज्या परमेश्वराने आपल्या हातीं हें जीवितपुष्प दिलेलें आहे तें नष्ट करण्याचा आपल्याला कांहीच अधिकार नाही. तो सर्वसत्ताधीश परमेश्वराशीं द्रोह आहे आणि असा द्रोह आपण करता कामा नये असेंहि त्यांना वाटूं लागलें.

मग कांही वेळानंतर, जे वीर पुरुष त्यांच्याच परिस्थितींतून गेले होते आणि ज्यांनी आपल्या मनांत आत्महत्येचे विचार मुळीच न आणतां आपलें वर्तन बाणेदार असें राखलें होतें, त्या वीरपुरुषांची प्रभावळच्या प्रभावळ त्यांच्या डोळ्यांसमोरून सरकूं लागली.

प्रत्यक्ष आकाश अंगावर कोसळलें असतांना आपल्या फिरंगी प्रतिपक्षाला खडसावून बजावणारा तात्या टोपे त्यांना दिसला. अिंग्रजी न्यायालयांत तो आपली अखेरची जबानी सादर करीत होता; आणि म्हणत होता, "मी अिंग्रजांचा सेवक कधीच नव्हतों. त्यामुळे त्यांच्याशीं राजद्रोह केल्याचा प्रश्नच अुद्‌भवत नाही. मी पेशव्यांचा सेवक होतों आणि त्यांच्याशीं मात्र अखेरपर्यंत अेकनिष्ठच राहिलों!"

मग त्यांना अेक समरांगण दिसूं लागलें. त्या ठिकाणीं मोठी धुमचक्री चालू होती. तोफांच्या आणि बंदुकींच्या आवाजांनी सारें वातावरण नुसतें दुमदुमून गेलें होतें आणि तो आवाज अैकणाराच्या कानठळ्या बसत होत्या. अितक्यांत कोणीतरी मोठ्यांदा अुच्चारलेले शब्द अैकूं येअूं लागले, "अेक वेळ प्राण देअीन, पण

माझी झांशी देणार नाही." तो आवाज झांशीची शूर राणी लक्ष्मीबाओ हिचा होता; आणि ती अिंग्रजांना त्याप्रमाणे बजावून सांगत होती.

मग मधूनच वेडेवाकडे हातवारे करीत मोठ्या संतप्त मनःस्थितींत अेक तरुण मुलगा ओरडत ओरडत वधस्तंभाकडे चालला होता. "प्राण गेला तरी कटवाल्यांचीं नांवें सांगणार नाही!" हें अेकच पालुपद तो पुन्हा पुन्हा घोकीत होता. कांही वेळाने त्याचा प्राण गेलेला दिसला आणि खरोखरच त्याने कटवाल्यांचीं नांवें सांगितलेलीं नव्हतीं. त्याच्या धडावेगळ्या मस्तकाकडे पाहून कोणीतरी म्हटल्याचें वासुदेव बळवंतांनी अैकलें, "बिचारा मंगल पांडे!"

अितक्यांत त्याच वयाचा अेक कोवळा युवक समरांगणीं पडलेला त्यांनी पाहिला. अेका धिप्पाड यवनाने त्याला विचारलें, "काय बच्चंजी, अजून लढणार का?" समरांगणांत मृत्यूच्या मांडीवर पडला असतांना जणू यावनी सत्तेला अुद्देशूनच त्या वीर युवाने मोठ्या त्वेषाने अुत्तर दिलें, "हां हां! जगलों वाचलों तर आणखीहि लढेन!" या वाक्यासरशी त्वेषाच्या रूपाने त्या मुलाच्या नेत्रांतून जणू काय अग्निस्फुल्लिंग बाहेर पडले. वासुदेव बळवंत मनाशीं म्हणाले, "मला चांगला माहीत आहे हा मुलगा! हा दत्ताजी शिंदे."

अितक्यांत प्रत्यक्ष क्रौर्याला लाजविणारा देखावा त्यांच्या दृष्टी-समोरून सरकूं लागला. "यावनी धर्म स्वीकारला नाहीस तर अेकेक अवयव अुपटून तुझा नाश केला जाअील!" असें कुणीतरी अेकदम ओरडलें. त्या व्यक्तीचे ते अुद्‌गार कर्णकटु वाटले. अितक्यांत दुसऱ्या व्यक्तीकडून प्रत्युत्तर आलें, "माझ्या धर्मापेक्षा माझा कोण-ताहि अवयव मला प्यार नाही. माझा अेकेक अवयव खुशाल माझ्या शरीरावेगळा करा. पण मी धर्म मुळीच सोडणार नाही." मग त्या धर्मवीराचा अेकेक अवयव शरीरावेगळा होअूं लागला. अखेरीस त्याचें शरीर विद्रूप दिसूं लागलें. परंतु स्वधर्मावर प्रेम कर-णाऱ्या त्याच्या आत्म्यावर केव्हाच तेज चमकूं लागलें होतें. त्या

तेजाच्या दीप्तीने त्याच्या प्रतिस्पर्ध्याचेहि डोळे खचित दिपून गेले असतील. धर्मवीर संभाजीचा आत्मा तेजोमय झाला होता आणि औरंगजेबाच्या मर्त्य जीवितावर त्याची काजळी चढली होती. वासुदेव बळवंतांनी त्या धर्मवीराला वंदन केलें आणि डोळे विस्फारून ते पुन्हा पाहूं लागले. मग अगदी मोजकींच दृश्यें त्यांच्या डोळ्यांसमोरून भराभर सरकूं लागलीं. प्रत्यक्ष वधस्तंभाकडे जात असतांना धीरोदात्तपणाने पुढे पुढे पावलें टाकणारा तात्या टोपे त्यांना दिसला. अैन युद्धाच्या धुमाळींत शत्रुपक्षाची गोळी लागून घायाळ झाल्यानंतर अेकदम धाडकन् खाली कोसळलेला बालविश्वास त्यांनी पाहिला. त्याच्या ओठांवरील मातेचें दूधहि धड पुसलें गेलें नव्हतें; त्या वयांत त्याच्या छातींत गोळी घुसली होती; आणि त्या ठिकाणाहून रक्त वाहूं लागलें होतें. मग दुःखाने धीर सोडून युद्धाच्या त्याच भाअूगर्दीत शत्रूवर तुटून पडलेला सदाशिवरावभाअू त्यांच्या दृष्टीसमोर आला आणि कांही वेळाने तोहि अदृश्य झाला.

मग त्यांना पुढे कांहीच दिसेनासें झालें. मात्र त्यांच्या कानांत हळूच कुणी तरी ओरडलें, "सांगा! या साऱ्या लोकांची परिस्थिति काय सुखाची होती? त्यांना शारीरिक यातना काय भोगाव्या लागल्या नव्हत्या? त्यांनी त्या परिस्थितींत आत्महत्या केली का? आणि तुमच्या मनांत मात्र असले विचार यावेत? तुम्हीहि त्यांच्याप्रमाणेच थोर पुरुषांच्या मालिकेंत बसणारे आहांत ना? मग आत्महत्येचे विचार कां करतां? त्या लोकांच्याप्रमाणे आत्मसमर्पण कां करीत नाही?"

नंतर बराच वेळ 'आत्महत्या' आणि 'आत्मसमर्पण' हे दोन शब्द अेखाद्या चक्रांत घालून गरगर फिरविल्याप्रमाणे त्यांना दिसूं लागले. ते दोन्हीहि शब्द अेकच आहेत असें त्यांना वाटूं लागलें. परंतु कांही वेळानंतर त्या चक्राची गति मंद मंद होत गेली; आणि त्या दोन शब्दांतील भेद त्यांना हळूहळू स्पष्ट होअूं लागला.

आत्महत्या आणि आत्मसमर्पण ! किती भेद आहे या दोन शब्दांत ! कोणत्याहि अुच्च ध्येयाकरिता झगडत असतांना त्यामध्ये मृत्यूला न भितां अपरिहार्यतेने आलेलें मरण आनंदाने पत्करणें हें आत्मसमर्पण होय; आणि सभोवतालच्या परिस्थितीला भेदरून जाअून आपल्या जीविताचा स्वहस्ताने शेवट करून घेणें ही आत्महत्या होय. किती फरक आहे या दोन शब्दांत ! अनेक वीरवरांनी देशाकरितां आत्मसमर्पण केलें आणि आपण आपल्या देहाकरिता आत्महत्या करीत आहोंत !

अशा प्रकारचे अुज्ज्वल विचार त्यांच्या मनांत त्या वेळी आले असतील. त्यामुळे आत्महत्या करण्याचा त्यांचा विचार क्षणभर पालटलाहि असेल. परंतु तो विचार कांही काळच टिकला. त्यांना पोलिसांचा तो छळ सहन होअीना. आत्महत्येचे विचार त्यांच्या मनांत पुनःपुन्हा स्थिर होअूं लागले. वासुदेव बळवंतांच्यासारखा निधड्या छातीचा पुरुष आपल्या मनांत आत्महत्येचे विचार आणीत होता यावरून पोलिसांनी केलेल्या त्यांच्या अनन्वित छळाची कल्पना येते.

अखेरीस गुरुवार दि. २४ जुलै १८७९ या दिवशीं गळफांस लावून आत्महत्या करण्याचा त्यांनी प्रयत्न केलाच. परंतु पहारेकरी डोळ्यांत तेल घालून त्यांच्याकडे लक्ष पुरवीत होते. त्यामुळे त्यांचा तो प्रयत्न फसला आणि पुन्हा नवनवीन प्रकारच्या छळाला त्यांना तोंड देणें भाग पडलें.

अनेक दिवसांच्या छळवादानंतर सरकारी चौकशीचा फार्स संपला आणि दिनांक २२ आक्टोबर १८७९ रोजीं वासुदेव बळवंतांच्या प्रारंभिक चौकशीस सुरुवात झाली. त्यांच्यावर पिनल कोडाच्या १२१, १२२,१२४ व ३९५ या कलमांखाली आरोप ठेवण्यांत आले. सोमवार दि. ३ नोव्हेंबरला पुणें येथील संगमानजिकच्या न्यायालयांत त्यांच्यावरील खटल्याला प्रारंभ झाला. न्यायमूर्ति न्यूनहॅम यांच्यापुढे हा सारा खटला चालला.

वासुदेव बळवंतांना बघण्यासाठी पहिल्या दिवशीं न्यायालयाचें

आवार प्रेक्षकांनी नुसतें फुलून गेलें होतें. सशस्त्र सैनिकांच्या पहाऱ्यांत शृंखलाबद्ध वासुदेव बळवंत यांनी जेव्हा न्यायालयांत प्रवेश केला तेव्हा त्यांना बघण्यासाठी अेकच गर्दी अुसळली. पोलिसांना बंदोबस्त ठेवतां ठेवतां पुरेवाट झाली. या वेळीं वासुदेव बळवंतांनी पांढरेशुभ्र कपडे परिधान केले होते. पायांत तंग सुरवार घातली होती आणि डोक्याला पांढराशुभ्र फेटा बांधला होता. अंगाभोवती पांढरी शाल त्यांनी लपेटली होती. त्यांच्या पायांत पादत्राण घातलेलें नव्हतें. वाढलेल्या दाढीमुळे त्यांचा चेहरा फारच रुबाबदार दिसत होता. आपलें कर्तव्य पार पाडल्याचा आनंद त्यांच्या शांत चेहेऱ्यावर स्पष्टपणाने प्रतीत होत होता.

सरकारच्या वतीने मुंबअीचे सुप्रसिद्ध वकील नानाभाअी हरिदास हे काम चालविणार होते. साऱ्यांच्यापुढे वासुदेव बळवंतांच्या बचावाचा प्रश्न अुभा राहिला. त्यांचा बचाव करणें म्हणजे सरकारच्या प्रत्यक्ष रोषाला निमंत्रण करण्यासारखें होतें. या देशभक्ताचा बचाव करण्यासाठी आता कोण पुढे येतो अिकडे साऱ्यांच्या नजरा लागल्या. अितक्यांत ' सार्वजनिक काका ' अुभे राहिले आणि " मी वासुदेव बळवंतांचें वकीलपत्र घेण्यासाठी आलों आहें, " असें त्यांनी न्यायाधिशाला सांगितलें. सारे आश्चर्यचकित डोळे काकांच्यावर खिळून राहिले. अेका स्नेह्याने त्यांना स्पष्टच विचारलें, " तुमच्या या धाडसाचा परिणाम काय होअील याचा तुम्ही विचार केला आहे काय ? " यावर सार्वजनिक काकांनी लगोलग अुत्तर दिलें, " अहो, परिणाम काय व्हायचा आहे ? फार तर सरकार रुष्ट होअील. कदाचित् वासुदेव बळवंतांच्याबरोबर मलाहि फासावर जावं लागेल. यापेक्षा तर सरकार अधिक कांही करूं शकणार नाही ना ? "

काकांचें हें सडेतोड अुत्तर अैकून तेथे अुपस्थित असलेल्या साऱ्या लोकांना धन्यता वाटली. देशाच्या प्रिय देशभक्ताला त्यांचे देशबांधव अेकाकी टाकीत नाहीत ही गोष्ट त्या योगाने सिद्ध झाली.

या खटल्यांत मेजर डॅनिअलची प्रमुख साक्ष झाली. त्यानंतर अितरहि अनेक साक्षी झाल्या. वासुदेव बळवंतांचा मेव्हणा कुंटे याने खालच्या कोर्टात दिलेली साक्ष वरच्या कोर्टात फिरविली. त्यामुळे कोर्टात मनस्वी खळबळ अुडाली; आणि कुंटे याने कोर्टात खोटी साक्ष दिल्याच्या आरोपावरून त्याच्यावर खटला भरला आणि त्याला फटक्यांची शिक्षा फर्माविण्यांत आली. रंगोपंत महाजन हा माफीचा साक्षीदार बनला. कुंटे याच्याप्रमाणेच बाबाजी नारायण जोशी यानेहि आपली खालच्या कोर्टातील साक्ष फिरविली आणि वरच्या कोर्टात वासुदेव बळवंतांच्या बाजूने साक्ष दिली. सरकारी वकिलाने अत्यंत तडफेने भाषण केलें. त्या भाषणाला वासुदेव बळवंतांचे वकील महादेव चिमणाजी आपटे यांनी सेशन्स कोर्टात प्रत्युत्तर दिलें. आटोकाट प्रयत्न करून ते वासुदेव बळवंतांच्या बचावाचें भाषण करीत होते.

न्यायालयांतील या साऱ्या गोष्टी नेहमीच्या रिवाजानुसार घडल्या. परंतु या खटल्यांत प्रामुख्याने अुल्लेख करण्याजोग्या अशा केवळ दोनच गोष्टी होत्या. अेक म्हणजे वासुदेव बळवंतांचें न्यायालयांतील धीरोदात्त वर्तन आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचें न्यायालयांतील वक्तव्य!

त्यांच्या वक्तव्यांतील पुढील भाग प्रत्येक देशप्रेमी माणसाने आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवण्यासारखा असा आहे.

ते म्हणाले, " माझ्या मायदेशांतील लोक ब्रिटिश राजसत्तेखाली अुपासमारीने तडफडून मृत्युपंथाला लागलेले होते. असे कित्येक लोक प्रतिदिनीं मृत्युमुखीं पडत होते; तर अितर अनेकांच्या हाडांचे नुसते सापळे राहिले होते. अशा लोकांना मी कसा वांचवूं सकेन याची गेलीं कित्येक वर्षे मला चिंता लागून राहिली होती. ज्या या भूमीच्या पोटीं आपण जन्म घेतला त्याच भूमीच्या पोटीं हीं सारीं लेकरें जन्म पावलीं. त्यांनी अन्नपाण्यावांचून अुपाशी मरावें आणि आपण मात्र कुत्र्याप्रमाणे पोट भरीत जीवन

कंठावें हें मला बरें वाटेना. माझा देशाभिमान अत्यंत प्रखर होता. मी परमेश्वराला प्रत्यहीं हीच प्रार्थना करीत होतों की, "हे परमेश्वरा, वाटल्यास माझे प्राण घे, पण माझ्या देशबांधवांना सुखी कर." या साऱ्या गोष्टीला हे ब्रिटिश लोक जबाबदार आहेत, याबद्दल माझी खात्री पटली आणि देशांतून हे चालते झाल्याशिवाय देश सुखी होणार नाही हेंहि मला कळून चुकलें. हजारो गोष्टींचा विचार करून माझें मन अिंग्रज लोकांविरुद्ध अुठलें व मी प्रतिक्षणीं त्यांच्या नाशाचा विचार करूं लागलो. अहर्निश तोच माझा विचार सुरू असे. या विचारामुळे मला वेड लागण्याची पाळी आली. माझी निद्रा नष्ट झाली. आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध मी सशस्त्र बंड पुकारण्याचें ठरविलें.

"या साऱ्या गोष्टी करण्यासाठी द्रव्यबलाची आवश्यकता होती. म्हणून लुटालूट करण्याचा मार्ग आम्हांला स्वीकारावा लागला. पुण्याचा खजिना लुटण्याची माझी सर्व योजना सिद्ध झाली होती. पण अैनवेळीं अेका मुसलमानाने ती जाहेर फोडली. त्यामुळे तो बेत तसाच राहिला.

"अिंग्रजांना येथून घालवून देअून मला या ठिकाणीं प्रजासत्ताक राज्याची स्थापना करावयाची होती. परंतु मला अखेरीस यश आलें नाही. माझ्या देशबांधवांनो, माझ्यामुळे तुमच्या पदरांत कांहीच लाभ पडला नाही त्याबद्दल मला क्षमा करा!"

वासुदेव बळवंतांच्या या वक्तव्यावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात. अेक ही की, अिंग्रजांना या देशांतून 'चालते व्हा!' हा आदेश पहिल्याप्रथम वासुदेव बळवंतांनी दिलेला आहे. कितीहि देशव्यापी प्रचार केला तरी त्या गोष्टीचा वारसा दुसऱ्या कुणाकडेहि जाअू शकत नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे ज्या प्रजासत्ताक राज्याची थोरवी आज आपण गात आहोंत त्या प्रजासत्ताक राज्याची सुस्पष्ट कल्पना अगदी पहिल्या प्रथम वासुदेव बळवंतांनीच आपल्या दृष्टीसमोर ठेवलेली होती. वेळीं अवेळीं पुरोगामित्वाचा वारसा सांगणाऱ्या तथाकथित अनेक देशभक्तांनी ही गोष्ट अवश्यमेव विचारांत घेतली पाहिजे. असो.

या जबानीनंतर खटल्याचा निकाल ठरलेलाच होता. स्वतः वासुदेव बळवंत फांसावर जाण्यासाठी सिद्ध होते. खऱ्या क्रांतिकारकाला अटळ म्हणून राहणारें तेंच अेकमेव असें पारितोषिक आहे याची त्यांना स्वच्छ कल्पना होती.

त्यामुळे न्या. न्यूनहॅम यांनी जेव्हा त्यांना जन्मठेप काळे पाण्याची शिक्षा फर्मावली तेव्हा ते मुळीच डगमगले नाहीत. त्यांच्या विशाल अंतःकरणांत मुळीच धडपड झाली नाही. ते मुळीच गलितगात्र झाले नाहीत. अुलट त्यांच्या अंगांत होतें नव्हतें तें सारें धैर्य अुफाळून वर आलें. त्यांची मुद्रा निश्चयी बनली. शिक्षा अैकल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांना अुद्देशून धीरगंभीर आवाजांत ते अेवढेंच म्हणाले, "मित्रहो ! आज या भयंकर शिक्षा आपणांस मिळाल्या आहेत. पण त्या सोसून अुद्या देशांत आपलें नांव तरी अमर होअून राहील, याची खात्री बाळगा !"

त्यांचें हें धीरोदात्त वर्तन बघून तेथील सारे लोक थक्क होअून गेले.

त्यानंतर त्यांना बेड्या ठोकण्यांत आल्या आणि साखळदंडांनी जखडण्यांत आलें. परंतु तशाहि परिस्थितींत अेखाद्या वीरपुरुषाने आपल्या अंगावर मानचिन्हें लावून मोठ्या अैटीने चालावें त्याप्रमाणे वासुदेव बळवंत चालूं लागले. त्यांचें अखेरचें दर्शन घेण्यासाठी अफाट जनसागर न्यायालयाच्या बाहेर अुभा होता. सैनिकांच्या सशस्त्र पहाऱ्यांतून ते जेव्हा बाहेर आले, तेव्हा आपल्या अत्यंत आवडत्या सम्राटाला वंदना द्यावी त्याप्रमाणे तेथील सहस्रावधि मुखांतून जयघोष बाहेर पडूं लागले, "वासुदेव बळवंत फडके की जय !"

परंतु त्या जयघोषाकडे त्यांचें किमपि लक्ष नव्हतें. आपलें पवित्र कर्तव्य अुरकून निजधामाला चाललेल्या अेखाद्या तपस्व्याप्रमाणे त्यांचें त्या वेळचें वर्तन भासत होतें.

परंतु अजून त्यांच्या पराक्रमाची दीप्ति संपलेली नव्हती. आणखी अेकदा त्यांचा पराक्रम जगाला दिसणार होता.

एडनच्या कारागृहांत असतांना त्यांनी एकदा आपल्या कोठडीच्या गजांतून सहज बाहेर नजर टाकली. बाहेर अंधःकाराचें साम्राज्य पसरलें होतें. त्यांच्या मनांत विचार आला की, बाहेर दिसणाऱ्या समुद्रापलीकडे आपली प्रिय मातृभूमि आहे. ती स्वतंत्र झाल्यानंतर आपल्याला तिचा दर्शनलाभ होईल का? लगेच त्यांच्या मनांत भोवतालच्या परिस्थितीचा आणि आपल्या जन्मठेपीचा विचार येऊन ते आपल्या मनांत म्हणाले, "छे! तें शक्य दिसत नाही. मातृभूमीचें दर्शन आता या जन्मांत शक्य नाही!" हा विचार मनांत येतांच ते कांहीसे खिन्न झाले. परंतु लगेच त्यांना शिवाजी महाराजांचें नि त्यांच्या आग्ऱ्याहून सुटकेचें स्मरण झालें आणि एक धाडसी विचार त्यांच्या मनांत स्थिर झाला.

शिवाजी महाराजांच्याप्रमाणे आपण येथून निसटून गेलों तर? –

हा विचार जेव्हा त्यांच्या धाडसी मनांत स्थिर झाला तेव्हा मध्यरात्र उलटून गेली होती. पहारेकरी अगदी निर्धास्तपणाने झोपले होते. शिवाजी महाराजांच्या पवित्र स्मरणानेच की काय कुणास ठाऊक, पण त्यांच्या अंगांत भीमरूपी बळ संचारलें आणि त्यांनी आपल्या हातापायांतील जड शृंखला तोडून टाकल्या. तुटलेल्या शृंखलांकडे त्यांनी क्षणभर नजर टाकली; आणि त्या गोळा करून त्यांनी त्या शृंखला एका कोपऱ्यांत फेकून दिल्या. आतापर्यंत बंदिवानाच्या वस्त्रांमध्ये लपेटलेलें आपलें शरीर त्यांनी विवस्त्र केलें आणि स्वातंत्र्यांतच खुलून दिसणाऱ्या त्यांच्या शरिरावर त्यांनी दुसरे कपडे चढविले. ते कपडे अंगांत घातल्यावर त्यांच्या शरिरांत आणखी नवचैतन्य प्राप्त झालें. त्यांना आता कोणताच अडथळा वाटेनासा झाला होता. कोठडीचीं एवढीं मोठीं प्रचंड दारें, पण एका क्षणांत त्यांनी तीं दारें त्यांच्या उखळांतून उखडून आपल्या हातीं घेतलीं; आणि निद्रिस्त पाहारेकऱ्यांना ओलांडून ते त्या घनदाट

अंधारांतून बाहेर पळत सुटले. जणुं द्रोणागिरी पर्वत लीलेने अुचलून हनुमान धावत श्रीरामाकडे निघाला होता.

आपल्या अंधारकोठडींतून ते बाहेर पडले. परंतु तो अभेद्य तट त्यांना अजून अुल्लंघून जावयाचा होता. त्यांनी अंधारांतच त्या अभेद्य तटाकडे अेक नजर टाकली. तो तट आपला अुपहास करून आपल्याला हसत आहे असा भास त्यांना त्या अंधारांतहि झाला. परंतु आता तेथून मागे फिरणें शक्य नव्हतें. हातीं वेळ अगदी थोडा होता; आणि कांहीं दगाफटका जर झाला असता तर पुन्हा नरकवासांत खितपत पडण्याखेरीज दुसरें गत्यंतर नव्हतें. अेका क्षणांत अेक कल्पना त्यांना सुचली. वर दिलेल्या हनुमानाच्या अुपमेंत कांहीं न्यून राहूं नये असें त्यांना वाटलें असावें. लंकेला जाण्यापूर्वी ज्याप्रमाणे सेतुबंधन करावें लागलें त्याप्रमाणे अेडन तुरुंगाच्या वर्षानुवर्षें अभेद्य म्हणून मिरविणाऱ्या तटाला ओलांडून जाण्यापूर्वी शिडी अुभारणें आवश्यक होतें. लगेच अुपटून आणलेलीं हातांतलि कोठडींचीं दारें शिडीच्या रूपाने तटाशीं अुभीं राहिलीं; आणि क्रांतिकारकांचा हा धुरीण अेका क्षणांत तटावर येअून दाखल झाला.

काल अेकसारखा पुढे धावत होता. अेक क्षणहि आता दवडून चालणार नव्हतें. त्या तटावरून त्यांनी सगळीकडे नजर टाकली. खाली खोल दरी पसरल्याचा त्यांना स्पष्ट भास झाला. त्यांनी वर आकाशाकडे बघितलें. आकाशाच्या अनंत विस्तारांत लुकलुकणाऱ्या चांदण्या त्या दिवशीं या शूर कृत्याकडे टक लावून बघत होत्या. समोर जिकडे तिकडे अंधाराचा समुद्रच पसरला होता; जणुं कल्पांतापर्यंत त्याचा अंत लागणार नव्हता. वर अनंत आकाश, खाली खोल नि विस्तीर्ण दरी आणि समोर क्षितिज जेथे टेकलेलें दिसतें तेथपर्यंत पसरलेला अंधारच अंधार! क्षणभर त्यांचें मन घाबरून गेलें. आपला थापुढे निभाव लागणार नाही असें त्यांना वाटूं लागलें. पण तें क्षणभरच! दुसऱ्याच क्षणीं त्यांनी तटावरून खाली अुडी घेतली आणि

ते बंधनपार झाले. चातक पक्षाच्या चोचींत पहिल्या बरसातीचा थेंब अचूक सांपडावा त्याप्रमाणे त्यांना हवें असलेलें स्वातंत्र्य त्यांच्या हातीं पडलें; आणि स्वातंत्र्याकरिता सदैव तळमळणारा त्यांचा आत्मा कांही क्षण शांत – अगदी शांत झाला.

परंतु त्यांचा आत्मा स्वातंत्र्यांत सदैव विलीन व्हावा अशी विधि-घटना नव्हती. अभेद्य तटावरून उडी मारल्यानंतर त्याहि स्थितींत त्यांनी बारा मैलांची दौड केली. परंतु अखेरीस दुर्दैवाने ते पुन्हा शत्रूच्या हातीं सांपडले. अरब घोडेस्वारांच्या सहाय्याने त्यांना पुन्हा अटक करण्यांत आली. त्यांना पकडीत असतांना त्यांनी थोडी झटा-पट केली. परंतु पंख तुटलेल्या पाखराच्या अखेरच्या झटापटीचेंच तें केविलवाणें दृश्य होतें.

पुन्हा त्या अभेद्य तटाच्या छायेखाली आणि आणखी भरभक्कम अशा अंधार कोठडींत जन्मभर कष्टत, जळत आणि झिजत असें आयुष्य कंटण्यासाठी ते अेडनच्या तुरुगांत येअून दाखल झाले.

परंतु त्यानंतर ते फार दिवस जगले नाहीत. जणुं पारतंत्र्यांत दीर्घकालपर्यंत जगण्यासाठी त्यांचें शरीर परमेश्वराने घडविलें नसावें. थोड्याच दिवसांत ते असाध्य रोगाच्या आहारीं गेले; आणि अखेरीस देशाच्या स्वातंत्र्याकरिता ज्या क्रांतिकारकाने आपली अुभी हयात मृत्यूशीं झुंज देअून खर्च केली त्या मृत्यूवर मात करणाऱ्या महापुरु-षाने १७ फेब्रुवारी १८८३ या दिवशीं त्याच मृत्यूच्या मांडीवर आपली मान टेकली.

अंधारांतून बाहेर पळत सुटले. जणुं द्रोणागिरी पर्वत लीलेने अुचलून हनुमान धावत श्रीरामाकडे निघाला होता.

आपल्या अंधारकोठडींतून ते बाहेर पडले. परंतु तो अभेद्य तट त्यांना अजून अुल्लंघून जावयाचा होता. त्यांनी अंधारांतच त्या अभेद्य तटाकडे अेक नजर टाकली. तो तट आपला अुपहास करून आपल्याला हसत आहे असा भास त्यांना त्या अंधारांतहि झाला. परंतु आता तेथून मागे फिरणें शक्य नव्हतें. हातीं वेळ अगदी थोडा होता; आणि कांही दगाफटका जर झाला असता तर पुन्हा नरकवासांत खितपत पडण्याखेरीज दुसरें गत्यंतर नव्हतें. अेका क्षणांत अेक कल्पना त्यांना सुचली. वर दिलेल्या हनुमानाच्या अुपमेंत कांही न्यून राहूं नये असें त्यांना वाटलें असावें. लंकेला जाण्यापूर्वी ज्याप्रमाणे सेतुबंधन करावें लागलें त्याप्रमाणे अेडन तुरुंगाच्या वर्षानुवर्षे अभेद्य म्हणून मिरविणाऱ्या तटाला ओलांडून जाण्यापूर्वी शिडी अुभारणें आवश्यक होतें. लगेच अुपटून आणलेलीं हातांतलि कोटडीचीं दारें शिडीच्या रूपाने तटाशीं अुभीं राहिलीं; आणि क्रांतिकारकांचा हा धुरीण अेका क्षणांत तटावर येअून दाखल झाला.

काल अेकसारखा पुढे धावत होता. अेक क्षणहि आता दवडून चालणार नव्हतें. त्या तटावरून त्यांनी सगळीकडे नजर टाकली. खाली खोल दरी पसरल्याचा त्यांना स्पष्ट भास झाला. त्यांनी वर आकाशाकडे बघितलें. आकाशाच्या अनंत विस्तारांत लुकलुकणाऱ्या चांदण्या त्या दिवशीं या शूर कृत्याकडे टक लावून बघत होत्या. समोर जिकडे तिकडे अंधारांचा समुद्रच पसरला होता; जणुं कल्पांतापर्यंत त्याचा अंत लागणार नव्हता. वर अनंत आकाश, खाली खोल नि विस्तीर्ण दरी आणि समोर क्षितिज जेथे टेकलेलें दिसतें तेथपर्यंत पसरलेला अंधारच अंधार! क्षणभर त्यांचें मन घाबरून गेलें. आपला धापुढे निभाव लागणार नाही असें त्यांना वाटूं लागलें. पण तें क्षणभरच! दुसऱ्याच क्षणीं त्यांनी तटावरून खाली अुडी घेतली आणि

ते बंधनपार झाले. चातक पक्षाच्या चोचींत पहिल्या बरसातीचा थेंब अचूक सांपडावा त्याप्रमाणे त्यांना हवें असलेलें स्वातंत्र्य त्यांच्या हातीं पडलें; आणि स्वातंत्र्याकरिता सदैव तळमळणारा त्यांचा आत्मा कांही क्षण शांत – अगदी शांत झाला.

परंतु त्यांचा आत्मा स्वातंत्र्यांत सदैव विलीन व्हावा अशी विधि-घटना नव्हती. अभेद्य तटावरून उडी मारल्यानंतर त्याहि स्थितींत त्यांनी बारा मैलांची दौड केली. परंतु अखेरीस दुर्दैवाने ते पुन्हा शत्रूच्या हातीं सांपडले. अरब घोडेस्वारांच्या सहाय्याने त्यांना पुन्हा अटक करण्यांत आली. त्यांना पकडीत असतांना त्यांनी थोडी झटा-पट केली. परंतु पंख तुटलेल्या पाखराच्या अखेरच्या झटापटींचेंच तें केविलवाणें दृश्य होतें.

पुन्हा त्या अभेद्य तटाच्या छायेखाली आणि आणखी भरभक्कम अशा अंधार कोठडींत जन्मभर कुष्टत, जळत आणि झिजत असें आयुष्य कंठण्यासाठी ते अेडनच्या तुरुगांत येअून दाखल झाले.

परंतु त्यानंतर ते फार दिवस जगले नाहीत. जणुं पारतंत्र्यांत दीर्घकालपर्यंत जगण्यासाठी त्यांचें शरीर परमेश्वराने घडविलें नसावें. थोड्याच दिवसांत ते असाध्य रोगाच्या आहारीं गेले; आणि अखेरीस देशाच्या स्वातंत्र्याकरिता ज्या क्रांतिकारकाने आपली अुभी हयात मृत्यूशीं झुंज देअून खर्च केली त्या मृत्यूवर मात करणाऱ्या महापुरु-षाने १७ फेब्रुवारी १८८३ या दिवशीं त्याच मृत्यूच्या मांडीवर आपली मान टेकली.

जो प्रकार घडला तो अत्यंत अनपेक्षित असाच होता. त्यामुळे अरविंद बाबू प्रथम गोंधळून गेले. राजकीय नभांगणांत ठिकठिकाणीं प्रचंड वादळें अुठत आहेत या गोष्टीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्या वादळांचा तडाखा आपल्यापर्यंत येअून दाखल होअील ही गोष्ट त्यांच्या ध्यानींमनींहि नव्हती. तथापि अेखादें तुफान वादळ वातावरणांत प्रत्यक्ष घोंघावत असतांना अनेक पावसाळे अंगावरून गेलेला अेखादा महान् वटवृक्ष त्या वादळाकडे ज्या स्थितप्रज्ञतेने बघतो त्याप्रमाणे अरविंदबाबू त्या राजकीय वादळाकडे बघत होते.

खरोखर त्या वेळीं बंगालचें राजकीय वातावरण वादळी वाऱ्यांनी पुरेपूर व्याप्त होअून गेलें होतें. त्या वेळीं व्हाअिसरॉय लॉर्ड कर्झन यांची दडपशाहीची कारकीर्द सुरू होती. त्यांनी बंगालच्या फाळणीची घोषणा केली, त्या वेळीं मातृभूमीच्या विच्छेदनाची कल्पना कुणालाहि मानवण्याजोगी नव्हती. मातृभूमीचें विच्छेदन म्हणजे पर्यायाने मातृदेहाचें विच्छेदन आहे असें मानण्याचा तो काळ होता. "जननी नि जन्मभूमि या गोष्टी स्वर्गापेक्षाहि पवित्रतम आहेत," या अुक्तीचा खराखुरा अर्थ समजणारे नि तो अर्थ शिरसावंद्य मानणारे लोक त्या काळीं या देशांत वसत होते. त्या मुळे लॉर्ड कर्झन यांनी केलेल्या फाळणीच्या घोषणेने ते सारे लोक संतप्त झाले. "प्राण गेला तरी माझी झांशी देणार नाही," या कृतनिश्चयाने झांशीच्या शूर महाराणीने अेके काळीं फिरंग्यांना बजावले होतें; त्याचप्रमाणें किंबहुना त्यापेक्षाहि अधिक कृतनिश्चयाने प्रथम या संतप्त बंगाली जनतेने नि नंतर अखिल हिंदुजनतेने पुन्हा अेकदा फिरंग्यांनाच बजावलें की, "अेकवेळ प्राण देअूं, पण बंगाल प्रांत तोडूं देणार नाही. बंगाल

प्रांत तोडण्यासाठी प्रथम तुम्हांला आमच्या शरीराचे तुकडे करावे लागतील!" आणि या त्यांच्या केवळ आरोळ्या नि घोषणाच राहिल्या नाहीत; तर त्या शब्दांचे अर्थ खरे करण्यासाठी अुत्तरेपासून दक्षिणेपर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत आडवा-अुभा देश ती अनैसर्गिक फाळणी हाणून पाडण्यासाठी अेकभावनेने भारावून अुभा ठाकला. प्रथम प्रथम त्या लोकांनी सनदशीर मार्गाने लढा देण्यास प्रारंभ केला. परंतु असले फुसके बार हवेंतच विरून गेले आणि शत्रु नि त्याचे मार्ग होते तसेच कायम राहिले. त्या योगाने जनता निराश झाली. नुसत्या निश्चयाने अगर नुसत्या देशभावनेने प्रेरित होअून कांहीच कार्य घडत नसतें. तर त्यासाठी कांही तरी प्रत्यक्ष कृति हवी, म्हणून ७ ऑगस्ट १९०५ रोजीं 'स्वदेशी' चळवळीस प्रारंभ झाला. लगोलग ब्रिटिश मालावर बहिष्कार पडला. चौकाचौकांतून ब्रिटिश मालाच्या होळ्या पेटूं लागल्या. जणुं मातृभूमीच्या स्वातंत्र्यार्थ पेटलेल्या होमकुंडाच्या त्या लहान लहान शाखाच होत्या. त्या होळयांच्या अुज्ज्वल ज्वालांनी स्वातंत्र्योत्सुक जनतेचीं मुखें दीप्तीने अुजाळलीं आणि त्या होळयांची आग सरकाराच्या घरापर्यंत जाअून भिडली. प्रत्यहीं नवनवे वटहुकूम निघूं लागले. परंतु त्यामुळे जनतेचा अुत्साह खच्ची न होतां अुलट दुप्पट वेगाने अुफाळून वर आला. पोलिसांची नि गुप्तचरांची गस्त अहोरात्र आरंभित झाली. जिकडे तिकडे त्यांना गुप्तमंडळ्या दिसूं लागल्या. परंतु अशा प्रकारच्या अेकाहि संस्थेचा प्रत्यक्ष पत्ता त्यांना लागेना. अशाच परिस्थितींत आणखी कांही जुलमी कायदे जनतेवर लादण्यांत आले. त्यामुळे तर लोकलढ्याला आणखी तेज चढलें. जणु सरकारी कायदे नि त्या अनुषंगाने त्या त्या प्रमाणांत वृद्धिंगत होणारा जनतेचा अुत्साह यांमध्ये अेक प्रकारची अहमहमिकाच लागली होती.

आणि अशा या तप्त वातावरणांत ६ डिसेंबर १९०७ रोजीं रात्रीं बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर सर फ्रेझर यांची गाडी अुलथण्याचा प्रयत्न

## योगी अरविंदबाबू घोष : : ३

जो प्रकार घडला तो अत्यंत अनपेक्षित असाच होता. त्यामुळे अरविंद बाबू प्रथम गोंधळून गेले. राजकीय नभांगणांत ठिकठिकाणीं प्रचंड वादळें अुठत आहेत या गोष्टीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्या वादळांचा तडाखा आपल्यापर्यंत येअून दाखल होअील ही गोष्ट त्यांच्या ध्यानींमनींहि नव्हती. तथापि अेखादें तुफान वादळ वातावरणांत प्रत्यक्ष घोंघावत असतांना अनेक पावसाळे अंगावरून गेलेला अेखादा महान् वटवृक्ष त्या वादळाकडे ज्या स्थितप्रज्ञतेने बघतो त्याप्रमाणे अरविंदबाबू त्या राजकीय वादळाकडे बघत होते.

खरोखर त्या वेळीं बंगालचें राजकीय वातावरण वादळी वाऱ्यांनी पुरेपूर व्याप्त होअून गेलें होतें. त्या वेळीं व्हाअिसरॉय लॉर्ड कर्झन यांची दडपशाहीची कारकीर्द सुरू होती. त्यांनी बंगालच्या फाळणीची घोषणा केली, त्या वेळीं मातृभूमीच्या विच्छेदनाची कल्पनां कुणालाहि मानवण्याजोगी नव्हती. मातृभूमीचें विच्छेदन म्हणजे पर्यायाने मातृदेहाचें विच्छेदन आहे असें मानण्याचा तो काळ होता. "जननी नि जन्मभूमि या गोष्टी स्वर्गापेक्षाहि पवित्रतम आहेत," या अुक्तीचा खराखुरा अर्थ समजणारे नि तो अर्थ शिरसावंद्य मानणारे लोक त्या काळीं या देशांत वसत होते. त्या मुळे लॉर्ड कर्झन यांनी केलेल्या फाळणीच्या घोषणेने ते सारे लोक संतप्त झाले. "प्राण गेला तरी माझी झांशी देणार नाही," या कृतनिश्चयाने झांशीच्या शूर महाराणीने अेके काळीं फिरंग्यांना बजावले होतें; त्याचप्रमाणें किंबहुना त्यापेक्षाहि अधिक कृतनिश्चयाने प्रथम या संतप्त बंगाली जनतेने नि नंतर अखिल हिंदुजनतेने पुन्हा अेकदा फिरंग्यांनाच बजावलें की, "अेकवेळ प्राण देअू, पण बंगाल प्रांत तोडूं देणार नाही. बंगाल

प्रांत तोडण्यासाठीं प्रथम तुम्हांला आमच्या शरीराचे तुकडे करावे लागतील!" आणि या त्यांच्यां केवळ आरोळ्या नि घोषणाच राहिल्या नाहीत; तर त्या शब्दांचे अर्थ खरे करण्यासाठीं अुत्तरेपासून दक्षिणेपर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत आडवा-अुभा देश ती अनैसर्गिक फाळणी ह्मणून पाडण्यासाठीं अेकभावनेनें भारावून अुभा ठाकला. प्रथम प्रथम त्या लोकांनीं सनदशीर मार्गानें लढा देण्यास प्रारंभ केला. परंतु असले फुसके बार हवेंतच विरून गेले आणि शत्रु नि त्याचे मार्ग होते तसेच कायम राहिले. त्या योगानें जनता निराश झाली. नुसत्या निश्चयानें अगर नुसत्या देशभावनेनें प्रेरित होअून कांहीच कार्य घडत नसतें. तर त्यासाठीं कांहीं तरी प्रत्यक्ष कृति हवी, म्हणून ७ ऑगस्ट १९०५ रोजीं 'स्वदेशी' चळवळीस प्रारंभ झाला. लगोलग ब्रिटिश मालावर बहिष्कार पडला. चौकाचौकांतून ब्रिटिश मालाच्या होळ्या पेटूं लागल्या. जणुं मातृभूमीच्या स्वातंत्र्यार्थ पेटलेल्या होमकुंडाच्या त्या लहान लहान शाखाच होत्या. त्या होळ्यांच्या अुज्ज्वल ज्वालांनी स्वातंत्र्योत्सुक जनतेचीं मुखें दीप्तीनें अुजाळलीं आणि त्या होळ्यांची आग सरकाराच्या घरापर्यंत जाअून भिडली. प्रत्यहीं नवनवे वटहुकूम निघूं लागले. परंतु त्यामुळे जनतेचा अुत्साह खच्ची न होतां अुलट दुप्पट वेगानें अुफाळून वर आला. पोलिसांची नि गुप्तचरांची गस्त अहोरात्र आरंभित झाली. जिकडे तिकडे त्यांना गुप्तमंडळ्या दिसूं लागल्या. परंतु अशा प्रकारच्या अेकाहि संस्थेचा प्रत्यक्ष पत्ता त्यांना लागेना. अशाच परिस्थितींत आणखी कांही जुलमी कायदे जनतेवर लादण्यांत आले. त्यामुळे तर लोकलढ्याला आणखी तेज चढलें. जणुं सरकारी कायदे नि त्या अनुषंगानें त्या त्या प्रमाणांत वृद्धिंगत होणारा जनतेचा अुत्साह यांमध्ये अेक प्रकारची अहमहमिकाच लागली होती.

आणि अशा या तप्त वातावरणांत ६ डिसेंबर १९०७ रोजीं रात्रीं बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर सर फ्रेझर यांची गाडी अुलथण्याचा प्रयत्न

मिदनापूर विभागांत करण्यांत आला, पण त्या प्रयत्नाला यश मिळूं शकलें नाही. यां प्रकाराने मात्र सरकारचें माथें भडकलें; आणि त्या रेल्वे-मार्गावर काम करणाऱ्या कांही मजुरांनाच या प्रकारासाठी अटक करण्यांत आली. परंतु त्यामुळे सरकारचें खरेंखुरें समाधान झालें नाही. झाल्या प्रकारांत रेल्वे-मजुरांचा हात असणेंच शक्य नाही, दुखणें अेकीकडे आणि अुपचार दुसरीकडेच असा तो प्रकार आहे; ही गोष्ट सरकार जाणून होतें. परंतु खरा प्रकार अुघडकीस येअीपर्यंत सरकारला कळ काढणें आवश्यक होतें. अिकडे जनतेचेंहि समाधान झालें नव्हतें. लेफ्टनंट गव्हर्नराची गाडी अुलथण्याचा प्रयत्न फसल्यामुळे जनताहि असंतुष्टच राहिली.

नंतर ११ अेप्रिल १९०८ रोजीं चंद्रनगरच्या (Chandernagore) मेयरला ठार करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. परंतु तोहि प्रयत्न फसला. त्यामुळे आगींत आणखी तेल पडलें; आणि ज्वाला आणखीच भडकल्या. कलकत्याच्या परिसरांतून डोळ्यांत तेल घालून पोलीस अहोरात्र खडा पहारा करूं लागले आणि माणसामाणसावर आपल्या संशयी नजरा रोखूं लागले. अेकीकडे पकडलेल्या क्रांतिकारकांना कडक शिक्षा होतच होत्या. या साऱ्या शिक्षा मुझफरपूरचे सेशन जज्ज किंग्जफोर्ड यांनी ठोठावल्या असल्यामुळे क्रांतिकारक त्यांच्यावर रुष्ट होत होते. या रुष्टतेंत अधिक भर पडण्यास आणखी अेक प्रकार घडून आला. सुशीलचंद्र सेन नांवाच्या अेका कोवळ्या मुलाची अेका पोलिसाशीं कांही कारणावरून बाचाबाची झाली. त्यासाठी किंग्जफोर्ड यांनी त्या कोवळ्या पोराला फटक्यांची शिक्षा फर्मावली; व ती लगेच कार्यवाहींतहि आली. या संतापजनक प्रकारानंतर क्रांतिकारकांची क्षुब्धता शिगेस पोचली; आणि किंग्जफोर्ड हें आता त्यांचें लक्ष्य बनलें. मग ३० अेप्रिल १९०८ रोजीं सेशन जज्ज मि. किंग्जफोर्ड यांची गाडी असें समजून चुकीने दुसऱ्याच अेका गाडीवर बॉंब फेकण्यांत आले. त्या प्रकारांत केनेडी नांवाच्या दोन युरोपियन स्त्रिया

गतप्राण झाल्या. ही बातमी हां हां म्हणतां सर्व देशभर पसरली. आणि या बातमीने सारा देश हादरून गेला. खुदीराम बोस नांवाच्या तरुणाने हा बॉंब टाकला होता; परंतु केवळ त्याला अेकट्यालाच अटक करून सरकार थांबलें नाही. बंगालमध्ये दशदिशा झडतीचें नि अटकेचें सत्र सुरू झालें; आणि २ मे १९०८ च्या भल्या पहाटे जिकडे तिकडे पोलिसांच्या शोधचक्राला द्रुतगति प्राप्त झाली.

अरविंद बाबूंच्या कानापर्यंत या राजकीय वादळाची गर्जना येअून दाखल झाली होती. आदल्या दिवशीं रात्रीं "वंदे मातरम्" या पत्राच्या कार्यालयांत ते आपल्या नित्याच्या लेखनव्यवसायांत गढले होते, तेव्हा त्यांचे सहकारी शामसुंदर चक्रवर्ति यांनी त्यांच्या हातांत अेक तार दिली होती. त्या विद्युत्-संदेशांत मुझफरपूर येथील प्रकाराची हकीगत कळविली होती. ती बातमी वाचल्यानंतर त्यांना काय वाटलें असेल हें सांगणें कठीण आहे. परंतु अेक गोष्ट मात्र निश्चित! ती ही की, त्या प्रकाराशीं आपला दुरून कां होअीना, पण कांहीतरी संबंध जोडला जाअील ही कल्पना त्यांच्या मनाला शिवली देखील नाही.

त्यामुळे दुसरे दिवशीं म्हणजे दि. २ मे १९०८ ला पहाटे त्यांच्या निवासस्थानावर जेव्हा पोलिसांची धाड पडली, तेव्हा अरविंद बाबू कांहीसे गोंधळून गेले. कारण तो प्रकार अत्यंत अनपेक्षित असाच होता. राजकीय वातावरणांतील वादळाची पुरेपूर कल्पना त्यांना होती ही गोष्ट जरी खरी मानली, तरी त्या वादळाचा संबंध आपल्या घरापर्यंत येअून दाखल होईल ही गोष्ट त्यांच्या स्वप्नींहि नव्हती.

पहांटेची वेळ होती. अरविंदबाबू शांतपणाने झोपी गेले होते. अितक्यांत हत्यारबंद पोलीस, त्यांचे अधिकारी, गुप्त पोलीस नि त्यांचे वरिष्ठ लोक हा सारा तांडा आपल्यासमवेत घेअून जेव्हा पोलीस-प्रमुख क्रेगन यांनी त्यांच्या घरांत प्रवेश केला, तेव्हा अेखादी फार मोठी लढाअी लढण्यासाठी हें सारें सैन्य चाललें आहे असा भास

होत होता. त्या सार्‍यांची गडबड ऐकून अरविंदबाबू खडबडून जागे झाले. क्रेगनसाहेबांनी प्रश्न विचारला, " अरविंद घोष कोण आहे ? "

अरविंदबाबूंनी शांतपणाने उत्तर दिले, " मीच तो अरविंद घोष. "

मग अरविंदबाबूंना रीतसर अटक करण्यांत आली. पोलीसप्रमुख क्रेगनसाहेब यांच्या आज्ञेवरून अरविंदबाबूंच्या हातांत बेड्या ठोकण्यांत आल्या आणि कंबरेस दोरखंड बांधण्यांत आलें. परंतु त्याबद्दल त्यांना कांहीहि वाटलें नाही. आपण जें महान् देशकार्य हातीं घेतलेलें आहे ते एक परमेश्वराचें कार्य आहे. त्यासाठी कितीहि हालअपेष्टा सोसाव्या लागल्या तरी त्या आपण आनंदाने सोसल्या पाहिजेत; – नव्हे, तसाच प्रसंग आला तर आपण आनंदाने प्रत्यक्ष मृत्यूला मिठी मारली पाहिजे; याप्रमाणे त्यांनी आपल्या जीवनाचें तत्त्वज्ञान बनविलें होतें. त्यामुळे देशकार्याकरिता पोलिसांकडून होणारा अनन्वित छळ हा केवळ ईश्वरी प्रसाद आहे, असें मानण्याची त्यांनी आपल्या मनाची पुरेपूर तयारी केली होती.

अर्थात् मग झाल्या प्रकाराबद्दल त्यांना कांहीच वाटलें नाही. त्यांनी तशाच शृंखलाबद्ध स्थितींत झडतीचें वॉरंट मागून घेतलें आणि तें वाचल्यानंतर मात्र त्यांच्या मनाला थोडा धक्का बसला. मुझफरपूर येथील बॉंबच्या अत्याचाराशीं आपला संबंध जोडण्यांत आलेला असून त्यासाठी आपल्याला ही अटक करण्यांत येत आहे ही गोष्ट त्यांना त्या वॉरंटवरून समजली आणि ते पुरेपूर गोंधळून गेले.

ही त्यांची मनःस्थिति तुरुंगांत गेल्यानंतरहि बरेच दिवस टिकली. कारण ज्या मार्गाने ते कधीच गेले नव्हते, किंवा जाण्याचा त्यांचा संकल्पहि नव्हता त्या मार्गाने गेल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यांत आला होता. त्यांचा देशाभिमान जाज्वल्य होता तरी अत्याचारी मार्गाचा पुरस्कार त्यांनी कधीहि केलेला नव्हता. स्वदेशाला त्यांनी कधीच जडवस्तु मानलें नव्हतें, तर देशाला त्यांनी मातेसमान लेखलें होतें. आपल्या स्वदेशबांधवांचा

अुद्धार करण्याची शक्ति आपल्यांत खास आहे, असा स्पष्ट विश्वास त्यांनी आपल्या अंतःकरणांत खेळविला होता; परंतु ती शक्ति म्हणजे केवळ तरवार किंवा बंदुकीची शक्ति नव्हती. तर ज्ञानशक्तीच्या जोरावर परकीयांशीं लढा देण्याचें त्यांनी ठरविलें होतें. क्षात्रतेज हेंच केवळ असें तेज नाही की, ज्याच्या जोरावर परकीयांशीं लढा करतां येतो. तर ज्या ब्रह्मतेजाचें अधिष्ठान ज्ञानावर आहे त्या ब्रह्मतेजाच्या जोरावर मी शत्रूशीं लढा देअीन असा विश्वास त्यांनी अंतर्यामीं बाळगला होता. राष्ट्रीय सभेचें आमूलाग्र धोरण बदलून टाकावयाचें, तिची घटना नवीन तयार करावयाची, स्वदेशाबद्दल नि देशस्वातंत्र्याबद्दल देशबांधवांच्या मनांत प्रेम अुत्पन्न करावयाचें — नव्हे, त्या स्वातंत्र्याबद्दल जनता अक्षरशः वेडी होअून जाअील अशी चळवळ करावयाची आणि अखेरीस आपलें अीप्सित ध्येय गांठावयाचें, या असल्या अुदात्त विचारांचा त्यांनी अहर्निश ध्यास घेतला होता.

आणि आपल्या ध्येयाचा मार्ग गंभीरपणाने आक्रमीत असतांना तो मार्गच अेकदम दृष्टीआड केला जावा, त्याप्रमाणे त्यांची स्थिति झाली होती. क्रांतिकारक मार्गांनी सरकार अुलथून पाडण्याच्या कटांतील अेक प्रमुख भागीदार म्हणून त्यांना अटक करण्यांत आली होती. त्याबद्दल त्यांना आश्चर्य वाटून आश्चर्याच्या पहिल्या भरांत ते आपल्या मनाशीं अुद्गारलेहि असतील की, " परमेश्वराप्रमाणेच अिंग्रज सरकाराचे मार्ग अगाध आहेत ! "

परंतु या गोष्टीचें त्या काळीं जरी आश्चर्य वाटत असलें तरी सध्याच्या काळांत आपल्याला मुळीच आश्चर्य वाटणार नाही. कोणत्याहि राजकीय स्वरूपाच्या खटल्याला अधिक महत्त्व प्राप्त व्हावें आणि त्या खटल्याची गंभीरता अधिक वृद्धिंगत व्हावी यासाठी अरविंद बाबूंसारख्यांच्या तोलाचे पुढारी त्या त्या खटल्यांत गोवण्याचा प्रयत्न सरकारकडून बुद्धिपुरस्सर केला जातो.

प्रत्येक राजवटींत हे असले हीन प्रकार आपणांला आढळून येतील. अरविंद बाबूंच्या काळीं तो प्रकार कांहीसा नवीन असल्यामुळे लोकांना त्या बाबतींत आश्चर्य वाटलें असेल अेवढेंच !

त्या आश्चर्याचा पहिला बहर ओसरल्यानंतर मात्र अरविंद बाबूंना तुरुंगांतील जीवन मोठें कंटाळवाणें वाटूं लागलें. तेथील अेकान्त त्यांना असह्य होऊं लागला. मन अेकाग्र करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न करून बघितला. परंतु जेमतेम घटका दीडघटका त्यांचें मन स्थिर व्हावें; पुन्हा कोलाहल सुरू व्हायचा, असे बरेच दिवस गेले. नाना प्रकारच्या चिंता त्यांना सतावूं लागल्या. सभोवतालचें सृष्टिसौंदर्य पाहून मन रिझवावें तर तेंहि फारसें शक्य नव्हतें. आपल्या जागेवरून त्यांनी जर बाहेर नजर टाकली असती तर बाहेर फक्त अेकच झाड व आकाशाचा अेक बारीक खंड अेवढ्याच गोष्टी दिसण्याजोग्या होत्या. त्यांच्याकडे बघून मन काय रमणार ? कारागृहाच्या शुभ्र भिंती बघून तर त्यांच्या मनाला अुबग आला.

अशा वेळीं अेखादा बारीक प्रकारहि मनाची करमणूक करतो. अेके दिवशीं अरविंदबाबूंनी समोर नजर टाकली. त्या ठिकाणीं जमिनीवर काळ्या मुंग्या नि तांबड्या मुंग्या यांच्यामध्ये लढा चाललेला त्यांना दिसला. तांबड्या मुंग्या काळ्या मुंग्यांना ठार करीत होत्या. लगेच अरविंदबाबू पुढे धावले आणि त्यांनी काळ्या मुंग्यांची ती हत्या थांबविली. अेवढ्या लहान कृत्यानेंहि त्यांच्या मनाचें पुरेपूर समाधान झालें; आणि तें समाधान पुढे अेकसारखें वाढत गेलें. त्यांच्या बहकलेल्या वृत्तीला आळा बसला. त्यांच्या अंतःकरणांत अेक प्रचंड शक्ति अेकाअेकी निर्माण झाली. त्यांचें सारें शरीर थंडगार पडलें; आणि त्यांच्या अंतःकरणांतून आनंदाचा नि सुखशांतीचा झरा अखंडपणाने वाहूं लागला. जिकडे तिकडे त्यांना प्रकृतिमातेचा खेळ दिसूं लागला. प्रत्येक वस्तुमात्रांत आत्मा या नांवाचें अेक महान् तत्त्व अंतर्भूत झालें आहे असा स्पष्ट भास त्यांना झाला. याच ठिकाणीं त्यांनी भग-

यान श्रीकृष्णाच्या मुरलीचा मंजुळ नाद ऐकला. याच ठिकाणीं त्यांना परमेश्वराच्या आलिंगनाचा भास झाला. याच ठिकाणीं आदिमायेने त्यांना आपल्या अंकावर घेतलें. यामुळे त्यांचा अंतर्बाह्य देह सात्त्विक वृत्तींनी पुरेपूर बहरून गेला.

आणि त्याच वेळीं म्हणजे दि. १८ मे रोजीं अलीपूरचे न्यायाधीश मि. बर्ले यांचेसमोर त्यांच्यावरील सुप्रसिद्ध खटल्यास सुरवात झाली. सरकारच्या वतीने सुप्रसिद्ध बॅरिस्टर मि. अर्ड्ले नॉर्टन हे काम बघत होते. अरविंदबाबूंच्या वतीने प्रथम बॅ. व्योमकेश चक्रवर्ति आणि के. अेन्. चौधरी व नंतर देशबंधु चित्तरंजन दास हे काम चालवीत होते. मि. बर्ले यांच्या कोर्टांत ७६ दिवस हा खटला चालला आणि पुढे सेशन जज्ज न्या. बीचक्राफ्ट यांच्या कोर्टांत १३१ दिवस या खटल्याची सुनावणी झाली. त्यानंतर हायकोर्टांत ४७ दिवस अपील ऐकण्याचें काम चालू होतें. सुमार वर्षभर या सुप्रसिद्ध खट-ल्याचें कामकाज सुरू होतें. अेकूण २०६ साक्षीदार तपासण्यांत आले. आणि पुराव्यासाठीं लहानमोठे असे सुमारे चार हजार कागदपत्र दाखल करण्यांत आले होते. याशिवाय बॉंब, रिव्हॉल्व्हर अित्यादि तीन-चारशे वस्तु पुरावा म्हणून कोर्टासमोर मांडण्यांत आल्या होत्या. आरोपींपैकीं नरेंद्र गोस्वामी हा माफीचा साक्षीदार म्हणून पुढे आला.

अरविंदबाबूंसह अेकूण छत्तीस आरोपींवर खून, मारामारी, दरोडे वगैरे भीषण अत्याचारांच्या साहाय्याने स्वराज्य मिळविण्याचा कट केल्याच्या आरोपावरून खटला भरण्यांत आला. अरविंदबाबूंची वृत्ति अेकदा शांत झाल्यानंतर त्यांना आपल्यावर लादण्यांत आलेल्या या आरोपांचें कांहीच वाटलें नाही. ज्या दिवशीं त्यांना प्रथम न्याया-लयांत आणलें तेव्हा तेथील गडबड पाहून ते कांहीसे गोंधळून गेले. कारागृहांतील अेकांतवासांतून ते अेकदम गडबडीच्या वातावरणांत आले होते. परंतु त्या बदलत्या परिस्थितीशीं त्यांनी फारच अल्पावधींत

जुळवून घेतलें. त्यांनी प्रत्यक्ष न्यायालयांतच आपली साधना आरं-भिली. प्रथम ती गोष्ट त्यांना अवघड वाटूं लागली. परंतु पुढे त्यांनी आपलें मन तयार केलें आणि वृत्ति अंतर्मुख बनविली. कधी कधी ते खटल्याचें कामकाजहि अैकूं लागले. तर कधी आरोपींचा आपाप-सांतील हास्यविनोद अैकण्यांतहि त्यांनी आनंद मानला.

जेव्हा हा खटला सेशन् कोर्टांत सुरू झाला तेव्हा सरकारतर्फेचे निष्णात बॅरिस्टर नॉर्टन यांनी सोळा दिवस सतत भाषण करून केवळ अरविंदबाबूंचा या खटल्याशीं फार निकटचा संबंध जोडण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यासाठी पोलिसांकडूनहि आटोकाट प्रयत्न करण्यांत आले.

कांही महत्त्वपूर्ण राजकीय खटल्यांतून 'पुस्तकें' म्हणजे 'पिस्तुलें' असा अर्थ लावण्यांत आलेला आहे. त्याचप्रमाणे याहि खटल्यांत अेक असाच प्रकार घडला. "मिठाअीचें पत्र" (Sweet's letter) या नांवाने सुप्रसिद्ध असलेलें अेक पत्र या खटल्याच्या पुराव्यांत दाखल करण्यांत आलें होतें. देशभर 'मिठाअी' म्हणजे 'बॉंब गोळे' वांटण्याची हीच योग्य संधी आहे असा त्या पत्राचा अर्थ लावण्याचा सरकारतर्फे प्रयत्न करण्यांत आला होता. हें पत्र बारिंद्रकुमार यांनी अरविंदबाबूंस लिहिलें होतें, असें सरकाराच्या वतीने सांगण्यांत आलें. परंतु सरकारी वकील नॉर्टन यांचा तो प्रयत्न हाणून पाडण्यांत आला. अॅसेसरांनी त्या पत्रावर मुळीच विश्वास ठेवला नाही; आणि अरविंद-बाबूंसारख्या थोर व्यक्तीला कटांत कांहीतरी करून गोवण्यासाठी तें बनावट पत्र नोकरशाहीकडून मुद्दाम तयार करविण्यांत आलें होतें ही गोष्ट आपोआपच सिद्ध झाली.

या खटल्यांत अरविंदबाबूंनी आपली लेखी कैफियत सादर केली. त्या जबाबांत त्यांनी आपल्या ध्येयधोरणांचें स्पष्ट विशदीकरण केलेलें आहे. अत्याचारी मार्गावर त्यांचा कधीच विश्वास नव्हता. केवळ देशाचें स्वातंत्र्य त्यांनी प्रिय मानलें होतें. बडोदें येथून कलकत्त्याला

प्रयाण केल्यानंतर त्यांनी आपल्या पत्नीला जें पत्र पाठविलें होतें त्याहि पत्राचा त्यांनी आपल्या जबानींत अुल्लेख केलेला आहे. त्या पत्रांत अुद्धृत केल्याप्रमाणे आपण आपल्या कोणत्याहि ध्येयापासून विचलित झालों नाही असा स्पष्ट निर्वाळा त्यांनी कैफियतींत दिलेला आहे. तो निर्वाळा देअून आपल्या सडेतोड जबानींत त्यांनी पुढे म्हटलें आहे, "माझ्या देशबांधवांपुढे मी स्वातंत्र्यप्राप्तीचें ध्येय ठेवले. परंतु तें ध्येय माझ्या देशबांधवांपुढे ठेवणें कायद्याच्या कक्षेंत बसत नसेल तर तो गुन्हा मी केला आहे, हा गोष्ट कबूल करणें मला भाग आहे. अशा प्रकारचा गुन्हा जर दंडय असेल तर त्यासाठी कायद्यांत जी शिक्षा नेमून दिलेली असेल ती भोगण्यास मी सिद्ध आहे. परंतु ज्या गुन्ह्यांचा स्पर्शच मला झालेला नाही ते गुन्हे कृपा करून मजवर लादूं नका. ज्या गोष्टी माझ्या स्वप्नसृष्टींतहि कधी संभवल्या नाहींत, अशा अुपऱ्या गोष्टींशीं माझा संबंध जोडूं नका. स्वातंत्र्याचें ध्येय जनतेपुढे ठेवणें हा गुन्हा होत असल्यास, तो माझ्या हातून घडला आहे. तो मी मुळीच अमान्य करीत नाही. केवळ त्या-साठीच तर मी माझ्या सर्वस्वाचा होम केलेला आहे व त्यासाठीच माझ्या सर्व सुखांवर पाणी सोडून मी बडोद्याहून कलकत्ता येथे आलों. मी जगलों तो त्या ध्येयासाठी व आजतागायत जे जे कांहीं अुद्योग केले तेहि त्याच ध्येयाच्या सिद्धीसाठी. जागृतावस्थेंत या विचारांशिवाय दुसरे कोणत्याहि प्रकारचे विचार माझ्या मनाला शिवले नाहीत व झोपेंत या विचारांशिवाय दुसरीं कोणतीहि स्वप्नें मला पडलीं नाहींत.

"मी मान्य केलेला माझा हा गुन्हा शाबीत करण्यासाठी साक्षी-पुराव्याची कांहीच आवश्यकता नाही. त्याची कबुली देण्यास मी येथे जातीने हजर आहें. त्यासाठी माझ्या वांट्याला येअील ती शिक्षा आनंदाने भोगण्यास मी तयार आहें. मात्र मला जें दुःख होत आहे तें याचसाठी की, ज्या गोष्टी माझ्या स्वभावाविरुद्ध आहेत व ज्या

कृत्यांचा मला मनापासून तिटकारा आहे, त्या गोष्टींचा व कृत्यांचा संबंध माझ्याशीं चिकटविण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. पाश्चात्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाशीं वेदान्त तत्त्वज्ञानाची सांगड घालण्याचा मी प्रयत्न केला आहे. सर्व जगांत हिंदुस्थानाचें कांहीतरी वैशिष्ट्य असून तें या देशानें दाखविणें जरूर आहे व त्याची जाणीव माझ्या देशबांधवांस मी वेळोवेळीं करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठीं मला कारावासाची किंवा जी न्याय्य वाटेल ती शिक्षा द्या. तो जर गुन्हा असेल तर त्या गुन्ह्याच्या बाबतींत मात्र माझ्याकडून कधींहि नकार मिळणार नाही. ”

त्यांच्या या लेखी जबानीचें महत्त्व स्वयंसिद्ध असेंच आहे.

अरविंद बाबूंचे वकील देशबंधु चित्तरंजनदास यांनीं अरविंद बाबूंच्या वतीनें सेशन कोर्टांत सतत आठ दिवस भाषण केलें. त्यांनीं आपल्या सडेतोड नि मुद्देसूद भाषणांत फिर्यादी पक्षानें अरविंद बाबूंच्याविरुद्ध केलेल्या आरोपांचा व न्यायालयासमोर आणलेल्या पुराव्यांचा खरपूस समाचार घेतला.

अरविंद बाबूंचें जीवितध्येय विशद करतांना देशबंधु दास म्हणतात, “ अरविंद बाबूंनी राजकीय क्षेत्रांत पदार्पण केल्यापासून त्यांना या खटल्यांत अटक होईपर्यंत ते केवळ अेकाच ध्येयानें ( स्वातंत्र्याच्या ध्येयानें ) प्रेरित झाले होते, ही गोष्ट मी तुम्हांला सहज दर्शवूं शकेन. त्यांनीं बडोदा सोडल्यानंतर कलकत्त्याहून आपल्या पत्नीला जें पत्र लिहिलें किंवा जीं प्रकट भाषणें केलीं वा वृत्तपत्रांतून जे लेख लिहिले त्यांमधून तुम्हांस हेंच दिसून येअील कीं, अरविंदबाबू हे त्याच अेका स्वातंत्र्य-ध्येयानें प्रेरित झालेले होते. त्यांच्या कोणत्याहि भाषणांतून वा लेखांतून सांप्रतचें सरकार अशा मार्गानें अुलथून पाडण्याची पुसटदेखील चेतवणी दिलेली दिसत नाही. त्यांनीं कधींहि अत्याचारी मार्गांचा प्रचार केलेला नाही; तर अुलट सनदशीर मार्गानेंच – अनत्याचारी मार्गानेंच – आपण आपल्या देशस्वातंत्र्याचें ध्येय गांठलें पाहिजे

अशी त्यांची स्पष्ट शिकवण होती. जी गोष्ट बॉम्बस्फोटाने कधीहि घडून येणार नाही ती गोष्ट स्वातंत्र्याकरिता देशबांधवांनी भोगलेल्या हालअपेष्टांतून निर्माण होअील असा त्यांचा दृढ विश्वास होता. या दृष्टीने त्यांनी गुप्तमंडळांना नि त्यांच्या अत्याचारी मार्गाला नेहमी विरोधच केला. अेखादा सरकारी निर्बंध अन्याय्य वाटत असेल तर त्या निर्बंधाला सनदशीर मार्गानेच विरोध दर्शविला पाहिजे असें त्यांचें स्पष्ट मत होतें आणि तें त्यांनी वेळोवेळीं घोषितहि केलें होतें. अत्याचारी मार्गाचा अवलंब करावा अशी लिखित वा वाक्-घोषणा त्यांनी कधीहि केलेली नाही. असें असतांना अरविंद बाबूंच्या या सत्याग्रह चळवळीची सरकारी वकील मि. नॉर्टन यांच्याकडून कां हेटाळणी केली जावी, हें मला समजत नाही. अिंग्लंडच्या लोकांनी याच सत्याग्रही मार्गाचा वारंवार अवलंब केलेला आहे ही गोष्ट नॉर्टन यांना ठाअूक नाही काय? आपल्या हातांत हातकड्या पडेपर्यंत अरविंद बाबूंनी त्याच स्वातंत्र्यमार्गाचा निर्भयपणाने अवलंब केलेला आहे. 'तुमचा आत्मविश्वास जागृत करा. आत्मविश्वास जागृत झाल्याविना तुम्हांला मुक्ति लाभणार नाही.' ही त्यांची शिकवण असल्यामुळे त्याच शिकवणुकीच्या आधाराने त्यांनी आपल्या देशबांधवांना बजावलें की, "देशाचें स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याचा तुमचा विश्वास जागृत झाल्याशिवाय तुमच्या मातृदेशाला स्वातंत्र्यरूपी मुक्ति प्राप्त होणार नाही. तुमचें राष्ट्र केवळ षंढांचें राष्ट्र नाही: निर्बलांचें राष्ट्र नाही. तर तुमच्या राष्ट्राच्या पाठीशीं अुज्ज्वल अशी दैवी परंपरा आहे. ती परंपरा ध्यानीं घेअून तुमच्यामधील आत्मविश्वासाला तुम्ही आवाहन करा आणि त्या विश्वासाच्या जोरावर तुम्ही त्या ध्येयाप्रत – त्या स्वातंत्र्याच्या ध्येयाप्रत – दौडत जा. यश तुमचें आहे."

"अरविंदबाबू दुसऱ्या अेका भावनेने प्रेरित झालेले होते. त्यांचे अितर सर्व बांधव स्वदेशास जडवस्तु मानतात. तर दुसरे कित्येक लोक विस्तीर्ण मैदानें, शेतें, अरण्यें, पर्वत, नद्या यांचा समूह म्हणजे

स्वदेश समजतात. परंतु अरविंदबाबू आपल्या देशास मातेसमान लेखीत असत. त्यांच्या मताने नुसत्या राष्ट्रवादाला कोणताच अर्थ नव्हता. जेव्हा देशांतील लोकांना अखिल मानवतेची साक्ष पटेल त्याच वेळीं त्यांना स्वदेशाचा – राष्ट्रवादाचा अर्थ समजूं लागेल, अशी त्यांची पक्की भावना होती. केवळ क्षात्रबळावर त्यांचा कधींच विश्वास नव्हता. त्यामुळे त्यांच्या पत्रावर भलताच दोषारोप लादणें कधींहि अिष्ट होणार नाही. ”

आपल्या भाषणाचा समारोप करतांना ज्यूरीला अुद्देशून देशबंधु दास म्हणाले, “ ज्यांच्यावर अत्याचाराच्या आरोपावरून हा खटला भरण्यांत आलेला आहे, ते या न्यायमंदिरापुढेच नव्हे, तर जगाच्या न्यायमंदिरापुढे अुभे आहेत. बॉंबच्या अत्याचाराचा हा वाद संपल्यानंतर, सर्वत्र शांतता प्रस्थापित झाल्यावर व आज चळवळीचें जें अुग्र स्वरूप आपल्यापुढे थैमान घालीत आहे तें शांत झाल्यावर, फार काय, आरोपी या नात्याने आज आपल्यापुढे अुपस्थित असलेले अरविंद घोष हे अिहलोक सोडून गेल्यानंतर, अनेक वर्षांनी असा अेक काळ येअील की, ज्या वेळीं स्वातंत्र्याचा शाहीर, राष्ट्रधर्माचा प्रणेता व अखिल मानवजातीचा कल्याणकर्ता या नात्याने सर्व जग त्यांचे गोडवे गाअील व अत्यादरपूर्वक त्यांचें पुण्यस्मरण करील. त्यांच्यामागे असाहि अेक काळ येअील की, जेव्हा त्यांची दिव्य वाणी याच देशांत नव्हे, तर अखिल विश्वाच्या अणुरेणूंतहि सदैव दुमदुमत राहील. ”

देशबंधु चित्तरंजन दास यांच्या या जगप्रसिद्ध सर्वंकष भाषणाने अॅसेसरांच्या मनावर योग्य असाच परिणाम घडून आला; आणि अरविंदबाबू पूर्णतः निर्दोषी असल्याचें त्यांनी घोषित केलें.

आता खटल्यांतील सर्वांत महत्त्वाचा भाग न्यायमूर्ति बीचक्राफ्ट यांचा राहिला होता. देशांतील साऱ्या जनतेचें लक्ष न्यायमूर्तींच्या निर्णयाकडे लागलें होतें.

हा निर्णय घोषित करतांना त्यांच्यापुढे अनेक अडचणी अुभ्या होत्या. देशांतील राजकीय वातावरणाचा विचार करणें त्यांना आवश्यक होतें. हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य-ध्येय त्यांना स्वतःला – नव्हे, साऱ्या अिंग्रज लोकांना मान्य होतें, या गोष्टीची जाणीव ठेवणेंहि तितकेंच आवश्यक होतें. परंतु त्याहीपेक्षा सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अरविंद बाबूंचा या खटल्यांतील समावेश ही बाब त्यांनी प्रथम विचारांत घ्यायला हवी होती. किंबहुना या खटल्याला त्यांच्याचमुळे देशव्यापी महत्त्व प्राप्त झालें होतें. न्यायाचा कांटा कोणत्याहि बाजूला अनुकूलरीत्या वा प्रतिकूलरीत्या झुकूं देणें अिष्ट नव्हतें. अेकीकडे ब्रिटिश न्यायदानाच्या अुज्ज्वल परंपरेच्या खुर्चीत ते बसले होते. दुसरीकडे अरविंदबाबूंची देशव्यापी प्रतिष्ठा आणि त्यांची वैयक्तिक मैत्री त्यांच्यासमोर अुभी होती. काय योगायोग आहे पाहा. आय. सी. अेस्. च्या परीक्षेस न्या. बीचक्राफ्ट व अरविंद घोष हे दोघे अेकाच वेळीं बसले होते. दोघांनीहि ग्रीक भाषा घेतलेली होती; आणि मौज ही की त्या भाषेच्या परीक्षेंत अरविंदबाबू पहिले नि न्यायमूर्ति बीचक्राफ्ट हे दुसरे आले होते. त्याच अेके काळच्या सहाध्यायासमोर अरविंदबाबूंना आरोपी म्हणून अुभे राहावें लागलें होतें. या पूर्वस्नेहाचा विचार न्यायमूर्ति बीचक्राफ्ट यांच्यासमोर खचित अुभा राहिला असेल. परंतु न्यायदान करतांना त्या परंपरेचा निःपक्षपातीपणा पुरेपूर पाळला पाहिजे, हेंच धोरण न्यायमूर्तींनी स्वीकारलें. आपल्यासमोर आलेल्या पुराव्याची त्यांनी अुत्कृष्ट छाननी केली. सारा देश जरी या खटल्याचा निर्णय अैकण्यास अुत्सुक झाला होता, तरी या खटल्याचा निर्णय लिहिण्यास न्यायमूर्ति बीचक्राफ्ट यांनी अेक महिन्याचा अवधि मुद्दाम घेतला.

आणि अखेरीस दि. ६ मे १९०९ रोजीं त्यांनी या खटल्याचा निर्णय घोषित केला आणि अरविंदबाबू हे निर्दोषी असल्याचें प्रकट केलें.

अरविंदबाबू कारागृहांतून पुन्हा खुल्या जगांत अवतीर्ण झाले!

२ मे १९०८ रोजीं ते कारागृहांत येअून दाखल झाले आणि ६ मे १९०९ रोजीं ते कारागृहांतून बाहेर पडले! ही घटना सामान्य माणसाला मामुली अशीच वाटेल. परंतु अरविंदबाबूंच्या दृष्टीने या साध्या घटनेलाहि अत्यंत महत्त्व आहे. कारण आपल्या आयुष्यांत देशकार्याबरोबर जें दुसरें अेक ध्येय अरविंदबाबूंनी प्रिय मानलें होतें त्या ध्येयाची प्राप्ति त्यांना याच कारावासांत झाली. अीश्वरी साक्षात्कार व्हावा म्हणून बाहेर असतांना त्यांनी अविरत प्रयत्न केले. परंतु बाहेरच्या जगांत त्यांना अीश्वरी साक्षात्कार घडला नाही. तोच साक्षात्कार त्यांना तुरुंगांत असतांना झाला. अनिर्बंध जीवनापेक्षा नैर्बंधिक जीवनच त्यांना त्या दृष्टीने अुपयोगी पडलें. तुरुंगांत गेल्यापासून परमेश्वरप्राप्तीची त्यांना आत्यंतिक तळमळ लागून राहिली आणि रोजच्या रोज अनन्यभावाने ते त्याची करुणा भाकूं लागले. त्या वेळीं तेथे त्यांना दोन दृष्टान्त झाले. तुरुंगांतून बाहेर पडल्यानंतर ते दोन्ही दृष्टान्त त्यांनी स्वतःहून जगाला विशद करून सांगितलेले आहेत.

त्यांपैकी अेक दृष्टान्त असा होता –

"तुझ्यावर मी अेक कार्य सोपविलें आहे; आणि तें म्हणजे या आपल्या राष्ट्राचा अुद्धार करणें हेंच होय. लौकरच तुझी कारागृहांतून सुटका होअील. तुझ्याकडून मला कांही कार्य करून घ्यावयाचें आहे."

दुसरा दृष्टांत पुढीलप्रमाणे होता –

"अेक वर्षाच्या अेकांतवासांत ज्यासंबंधाने तुझें मन शंकित होअून राहिलें होतें, त्या हिंदुधर्माचें श्रेष्ठत्व किती आहे याची जाणीव तुला अंशतः करून देण्यांत आलेली आहे. अखिल जगापुढे या धर्माचें श्रेष्ठत्व मला ठेवावयाचें आहे. तेव्हा बाहेर पडल्यानंतर आपल्या देशबांधवांच्या मनावर अेक गोष्ट नेहमी ठसवीत जा व ती हीच की, सर्वांनी मिळून सनातन धर्माच्या अभिवृद्धीसाठी झटावें. हिंदुस्थानाने आपलें मस्तक अुन्नत करून सनातन धर्माचें महत्त्व वाढवावें व त्या धर्माला जगापुढे सन्मानाने आणावें हीच अिच्छा!"

अरविंदबाबूंना झालेल्या या दोन दृष्टान्तांपैकी अेक दृष्टान्त आज साकाररूप पावलेला आहे. देशाचा त्या मानाने अुद्धार होअून आपल्या देशाला स्वातंत्र्यप्राप्ति झालेली आहे. दुसरा दृष्टान्त मात्र अजून साकाररूप व्हावयाचा आहे. दुसऱ्या दृष्टान्ताप्रमाणे आपल्या हिंदु-धर्माचें – त्या सनातन धर्माचें – पूर्ववैभव अद्यापि वृद्धिंगत व्हावयाचें आहे. सांप्रतच्या धर्मातीत राज्यपद्धतींत सनातन हिंदुधर्माचें वैभव वृद्धिंगत होअील किंवा नाही याविषयी अनेकांच्या मनांत आशंका निर्माण होतील. परंतु त्यांचा अेक दृष्टान्त सत्यसृष्टींत अवतरलेला आहे ना ? मग ज्या अर्थी योगीराज अरविंद घोष यांचा अेक दृष्टान्त साकाररूप पावलेला आहे त्या अर्थी त्यांचा अुर्वरित दृष्टान्तहि साकाररूप पावणारच पावणार ! असा विश्वास बाळगण्यास कोणती हरकत आहे ? कारण कोणतीच दिव्य वाणी अगर दिव्य दृष्टान्त अर्धसत्य म्हणून या जगांत नांदत नसतात. कधी ना कधीतरी त्यांना पूर्ण सत्याचें रूप धारण करावेंच लागतें ! फक्त कांही काळाचाच काय तो प्रश्न असतो ! !

क्र. 7832

# मृत्युंजय दामोदर हरी चाफेकर : ८

त्या भीषण बातमीने सारें पुणें शहर अक्षरशः हादरून गेलें ! अनपेक्षितपणे अेखादा प्रचंड भूकंप व्हावा आणि त्यामध्ये लहान-मोठे वृक्ष अुध्वस्त होअून जावेत, त्याप्रमाणे साऱ्या पुणें शहराची अवस्था झाली. बालरवीच्या कोवळ्या किरणाबरोबरच त्या बातमीने प्रथम पुण्यांत प्रवेश केला आणि त्या किरणांच्या प्रखरतेबरोबरच त्या बातमीचीहि प्रखरता प्रतिक्षणीं वृद्धिंगत होअू लागली; आणि मौज ही की, संध्यासमयीं सूर्य अस्ताचलीं निघून गेला, परंतु ती बातमी मात्र मागेच राहिली.

वस्तुतः कल्पना-पंखाचा नुसता स्पर्श देखील होअू नये असेंच त्या बातमीचें स्वरूप होतें. त्यामुळे आधीच संकटग्रस्त झालेल्या लोकांना त्या वार्तेने चांगलाच हादरा दिला आणि आधीच निर्बल झालेलीं त्यांचीं मनें अधिकच निर्बल बनविलीं.

प्लेगचे प्रमुख अधिकारी मि. रँड आणि त्यांच्या समवेत ले. आयर्स्ट या दोघांचा आदल्या दिवशीं ( २२ जून १८९७ ) रात्रीं खून झाल्याची ती बातमी होती. महाराणी व्हिक्टोरिया यांच्या दीर्घ-कालपर्यंत टिकलेल्या राज्याची डायमंड ज्युबिली हा मुहूर्त साधून वध करणाऱ्या माणसाने त्या अैतिहासिक दिवसाचें जणुं स्मारकच करून ठेवलें होतें; आणि वज्रपाणि अिंद्राचा आश्रय घेणाऱ्या तक्षकाचा अिंद्रासह बळी अुच्चारणाऱ्या राजा जनमेजयाप्रमाणे त्या हत्यारी माणसाने रँडबरोबरच आयर्स्ट यांचा बळी नुसता अुच्चारलाच नव्हता, तर तो प्रत्यक्षांत घेतला होता.

ही हत्या करतांना हत्यारी माणसाची भूमिका विशुद्ध होती का अशुद्ध होती या प्रश्नाचा अूहापोह करण्यास पुण्यांतील जनतेचीं मनें मुळीच समर्थ नव्हतीं. कारण रँडशाहीच्या चरकांतून पुरेपूर पिळून

सारी जनता नुकतीच बाहेर पडली होती. १८९७ सालीं पुण्यांत प्लेगने कहर अुडवून दिला. प्लेगला टक्कर देण्यासाठी साताराचे असिस्टंट कलेक्टर मि. रँड यांची मुद्दाम नियुक्ति करण्यांत आली. प्लेगचें स्वरूप प्रखर म्हणून त्याला टक्कर देणारा अधिकारीहि प्रखरच असला पाहिजे म्हणून मि. रँड यांची ही नियुक्त झाली असावी. दि. १० फेब्रुवारीला मि. रँड हे आपल्या कामावर रुजू झाले. त्या दिवसापासून दि. १६ मेपर्यंत त्यांनी आणि त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनी पुण्यांतील जनतेचा अनन्वित तऱ्हेने छळ केला.

"प्लेगच्या नांवाखाली त्यांनी वाटेल त्या लोकांचीं घरें फोडलीं, त्यांच्या अिस्टेटीची हवी तशी विल्हेवाट लावली, मन मानेल त्या त्या ठिकाणीं धिंगाणा घातला, वाटेल त्यांचे हात धरले आणि त्यांना सेग्रिगेशन कँपमध्ये ओढीत नेलें; यावर अर्ज केले तर अर्जाची दाद घेतली नाही, फिर्यादींची पर्वा केली नाही, लोकांच्या तक्रारी धुडकावून लावल्या, सरकारी निर्बंध धाब्यावर बसविले, बाळंतिणींना रस्त्यावर ओढले, देव भ्रष्ट केले, अितकेंच नव्हे तर देव्हाऱ्यांतील पवित्र देवांचा अपहार केला, द्रव्याच्या तिजोऱ्या फोडल्या आणि पैसे मनसोक्त अुधळले, अुरलेले खिशांत टाकले, कोणत्याहि गोष्टीचें पावित्र्य ठेवलें नाही. पेटींतला पैसा गेला, फडताळांतले पापड विटाळले, दुभत्यांतील दही फस्त केलें, आजापणज्यापासून देव्हाऱ्यांत नित्य पूजा घेणारे देव फुटून चूर झाले किंवा भडभुंजाच्या दुकानीं छटाकाचें काम करूं लागले, कुणाच्याहि काकामामांस दहा जणांनी मिळून नागवें करावें आणि त्यांना नाचायला लावावें असे प्रकार केले; अेवढेंच नव्हे तर परमेश्वरासमान पवित्र मानलेल्या, लोकांच्या आया, बहिणी, लग्नाच्या बायका यांची हरअेक प्रकारें विटंबना केली."

परंतु परिस्थितीमुळे लोक अितके नेभळे नि भित्रे बनले होते कीं अेकहि मनुष्य या गोष्टींचा प्रतिकार करण्यासाठी पुढे येअीना. त्यांच्या मनगटांत ताकद अुरली नव्हती, अंगांत त्राण राहिला नव्हता.

अखेरीस मे महिन्याच्या प्रारंभीं प्लेग संपण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं; आणि दि. १६ मे या दिवशीं रँडसाहेबांच्या स्वाक्षरीची नोटीस प्रकट होअून प्लेगची तपासणी थांबण्याचें ठरलें. प्लेगच्या कहरांत बाहेर गेलेला गांव हळुहळु पुन्हा भरूं लागला. शहराचें औदासिन्य नाहीसें होअून जिकडे तिकडे थोडी टवटवी दिसूं लागली. पौरजनांचे व्यवहार सुरळित सुरू झाले. परमेश्वराने निसर्गतःच दिलेल्या विस्मृतीच्या शापानें किंवा वरामुळे लोक रँड-शाहीचे दुर्दिन लवकरच विसरून गेले आणि आपल्या ऐहिक आयुष्याचा पुढील मार्ग आक्रमूं लागले. संकटग्रस्त मार्गाची वाटचाल करून बाहेर पडल्यावर ज्या समाधानाने माणूस त्या आडवळणी मार्गाकडे बघतो त्याप्रमाणे पुण्यांतील जनतेची मनस्थिति झालेली होती. त्यांनी रँडसाहेबांच्या सुलतानी कारकीर्दीत अतोनात यातना भोगल्या होत्या. अशा प्रकारच्या दारुण यातना भोगल्यानंतर त्यांना आता स्वास्थ्य हवें होतें. सुखाची त्यांना अपेक्षा होती. परंतु कोण्या अेका अज्ञात दुष्ट शक्तीने त्यांचें हें सुखाचें ताट लाथाडून दिलें होतें आणि पुन्हा त्यांना संकटसन्मुख आणून अुभें केलें होतें.

रँड या व्यक्तीशीं त्यांचा जरी अुभा दावा होता तरी असा कांही भीषण प्रकार घडेल किंवा घडावा या गोष्टीची लोकांना यत्किंचितहि कल्पना नव्हती. त्यामुळे घडलेल्या प्रकाराने पुण्यांतील सारी जनता गोंधळून गेली. घाबरून गेली.

परंतु अनपेक्षितपणाचा पहिला बहर ओसरल्यानंतर त्यांच्यांतील कुतुहल जागृत झालें. जो तो झाल्या प्रकाराबद्दल तर्ककुतर्क करूं लागला.

जेव्हा खुनाची बातमी प्रकट झाली तेव्हा पोलिसांची नि सरकारी अधिकाऱ्यांची कल्पना झाली की हा खून कोणा ब्राह्मणाने केला असला पाहिजे; अुलट पुण्यांतील लोक म्हणूं लागले की खुनी अिसम हिंदी सैन्यांतील कोणी तरी फितुर असावा. खाजगी द्वेषामुळे हा खून झाला असला पाहिजे असाहि अंदाज कांहींनी बांधला. याशिवाय आणखी

अेक विचित्र तर्क प्रचलित होता. तो हा की पुण्याच्या कांही वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचें या खुनांत अंग आहे आणि बिचाऱ्या हिंदी जनतेवर संशय जाण्याकरिता राजकीय महोत्सवाचा दिवस त्यांनी या गोष्टीकरिता साधला असला पाहिजे.

सरकारचे नि जनतेचे हे असले तर्ककुतर्क चालू असतांनाच मंगळवार दि. २९ जून १८९७ रोजीं सकाळीं लोकमान्य टिळकांचा 'केसरी' प्रसिद्ध झाला. त्या अंकाच्या अग्रलेखांत या खुनासंबंधाने पुढील आशयाची माहिती प्रसिद्ध करण्यांत आली :—

"गेल्या मंगळवारीं रात्रीं ज्युबिलीनिमित्त गणेशखिंडींतील गव्हर्नरसाहेबांच्या राजवाड्यांत अेक मोठा खाना व खान्यास न बोलाविलेल्या पुष्कळ अितर मंडळींकरिता स्वागतसमारंभ होता. गणेशखिंडीभोवतालच्या सर्व टेकड्यांवरून ज्युबिली समारंभाकरिता मुद्दाम मोठमोठे जाळ केलेले होते; व गव्हर्नमेंट हाअूसमध्येहि चांगली रोषणाअी केली होती. या समारंभाकरिता गव्हर्नमेंट हाअुसमध्ये त्या दिवशीं फारच गर्दी झाली होती; व सर्व बेत फार अुत्कृष्ट प्रकारचा ठेवला होता. सुमारे साडेअकरा वाजल्यापासून गव्हर्नरसाहेबांची पाहुणे मंडळी परत जावयास निघाली. बारा वाजल्यानंतर कांही मिनिटांनी रँडसाहेब तेथून आपल्या गाडींत बसून निघाले. त्यांच्यापुढे मुंबअीचे केमिकल अॅनलायझर डॉ. बॅरी यांची गाडी होती; व मागाहून ले. आयर्स्ट व त्यांची पत्नी यांची आणि त्यांच्यामागे ले. लुअिस व सार्जंट यांच्या मिळून दोन गाड्या होत्या. ले. लुअिस व सार्जंट यांच्या गाडीचा घोडा हळू चालला होता. तो त्यांस न आवडून त्यांनी गाडीवाल्यास गाडी लौकर हाकावयास सांगितली; व ते पुढे निघून गेले. नंतर राहिलेल्या तीन गाड्या गव्हर्नमेंट हाअूस सोडून सुमारे पांचसहाशे यार्ड पुढे आल्यावर तेथे कोणी अिसमाने रँडसाहेबांच्या गाडीच्या मागे चढून त्यांजवर छऱ्यांनी भरलेलें पिस्तुल डाव्या खांद्याजवळ पाठीमागे

झाडलें; त्यामुळे ते तत्काळ बेशुद्ध होऊन पडले. नंतर थोड्या सेकंदांनी दुसरा बार झाला; व त्याने मागच्या गाडींतील ले. आयर्स्ट यांचा जागच्याजागीं प्राण घेतला. ले. आयर्स्ट यांच्या डोक्यांतून गोळी पार निघून गेली व ते आपल्या बायकोच्या अंगावर पडले. हे दोन्ही बार सर्वांच्या पुढे डॉ. बॅरी होते त्यांनी व ले. आयर्स्ट यांच्या बायकोनें अैकले. बाराच्या आवाजाने घोडे बुजून गाड्या भरधांव सुटल्या. त्यांत ले. आयर्स्ट यांची गाडी पुढे होअून ती सर्वांच्या पुढे गेलेल्या ले. लुअिसच्या गाडीवरून जात असतां ले. लुअिस यांनी ले. आयर्स्ट यांच्या बायकोची ओरड अैकून गाडी थांबविली; आणि पाहतात तों आंत ले. आयर्स्ट जखमी होअून बेशुद्ध पडले आहेत. अितक्यांत रँड यांची गाडी तेथें आली. तेव्हा त्या गाडींत कोणी डॉक्टर भेटेल यां समजुतीने ले. लुअिस यांनी आतल्या मनुष्यास विचारलें व तो अुत्तर देअीना तेव्हा निजला असेल म्हणून गुडगा हालविला. तेव्हा तो कण्हावयास लागला म्हणून पाहतात तों रँडसाहेब जखमी होअून आंत बेशुद्ध पडले आहेत. नंतर ले. आयर्स्ट यांच्या पत्नीस गाडींतून काढून घेअून दोघांहि जखमी गृहस्थांस त्यांच्या गाड्यांतून ससून हॉस्पिटलांत पाठविलें. ही मंडळी हॉस्पिटलांत पोहोचली तेव्हा अेक वाजण्यास कांही थोडीं मिनिटें कमी होतीं. तेथे गेल्यावर डॉक्टरांनी तपासणी केली. त्यांत ले. आयर्स्ट यांचा प्राण गेला होता असें आढळून आलें. रँडसाहेबांस जबर जखम होअून ते बेशुद्धींतच होते." पुढे अकरा दिवस ते मृत्यूशीं झुंजत होते. अखेरीस सर्व डॉक्टरी अुपाय थकल्यानंतर शुक्रवारीं ३ वाजून १८ मिनिटांनी त्यांचा अिस्पितळांत अंत झाला.

खुनाच्या दुसऱ्या दिवशीं म्हणजे बुधवारीं सकाळीं ज्या ठिकाणीं खून झाला त्याच्या आसपासची जागा पोलिसांनी तपासली, तेव्हा सडकेखालील मोरींत अेके ठिकाणीं त्यांना दोन तलवारी, अेक बाटली व अेक दगड सांपडला. यापेक्षा खुनी मनुष्य सांपडण्याचीं अधिक

साधनें अुपलब्ध झालीं नाहीत. मुंबअीचे गुप्तचर-प्रमुख मि. ब्रुअीन-साहेब यांना मुद्दाम पुण्याला आणण्यांत आलें आणि त्यांच्या हातीं तपासाचीं सूत्रें देण्यांत आलीं. त्याशिवाय गुन्हेगार आणि त्यांस अुत्तेजन देणाऱ्यास धरून देणारास वीस हजार रुपयांचें बक्षिस सरकारनें घोषित केलें. स्थानिक पोलिसांकडूनहि चौकशीस जारीने प्रारंभ झाला.

परंतु गुन्हेगार सांपडण्याचें चिन्ह कांही केल्या दिसेना. झाल्या प्रकारानें सरकारचें डोकें मुळींच ठिकाणावर राहिलें नाही. दि. २२ ला रँडसाहेबांचा खून झाला. त्या रात्रीपासूनच हा खून राजकीय गुप्त मंडळ्यांच्या मार्फत झाला असला पाहिजे असें सरकाराच्या मनानें पक्के घेतलें. खून झाल्यानंतर बरोबर पांचव्या दिवशीं पुण्याचे कलेक्टर लँबसाहेब यांनी पुण्यांतील प्रमुख लोकांची अेक सभा बोलाविली आणि त्या सभेंत त्यांनी आपल्या वरील संशयाचें गरळ ओकलें.

लँबसाहेबांनी नागरिकांच्या त्या सभेंत पुढील गोष्टी ध्वनित केल्या :–

"हे भयानक खून ज्या रीतीने करण्यांत आले त्या रीतीवरून पूर्वी काळजीपूर्वक रचनेला व्यूह ह्या खुनांच्या पायथ्याशीं असला पाहिजे असें स्पष्ट दिसतें."

"राजद्रोह आणि खून माजविणाऱ्या गुप्त मंडळ्यांचें हें भयंकर कृत्य व हा कट हीं अुघडकीस येतील. अशा प्रकारचा कट या शह-रांत आहे, तो चव्हाट्यावर आणला पाहिजे व त्याची सार्वत्रिक निंदा होअील अशी व्यवस्था केली पाहिजे."

"तुमच्यापैकी कांही लोक बेबंदशाहीचें बी चहूंकडे पसरण्यांत आपलें आयुष्य खर्च करीत आहेत."

"ज्यांचे लेख राजद्रोहानें ओथंबलेले असतात व ज्यांच्या कृतींत खुनाशिवाय दुसरें कांही मिळावयाचें नाही अशा राजकीय चळवळ करणाऱ्या रखरखलेल्या निखाऱ्यांना कायमचें विझविण्याची तुमच्या अंगांत शक्ति आहे."

शेवटचे दोन अुल्लेख अर्थात् लोकमान्य टिळक नि त्यांचा ज्वलज्ज-

हाल 'केसरी' यांनाच अुद्देशून होते. त्यामुळे यां खुनांचें लोण लो. टिळकांच्या दारापर्यंत पोचतें की काय अशी भीति निर्माण झाली. लोकमान्य टिळकांसारख्या राजकीय संताला अेका क्षणांत खुनी सैतान बनविण्याची सरकाराने आपल्यापरीने पराकाष्ठा केली. परंतु देशाच्या बलवत्तर सुदैवामुळे तो प्रसंग टळला.

चाफेकरांना या गोष्टीची पुरेपूर कल्पना असली पाहिजे. आपल्यासाठी लोकमान्यांना निष्कारण त्रास भोगावा लागेल ही कल्पना मनांत येअून त्यांचें अंतःकरण तिळतिळ तुटलें असेल. अशांतच १८९७ चा ऑगस्ट महिना निघून गेला. सप्टेंबर अुगवला तो फितुरीची – दगलबाजीची ध्वजा हातांत घेअूनच ! त्या महिन्याच्या प्रारंभीं पुण्यांतील द्रविड-बंधूंनी कोणा चाफेकर बंधूंचीं नांवें घेतली; आणि त्याला अनुसरून प्रथम दामोदर हरी चाफेकर यांस अटक करण्यांत आली. दि. ८ ऑक्टोबरला त्याला मुंबअीचे प्रे. मॅजिस्ट्रेट हॅमिल्टन यांच्यापुढे अुभे करण्यांत आलें. त्यांच्यासमोर दामोदराने विस्तृत असा कबुली जबाब दिला. रँडच्या खुनाच्या मान्यतेबरोबरच त्याने अितरहि अनेक गोष्टी मान्य केल्या. धर्मांतर केलेल्या हिंदूंना मींच ठोक दिला, मुंबअींतील राणीच्या पुतळ्यावर मीच डांबर फासलें व गळ्यांत जोड्यांची माळ घातली. विश्वविद्यालयाचा मंडप मीच जाळला अित्यादि गोष्टी सांगून त्याने पुढे सांगितलें की, " पुण्यांत प्लेगच्या कहरांत सोजीर लोकांनी केलेले अत्याचार पाहून मला त्वेष आला व त्यांचा प्रमुख अधिकारी रँडसाहेब याला ठार करून सूड अुगविण्याचा मी निश्चय केला त्याला मारण्याचे अनेक प्रयत्न फसल्यानंतर अखेरीस ज्युबिलीच्या दिवशीं दिवसभर अीश्वरप्रार्थना करून व हत्यारें समवेत घेअून मी व माझा भाअू बाळकृष्ण असे गणेशखिंड रस्त्यावर गेलों; मी रँडसाहेबाला गोळी घातली व बाळकृष्णाने ले. आयर्स्ट याला ठार केलें. पुढे हत्यारें नाल्यावरील पुलाखाली झांकून ठेवून आम्ही कालव्याच्या रस्त्याने परत आलों. "

ज्या दामोदर चाफेकरानें खुनासारखें कृत्य निधड्या छातीने पार पाडलें, त्याच चाफेकराने वरीलप्रमाणें सहजासहजी कबुलीजबाब दिला असेल ही गोष्ट मुळीच शक्य वाटत नाही. किंबहुना ज्या परिस्थितींत त्याने हा कबुलीजबाब दिला त्या दारुण परिस्थितीचें सुस्पष्ट दिग्दर्शन दामोदर चाफेकर याने येरवड्याच्या कारागृहांतून मुंबअी हायकोर्टाला केलेल्या दीर्घ आवेदनांत केलेलें आहे. त्यावरून हा कबुलीजबाब त्याच्याकडून वदवून घेण्यांत पोलिसांनी काय काय दुष्ट करामती केल्या त्याचें स्पष्ट चित्र डोळ्यापुढे अुभें राहतें.

दामोदर चाफेकर याला मुंबअीहून तपासासाठी पुण्याला आणल्यानंतर सुभेदार रोशनअली, रामा पांडु व सदावर्ते या पोलिसांनी त्याला बेदम मारलें. अितकें की, त्याच्या कानाला दुखापत होअून तो कायमचा अधू झाला. तरीहि त्यांचा मार चालूच होता. त्यानंतर पोलिसांनी त्याला अशीहि धमकी दिली की, "टिळक, नातू, जोगळेकर, मायदेव यांची जशी स्थिति आम्ही केली तशीच तुझीहि करूं." प्रथम कांही दिवस याहि परिस्थितीपुढे दामोदराने तग धरला; परतु पुढे मार जसजसा असह्य होअूं लागला तेव्हा, 'सांगाल ती कबुली देतों,' असें दामोदरने सांगितलें. त्याच्या त्या वचनाने पोलिसांना केवढा धीर आला! त्यांनी लगोलग खोटा पुरावा तयार करण्यास प्रारंभ केला. सदावर्ते व भिडे या पोलिस शिपायांनी त्याला विचारलें की, "तुझ्या घराजवळ अेखादी विहीर आहे काय?" आपल्या घराशेजारीं लोंढ्यांच्या आवारांत विहीर आहे, असें दामोदराने सांगितलें. नंतर दोन-तीन दिवसांनी ती विहीर पोलिसांना दाखविण्याचा प्रसंग त्याच्यावर आला. बरेच पोलीस अधिकारी तो तमाशा बघण्यास अुपस्थित होते. दामोदरला दूरवर अुभे करून त्यांनी त्या विहिरींतून अेक गठ्ठा बाहेर काढला. तो गठ्ठा हत्यारांचा होता. लगेच त्यांची यादी बनवून गांवढळ पंचांसमक्ष त्या वस्तूंचा पंचनामा झाला. नंतर दामोदरला पुन्हा फरासखान्यांत आणण्यांत आलें. तेव्हा त्याला

पोलिसांचें कपटकारस्थान समजून आलें. परंतु तें समजून आता कांहीच अुपयोग नव्हता. वेळ निघून गेली होती. त्यानंतर अेक दिवस अुपरोक्त सदावर्ते व भिडे त्याच्याजवळ गेले व म्हणाले, “ दारू, छर्रे वगैरे गोष्टी तूं कधी बघितल्या आहेस का ? ” दामोदरने होकारार्थी अुत्तर देतांच पुढचा प्रश्न आपोआपच अुद्भवला, “कोठे ? ” दामोदरने अुत्तर दिलें, “ मी व बाळकृष्ण असे दोघे कच्छरे पाटील यांच्या मळ्यांत गुऱ्हाळास गेलों होतों, तेथे दारू व छर्रे पाहिले. गेल्या फाल्गुनांत प्लेगच्या वेळीं आम्ही सर्व खडकीस राहावयास गेलों होतों. तेथे आमच्या घराजवळील बागेंत शिकार करण्याकरिता जोन्स नांवाचा अेक खिस्ती मनुष्य येत असे. त्याच्या बंदुकीचीं कॅप्स पाहिलीं होतीं. ” नंतर पोलिसांनी दामोदरला तीं घरें दाखवावयास सांगितलें. नाअिलाजास्तव दामोदरने तीं दाखविलीं. नंतर कच्छरे याला पोलिसांनी असें खोटेंच सांगितलें की, “ हा मनुष्य तुझी दारू व छर्रे चोरले म्हणतो.” कच्छरे पाटलाचा पोलिसांच्या बोलण्यावर विश्वास बसेना. पण त्याचा परवाना रद्द करण्याची पोलिसांनी त्याला धमकी दिल्यामुळे तो पाटील दामोदरच्या विरुद्ध साक्ष देण्यास तयार झाला. तीच गोष्ट कांही अंशीं जोन्सच्या बायकोची झाली. नंतर गणेशखिंड, सेंट मेरी चर्च, क्लब, पिवळा बंगला, रँडसाहेबांची खोली अित्यादि ठिकाणें पोलिसांनी दामोदरला दाखविलीं; व त्या त्या ठिकाणचा खोटा पुरावा तयार केला. दर शुक्रवारीं दामोदर चतुःशृंगीच्या दर्शनास जात असे. बावीस जूनच्या पूर्वीच्या शुक्रवारींहि तो दर्शनास गेला होता. येतांना जवळच्या मिशनच्या मुलींना पाण्यांत खेळतांना त्याने पाहिलें होतें. त्यांच्याशीं त्याची कांही बोलाचालीहि झाली होती. पोलिसांनी त्यावर लगेच पुराव्याची अिमारत रचली व त्या मुलींना पढवून साक्षीसाठी न्यायालयांत आणलें.

याप्रमाणे सर्व साक्षीदारांना फरासखान्यांत आणून पोपटाप्रमाणे त्यांना पढविलें आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत अुभे केलें.

त्यानंतर पोलिसांनी दामोदरला त्याच्या घरीं नेलें; व पंच न बोलावतां त्यांना हवे ते जिन्नस त्यांनी त्याच्या घरांतून काढले. त्यानंतर विहिरींत सांपडलेल्या दोन बंदुका रामा पांडू या शिपायाने गस्तवाल्या शिपायांकडून मारुतीच्या देवळांतून चोरविल्या. पुराव्यांत दाखल केलेलें अेक पिस्तुल तर अक्षरशः निकामी होतें. ही सारीं हत्यारें शनिवारवाड्यांतून पैदा करण्यांत आलीं. दामोदरच्या घरांतील अेका जुनाट माळयावरून बंदुकीच्या नळया हस्तगत करण्यांत आल्या. तो माळा चाफेकरांच्या वापरांत मुळीच नव्हता.

अशा तऱ्हेने खोट्या पुराव्याची जय्यत तयारी केल्यानंतर दामोदर हरि चाफेकर याचा खटला न्यायालयाची वाटचाल करूं लागला. आपल्याच अेका देशबांधवाचा आपल्या अशा नीच कृत्यांनी आपण गळा कापीत आहोंत याची यत्किंचितहि दिक्कत पोलिस खात्यांत त्या वेळीं काम करणाऱ्या लोकांनी ठेवली नाही. पोलिसप्रमुख ब्रुअीनसाहेब याची गोष्ट सोडली तर सुभेदार रोशनअल्ली, रामा पांडू किंवा सदावर्ते हे पोलीस अधिकारी अेकाच हाडामांसाचे होते ना? मग दामोदरचा विश्वासघात करण्यास ते प्रवृत्त कां झाले? आपल्या पोटाची टिचभर खळगी भरण्यासाठी ते लोक या विश्वासघातास प्रवृत्त झाले असले पाहिजेत. या अुत्तराशिवाय दुसरें समर्थन त्यांच्याजवळ नव्हतें. टिचभर पोटाची खळगी भरण्याकरिता चाफेकरांसारख्या थोर देशभक्ताचा विश्वासघात करणें ही गोष्ट कितपत सयुक्तिक होती? परंतु हा प्रश्न विचारण्याचें धैर्य किंवा त्या प्रश्नाला अुत्तर देण्याचा प्रांजळपणा त्या वेळीं अुत्पन्न होणें कठीण होतें. कांही कालाचा महिमाच असा असतो की, त्या वेळीं असल्या प्रकारचे प्रश्न किंवा असल्या प्रकारचीं अुत्तरें अुत्पन्नच होअूं शकत नाहीत. त्याप्रमाणे तीं त्याहि काळीं अुत्पन्न झालीं नाहीत.

आणि अशा तऱ्हेने बुधवार दि. ३ नोव्हेंबर १८९७ रोजीं दामोदर चाफेकर यांजवरील खटला प्रारंभित झाला. पुण्याचे अॅक्टिंग

कलेक्टर मि. अे. आर. बोनस यांच्यापुढे हा खटला पुण्याच्या फरासखान्यांत चालू झाला. सरकारच्या वतीने मि. निकलसन हे काम चालवीत होते; व श्री. व्यंकटराव रामचंद्र पब्लिक प्रॉसिक्यूटर हे त्या वेळीं अुपस्थित होते. खटला फरासखान्यांत चालल्यामुळे मॅजिस्ट्रेट, वकील, पोलीस व वर्तमानपत्रांचे बातमीदार यांखेरिज खटला अैकण्याची दुसऱ्या कुणालाहि अनुज्ञा नव्हती. रेशीमकाठी धोतर, अैटबाज फेटा आदीकरून सरदारी पोषाख आरोपीने केला होता. त्याने जेव्हा न्यायालयांत प्रवेश केला तेव्हा साऱ्या लोकांचे डोळे त्याच्यावर खिळून राहिले. दामोदरच्या चेहेऱ्यावर चिंतेचीं किंवा धास्तीचीं चिन्हें तिळमात्रहि दिसत नव्हतीं. अुलट अेक प्रकारचें निर्वाणाच्या वेळचें तेज त्याच्या चेहेऱ्यावर विलसत होतें. मॅजिस्ट्रेटसाहेबांच्या शेजारीं अेका टेबलावर दोन हेन्री मार्टीन बंदुका, सोन्या-रुप्याच्या मुलाम्याच्या तीनचार तरवारी, मोडकीं-तोडकीं तरवारीचीं कांही पातीं, अेक कुऱ्हाड, पिस्तुल, कांही गोफणी, दगड, फडकीं, पोतीं, नवारीचे तुकडे अित्यादि जिन्नस पुराव्यासाठी मांडले होते.

खटल्याच्या प्रारंभीं सरकारी वकील मि. निकलसन् यांनी खुनाची सारी माहिती सांगितली, आरोपीचा गुन्हा विशद करून सांगितला आणि हा खटला 'सेशनकमिट' करावा अशी कोर्टाला विनंती केली. यानंतर पढवलेले चौदा साक्षीदार तपासण्यांत आले; नंतर पोलिस तपासणीसाठी मि. निकलसन् यांनी आणखी पंधरा दिवसांची मुदत मागून घेतली. ती मान्य होअून मॅजिस्ट्रेटसाहेबांनी पंधरा दिवस खटला स्थगित केला.

खालच्या कोर्टाचें काम संपलें आणि खटला सेशनकमिट झाला. सोमवार दि. ३१ जानेवारी १८९८ या दिवशीं सकाळीं ११ वाजतां पुणें येथील सेशन कोर्टात ना. क्रोसाहेब यांच्यापुढे दामोदरच्या चौकशीस प्रारंभ झाला. श्री. अिच्छारामभाअी भगवान-

दास, श्री. बळवंत हरी चिपळूणकर, मि. आगस्टस, श्री. मुळे, मि. धनजी शा ही मंडळी ज्यूरींत बसली. सरकारच्या वतीने बॅरिस्टर अंडरसन् व निकलसन् हे अुपस्थित होते. आरोपीचें वकीलपत्र मि. बोमनजी मास्तर या पारशी गृहस्थाने घेतलें. खटल्याच्या प्रारंभीं दामोदरने कोर्टास तीन सूचना केल्या. ( १ ) फरासखान्यांत आणल्यापासून मला कमी अैकूं येअूं लागलें आहे. तेव्हा कोर्टाचें काम मोठ्याने व स्पष्टपणें चालावें; ( २ ) मला अिंग्रजी येत नाही, तेव्हा सर्व काम मला मराठींत समजून द्यावें; आणि ( ३ ) माझा पाय जन्मतःच अधू आहे, तेव्हा मला बसावयास खुर्ची मिळावी.

कोर्टाने दामोदर यांस अुभे न राहतां खाली जमिनीवर बसण्याची अनुज्ञा दिली.

नंतर दामोदर यांजवर रँडसाहेबांच्या खुनाचा व आयर्स्टसाहेबांच्या खुनास सहाय्य केल्याचा आरोप ठेवण्यांत आला. हे आरोप वाचून दाखविल्यानंतर आरोपीने गुन्हा अमान्य केला.

सरकारच्या वतीने बॅ. अंडरसन यांनी लांबलचक भाषण करून आरोपीने कसा गुन्हा केला आहे हें पटवून देण्याचा परोपरीने प्रयत्न केला. मग सरकाराच्या वतीने अेकंदर तेवीस साक्षीदार तपासण्यांत आले. त्या सर्वांनी पोपटपंचीचें कार्य अुत्कृष्ट प्रकारें पार पाडलें.

त्यानंतर आरोपीने आपला जबाब दिला. जबाब देतांना दामोदरने कोर्टास अशी विनंती केली की, “ माझी हकीकत साद्यंत अैकून घ्यावी. मी सांगतों ती हकीकत अैकून घेतल्यावर कोर्टाने पाहिजे ते प्रश्न मला विचारावेत. ” अशी प्रस्तावना केल्यावर आरोपीने हकीकत सांगण्यास प्रारंभ केला. पण कोर्टाने त्याला बोलूं दिलें नाही. खटल्याच्या चवथ्या दिवशीं अुभय पक्षांच्या वकिलांचीं भाषणें झाल्यावर दामोदरने कोर्टाला पुन्हा तीच विनंती केली, पण कोर्टाने ती पुन्हा धुडकावून लावली. कोर्ट विचारील तेवढ्याच प्रश्नांस

कलेक्टर मि. अे. आर. बोनस यांच्यापुढे हा खटला पुण्याच्या फरासखान्यांत चालू झाला. सरकारच्या वतीने मि. निकलसन हे काम चालवीत होते; व श्री. व्यंकटराव रामचंद्र पब्लिक प्रॉसिक्यूटर हे त्या वेळीं अुपस्थित होते. खटला फरासखान्यांत चालल्यामुळे मॅजिस्ट्रेट, वकील, पोलीस व वर्तमानपत्रांचे बातमीदार यांखेरिज खटला अैकण्याची दुसऱ्या कुणालाहि अनुज्ञा नव्हती. रेशीमकाठी धोतर, अैटबाज फेटा आदीकरून सरदारी पोषाख आरोपीने केला होता. त्याने जेव्हा न्यायालयांत प्रवेश केला तेव्हा साऱ्या लोकांचे डोळे त्याच्यावर खिळून राहिले. दामोदरच्या चेहेऱ्यावर चिंतेचीं किंवा धास्तीचीं चिन्हें तिळमात्रहि दिसत नव्हतीं. अुलट अेक प्रकारचें निर्वाणाच्या वेळचें तेज त्याच्या चेहेऱ्यावर विलसत होतें. मॅजिस्ट्रेटसाहेबांच्या शेजारीं अेका टेबलावर दोन हेन्री मार्टीन बंदुका, सोन्या-रुप्याच्या मुलाम्याच्या तीनचार तरवारी, मोडकीं-तोडकीं तरवारीचीं कांही पातीं, अेक कुऱ्हाड, पिस्तुल, कांही गोफणी, दगड, फडकीं, पोतीं, नवारीचे तुकडे अित्यादि जिन्नस पुराव्यासाठीं मांडले होते.

खटल्याच्या प्रारंभीं सरकारी वकील मि. निकलसन् यांनी खुनाची सारी माहिती सांगितली, आरोपीचा गुन्हा विशद करून सांगितला आणि हा खटला ' सेशनकमिट ' करावा अशी कोर्टाला विनंती केली. यानंतर पढवलेले चौदा साक्षीदार तपासण्यांत आले; नंतर पोलिस तपासणीसाठी मि. निकलसन् यांनी आणखी पंधरा दिवसांची मुदत मागून घेतली. ती मान्य होअून मॅजिस्ट्रेटसाहेबांनी पंधरा दिवस खटला स्थगित केला.

खालच्या कोर्टाचें काम संपलें आणि खटला सेशनकमिट झाला. सोमवार दि. ३१ जानेवारी १८९८ या दिवशीं सकाळीं ११ वाजतां पुणें येथील सेशन कोर्टांत ना. क्रोसाहेब यांच्यापुढे दामोदरच्या चौकशीस प्रारंभ झाला. श्री. अिच्छारामभाअी भगवान-

दास, श्री. बळवंत हरी चिपळूणकर, मि. आगस्टस, श्री. मुळे, मि. धनजी शा ही मंडळी ज्यूरींत बसली. सरकारच्या वतीने बॅरिस्टर अंडरसन् व निकलसन् हे अुपस्थित होते. आरोपीचें वकीलपत्र मि. बोमनजी मास्तर या पारशी गृहस्थाने घेतलें. खटल्याच्या प्रारंभीं दामोदरने कोर्टास तीन सूचना केल्या. ( १ ) फरासखान्यांत आणल्यापासून मला कमी अैकूं येअूं लागलें आहे. तेव्हा कोर्टाचें काम मोठ्याने व स्पष्टपणें चालावें; ( २ ) मला अिंग्रजी येत नाही, तेव्हा सर्व काम मला मराठींत समजून द्यावें; आणि ( ३ ) माझा पाय जन्मतःच अधू आहे, तेव्हा मला बसावयास खुर्ची मिळावी.

कोर्टाने दामोदर यांस अुभे न राहतां खाली जमिनीवर बसण्याची अनुज्ञा दिली.

नंतर दामोदर यांजवर रँडसाहेबांच्या खुनाचा व आयर्स्टसाहेबांच्या खुनास सहाय्य केल्याचा आरोप ठेवण्यांत आला. हे आरोप वाचून दाखविल्यानंतर आरोपीने गुन्हा अमान्य केला.

सरकारच्या वतीने बॅ. अंडरसन यांनी लांबलचक भाषण करून आरोपीने कसा गुन्हा केला आहे हें पटवून देण्याचा परोपरीने प्रयत्न केला. मग सरकाराच्या वतीने अेकंदर तेवीस साक्षीदार तपासण्यांत आले. त्या सर्वांनी पोपटपंचीचें कार्य अुत्कृष्ट प्रकारें पार पाडलें.

त्यानंतर आरोपीने आपला जबाब दिला. जबाब देतांना दामोदरने कोर्टास अशी विनंती केली की, “ माझी हकीकत सार्यंत अैकून घ्यावी. मी सांगतों ती हकीकत अैकून घेतल्यावर कोर्टाने पाहिजे ते प्रश्न मला विचारावेत. ” अशी प्रस्तावना केल्यावर आरोपीने हकीकत सांगण्यास प्रारंभ केला. पण कोर्टाने त्याला बोलूं दिलें नाही. खटल्याच्या चवथ्या दिवशीं अुभय पक्षांच्या वकिलांचीं भाषणें झाल्यावर दामोदरने कोर्टाला पुन्हा तीच विनंती केली, पण कोर्टाने ती पुन्हा धुडकावून लावली. कोर्ट विचारील तेवढ्याच प्रश्नांस

आरोपीने अुत्तर दिलें पाहिजे असें कोर्टाने ठरविलें; आणि आरोपी-कडून आपल्या सोयीप्रमाणे जबाब वदविला.

आरोपीची जबानी संपल्यावर कोर्टाने ज्यूरीस खटला समजावून दिला. ज्यूरीने दीर्घ काल विचार करून आरोपीला दोषी ठरविलें.

क्रोसाहेबांनी दामोदरकडे पाहून त्याला फाशीची शिक्षा फर्मावली. पण त्याच्या शांत नि निश्चयी मुद्रेंत यत्किंचितहि फरक पडला नव्हता. जणुं अेखादी सुवार्ता आपण अैकत आहोंत अशा आविर्भावाने दामोदरने क्रोसाहेबांकडे हसत बघितलें आणि म्हटलें, "बस्स! फक्त फांशीच! याहून अधिक शिक्षा आहे काय?"

या शिक्षेनंतर दामोदर चाफेकर याच्या वतीने हायकोर्टांत अपील करण्यांत आलें. हें अपील वकिलाने केलें नसून खुद्द दामोदरने हें अपील लिहिलें.

बुधवार दि. २ मार्च १८९८ रोजीं हायकोर्टांत या अपिलाची सुनावणी होणार होती. तत्पूर्वी अेरवड्याच्या तुरुंगांतून दामोदर चाफेकराने मुंबअी हायकोर्टाला अेक लांबलचक पत्र सादर केलें. त्या पत्रांत आपण व आपला भाअू बाळकृष्णा निरपराधी असून आपल्या-विरुद्ध पोलिसांनी हा सारा खोटा बनाव रचला असें म्हटलें आहे. आपल्याविरुद्ध खोटा पुरावा कसा तयार केला याचें स्पष्टीकरण करून दामोदरने त्या पत्रांत पुढे लिहिलें, "मी भिक्षुक ब्राह्मणाचा मुलगा आहें. माझें वय २७ वर्षे आहे. माझ्या आयुष्यांत मी राजद्रोही सभेला कधी गेलो नाही, राजद्रोही भाषण केलें नाहीं, किंवा राजद्रोही लेख लिहिला नाही. मुलें तरुणपणीं दंगामस्ती करतात, तशाहि प्रकारची दंगामस्ती केलेली आठवत नाही. ब्राह्मणांचीं मुलें तालीम व कुस्ती करतात, पण तीहि संवय आम्हां बंधूंना नाही. आम्ही अिंग्रजी शिकलों नाही. मराठी तिसऱ्या पुस्तकांहून अधिक आम्ही शिकलों नाही. वडील कीर्तन करीत असतां आम्ही तबला पेटी वाजवीत होतों, व आम्ही कधी कधी कीर्तनहि करीत होतों. याप्रमाणे कसाबसा चरि-

तार्थ चालविला होता. आम्ही अशिक्षित, अशक्त, भित्रे व आळशी आहोंत. पोलिसांनी आम्हांस किती भयंकर स्वरूप दिलें आहे हें नाम-दारांच्या ध्यानांत येअीलच. बंदूक कशी वापरावी याची मला कांही माहिती नाही. असें असतां निशाण मारण्यांत पटाअीत अशा लष्करी सैनिकालाहि जें काम करणें कठीण पडेल तें कृत्य मज गरिबावर लाद-ण्यांत पोलीसांनी किती अन्याय केला आहे बरें ! मी भित्रा असून पोलीस म्हणतें मी शूर आहें. आळशाला अुद्योगी, मठ्ठाला हुषार, राजकीय चळवळ ठाअूक नसणाराला राजकीय चळवळ करणारा, बंदूक पिस्तुल माहीतहि नाही, त्याला अुत्तम निशाण मारणारा, अशा रीतीने पोलिसने माझें चित्र रेखाटलें आहे. केवळ आम्ही दोन बंधुच जर स्वदेशाभिमानी होतों तर अितकीं पुष्कळ शस्त्रें आम्हांस घेअून काय करावयाचें होतें ? आमचें घरहि असें नाही की त्यांत गुप्तपणे अितकीं हत्यारें ठेवतां येतील ! ''

यानंतर दामोदरने नीलकंठ द्रवीड याने दिलेल्या खोट्या साक्षीची विस्तृत छाननी केली. पोलिस अधिकारी मि. ब्रुअीन नि केनेडी यांनी दिलेल्या खोट्या वचनांचा नि दर्शविलेल्या आमिषांचा अुल्लेख केला आणि पुढें लिहिलें, “ चार महिने मी पोलिसांच्या ताब्यांत होतों. प्रतिदिनीं भोजनास मिष्टान्न, करमणुकीकरिता निरनिराळ्या गोष्टी, राहण्यास अुत्तम प्रकारचा दिवाणखाना, बसावयास खुर्च्या, टेबलें; लोळावयाला गाद्यागिर्द्या, वापरावयास अुत्तम कपडे, फिरावयास जाण्यास घोड्याची गाडी, राजाप्रमाणे गोरगरिबांस वाटण्याकरिता पैशाची पिशवी, अशा थाटाने मी चार महिने घालविले. पण मी सुखी नव्हतों. कारण या रीतीने माझा हे नाश करणार हें मला माहित होतें. कोर्टांत मला चौकशीकरिता केव्हा नेतात याची मी वाट पाहत होतों. मी पूर्वी कधींहि कोर्ट पाहिलें नाही. अेके दिवशीं मि. ब्रुअीन याने मला मुंबअीचे मॅजिस्ट्रेट मि. हॅमिल्टन यांच्यासमोर नेअून अुभे केलें आणि ते मॅजिस्ट्रेट आहेत असें न सांगतांच विश्वास-

घाताने त्यांनी माझा कबुलीजबाब घेतला. पुण्यास परत आल्यावर मि. हॅमिल्टन हे मॅजिस्ट्रेट आहेत असें मला समजलें. फरासखान्यांत असेतां या गोष्टी सांगावयाच्या नाहीत असा मी निश्चय केला होता. अशा रीतीने मला फसवून पोलिसांनी फासावर चढविलें आहे. मला न्याय हवा आहे. तो न्याय देण्याची अिच्छा अीश्वर नामदारांना देवो अशी माझी प्रार्थना आहे."

परंतु नामदार न्यायाधिशांना परमेश्वराने न्याय देण्याची अिच्छा दिली नाही. दामोदरची प्रार्थना नामदारांच्या बहिऱ्या कर्णेन्द्रियावर आदळली आणि तेथल्या तेथेच नष्ट झाली.

बुधवार दि. २ मार्च १८९८ ला हायकोर्टांत न्यायमूर्ति पार्सन्स व न्या. रानडे यांच्यापुढे दामोदर चाफेकर याने केलेल्या अपिलाचें काम चाललें. आरोपीच्या वतीने बॅ. ब्रानसन व रा. बखले यांनी काम चालविलें. सरकारच्या वतीने बॅ. अंडरसन व सॉलिसिटर निकलसन यांनी काम बघितलें.

आरोपीच्या वतीने प्रथम बॅ. ब्रानसन यांनी लांबलचक भाषण करून दामोदरच्या कबुलीजबाबाच्या खोटेपणाविषयीं बरीच अुद्‌बोधक चर्चा केली; त्या कबुलीजबाबांत सांगितलेली हकीगत अितर पुराव्याशीं जमत नसल्याकारणाने या खटल्याची पुन्हा चौकशी व्हावी अशी हायकोर्टाला विनंती केली.

आरोपीच्या वतीने बॅ. ब्रानसन यांचें भाषण संपल्यावर अंडरसन-साहेबांचें भाषण झालें. अंडरसन् यांचें भाषण चाललें असतां ब्रानसन्‌साहेब दुसरीकडे कामास गेले असल्यामुळे अंडरसन्‌साहेबांच्या भाषणास रा. बखले यांनी अुत्तर दिलें. अखेर मुंबअी हायकोर्टाचे न्यायाधीश पार्सन्स यांनी आपला निर्णय जाहीर करतांना असें सांगितलें की, " कबुलीजबाब देण्यास पोलीसने लालूच दाखविली असली तरी कबुलीजबाब खरा आहे असें वाटल्यास लालूच दाखविली किंवा नाही या प्रश्नाचा विचार करण्याची गरज नाही. हत्यारें कोठे लपवून

ठेवलीं, दारू, छरें वगैरे कोठून :चोरून आणले अित्यादी बारिक सारिक गोष्टी खऱ्या खुनी मनुष्याशिवाय ठाअूक असण्याचा संभव नाही. आरोपीच्या कबुलीजबाबांतील सर्व गोष्टी पुराव्याने सिद्ध झाल्या असल्यामुळे आरोपीचा कबुलीजबाब खरा धरणें भाग आहे. म्हणून आम्ही खालील कोर्टाने दिलेली फांशीची शिक्षा कायम करतों."

अशा प्रकारच्या राजकीय खटल्यांचे निर्णय ते चालण्याच्या आधीच बहुधा ठरलेले असतात. या न्यायाला अनुसरून याहि खटल्याचा अपेक्षित असाच निर्णय लागला. त्याविषयी लोकांना वाअीट वाटलें असलें तरी विषाद मात्र वाटला नाही.

फांशीचा निर्णय झाल्यानंतर दामोदर चाफेकर यांस रे मार्केटांत फांशी देण्याविषयी येरवड्याच्या जेलरसाहेबांची आज्ञा सुटली. परंतु हायकोर्टाच्या निर्णयावर दामोदरने मुंबअी सरकाराकडे अर्ज केला. त्यामुळे फांशीची शिक्षा स्थगित करण्यांत आली; आणि मुंबअी सरकारनेहि फांशीची शिक्षा कायम केली तर हिंदुस्थान सरकार व महाराणी सरकार यांच्याकडे अपील करण्याचा आपला मानस चाफेकराने घोषित केला.

परंतु केवळ नैबंधिक तंत्र म्हणूनच दामोदरने हे सारे अर्ज केले आणि त्याच तंत्राला अनुसरून त्या त्या अधिकारश्रेष्ठींनी ते अर्ज या ना त्या कारणाने फेटाळले. दामोदरची फांशीची शिक्षा मात्र कायम राहिली.

चित्तथरारक अशा या राजकीय नाटकाचा आता शेवटचा प्रवेश जगताच्या रंगभूमीवर अवतीर्ण होणार होता.

दि. १८ अेप्रिल १८९८. सकाळीं साडेसातचा समय होता. अेरवडा तुरुंगांतील नित्याचे व्यवहार सुरू झाले. दामोदर चाफेकरनेहि आपले नित्याचे विधि शांत चित्ताने आटोपले. स्नान-संध्या केली आणि आपल्या अैहिक आयुष्याची अखेरची वाटचाल तो चालू लागला. आपले सारे अैहिक पाश मागे टाकून अेकटा — अगदी

अेकटा असा तो या प्रवासाला निघणार होता. आपल्या दैहिक आयुष्यांत ज्या अेका पवित्र गोष्टीने त्याला साथ दिली होती ती गोष्ट कांही काळपर्यंत त्याच्यासमवेत येणार होती. ती गोष्ट म्हणजे हरिनामाचा गजर! पूर्व दिशा लाल झाली तेव्हापासून त्याच्या तोंडांतून अेकसारखा हरिनामाचा गजर होअू लागला; तो पुढे अखेर-पर्यंत चालू होता. जणूं अेखादा कीर्तनकार संतच न्याय मागण्यासाठी परमात्म्याकडे हरिनामाचा गजर करीत त्वरेने निघाला होता. हरिनामाने पंढरी गर्जावी त्याप्रमाणे तो अेरवड्याचा सारा तुरुंग त्या कीर्तनकाराच्या हरिभजनाने दशदिशा दुमदुमला. तुरुंगांतील शिरस्त्याप्रमाणे पोलि-सांनी त्याला विचारलें की, "तुला कांही सांगावयाचें आहे काय?" परंतु या प्रश्नालाहि दामोदरने हरिनामानेच अुत्तर दिलें. जणुं त्याला म्हणावयाचें होतें की, "आता आपले अैहिक संबंध संपले. तुम्हांला जें काय सांगावयाचें होतें तें यापूर्वीच सांगितलें आहे. आता जर कांही सांगावयाचें अुरलें असेल तर तें तुम्हांला नाही. त्या परमात्म्याला!" अखेरपर्यंत दामोदरने अेकहि शब्द अुच्चारला नाही. हातांत लो. टिळकांजवळची भगवद्गीता नि मुखांत हरिनाम अशा थाटाने त्याने आपली मान कःपदार्थासमान फांसाला दिली. क्षणांत ठोकळा अुडाला आणि तेजांत तेज विलीन झालें!

फांशीच्या रूपाने या शोकान्त नाटकाचा पडदा कायमचा पडल्या-नंतर सकृद्दर्शनी अेक विचार मनांत येतो तो हा की, दामोदरने कांही अेका विशिष्ट भावनेने प्रेरित होअून जर हा खून केला होता तर निधड्या छातीने त्याने भर न्यायालयांत तसें कां सांगितलें नाही? अुलट आपल्या जबाबांत आपल्याकडे निष्कारणच भित्रेपणा घेअून त्याने तो गुन्हा पुनः पुन्हा अमान्य कां केला?

थोड्या विचारान्तीं वरील प्रश्नाला अुत्तर सुचतें तें असें की, कोण-ताहि राजकीय खुनासारखा गुन्हा करून तो भर न्यायालयांत छाती-ठोकपणाने मान्य करणें या गोष्टीला अफाट धैर्य लागतें ही गोष्ट

कांही खोटी नाही. परंतु अुलटपक्षीं अुपरिनिर्दिष्ट प्रकारचा गुन्हा करून प्रतिपक्षीयांनी दंडविधानांत मूलतःच ठेवलेल्या सर्व सवलतींचा पुरेपूर फायदा घेअून तो गुन्हा अमान्य करणें, यांतहि कांही भीरुता नव्हे. कारण प्रतिपक्षाशीं चाललेल्या कोणत्याहि प्रकारच्या न्याय्य युद्धांत सर्व कांही क्षम्य असतें. या न्यायानें तशा प्रकारचा गुन्हा करूनहि तो अमान्य करणें यांत वावगें कांहीच नसतें.

कांही असो, चाफेकर बंधूंनी जगाला अेक परम चमत्कार करून दाखविला यांत कांहीच शंका नाही. त्या बंधूंचें तें कृत्य न्याय्य होतें किंवा नाही हें ठरविण्याचा अधिकारच मुळीं आपल्याला नाही. चाफेकरां-सारख्या हुतात्म्यांचे हे असले मार्ग आपल्या टीकाकक्षेच्या बाहेरचे आहेत; असें समजून त्याविषयीं मत न व्यक्तविणेंच बरें! कांही अैतिहासिक घटनांचें मोल ठरविण्याचा अेकमेव अधिकार त्या काल-पुरुषानें केवळ आपल्याकडे राखून ठेवलेला आहे. त्यांतलीच ही घटना आहे असें समजून गप्प बसावें हेंच अिष्ट!

# हुतात्मा मदनलाल धिंग्रा : : : ५

मदनलाल धिंग्रा माथेफिरू होता यांत कांहीच शंका नाही. त्याचें माथें फिरलें होतें; पण तें देशभक्तीने ! दि. १ जुलै १९०९ रोजीं रात्रीं त्याने जेव्हा कर्झन वायलींचा खून केला तेव्हा अनेक लोकांनी त्याला 'माथेफिरू' म्हणून संबोधिलें. सार्वभौम राज्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष राजधानींत त्याने कर्झन वायली यांच्यावर गोळया झाडल्या होत्या आणि त्या कृत्याचा प्रतिध्वनि नुसत्या लंडन शहरांतच नव्हे, तर ज्या ज्या ठिकाणीं ब्रिटिशांचें राज्य त्या वेळीं पसरलें होतें, त्या त्या ठिकांणीं अुमटला होता; आणि साऱ्या जगाचें लक्ष या खुनाच्या भीषण परिणामावर केंद्रीभूत झालें होतें. अिंग्रजांचे जे मित्र होते त्यांचें धाबें दणाणलें आणि अिंग्रजांचे जे शत्रु होते, त्यांचें अंतःकरण आनंदाने फुलून गेलें. अिंग्रजांचे पक्षपाती म्हणूं लागले की, "हा खून मदनलाल धिंग्रा नांवाच्या अेका माथेफिरूने केलेला आहे." आणि अितर विरोधी गटाचे लोक या खुनाविषयीचें आपलें मत व्यक्त न करतां केवळ व्यवहार म्हणून गप्प बसले.

मात्र 'माथेफिरू' हा शब्द ज्यांनी ज्यांनी अुच्चारला असेल त्या सर्वांना ही कल्पनाहि नसेल की, मदनलालसारखे आजचे माथेफिरू हे अुद्याचे हुतात्मे ठरतात. कालपुरुषाला जर वाचा असती, तर त्यानेहि अुच्चरवाने असेंच अुद्घोषित केलें असतें की, " युगायुगांतून क्वचित प्रसंगीं घडणाऱ्या असल्या घटनांवर मत व्यक्तविण्याचा मानवाला मुळांतच अधिकार नाही ! " आणि कालपुरुषाचें हें म्हणणें सर्वथैव योग्य असेंच आहे. कारण मानवाच्या मताचें स्वरूप क्षणाक्षणाला बदलत जातें. ती गोष्ट कालपुरुषाच्या बाबतींत घडत नाही. कालपुरुष हा त्रिकालदर्शी असल्यामुळे त्याचे निर्णय शाश्वत स्वरूपाचे असतात. अुलट मानवी मतें हीं क्षणभंगूर असतात, असाच पुराणांचा नि अितिहासाचा

दाखला देतां येईल. मदनलाल याने केलेल्या खुनासारखी गोष्ट स्थल, काल नि व्यक्ति बदलून सृष्टीच्या विशाल अवकाशांत अनेकदा घडलेली आपणाला दिसेल; आणि त्या वेळीं विसाव्या शतकाअितकें प्रचारतंत्र जर प्रगत असतें तर त्या त्या प्रत्येक वेळीं याच प्रकारचा जनमताचा आविष्कार आपल्याला खचित दिसून आला असता. कंसाचा वध झाला तेव्हा कौरवपक्षाचे लोक म्हणाले असतील की, "हा धडधडीत खून आहे; आणि तो करणारा श्रीकृष्ण हा अेक माथेफिरू आहे." लंकाधीश रावणाचा वध झाला तेव्हा श्रीरामावर प्रतिपक्षीयांनी माथेफिरूपणाचा आरोप केला नसेल असें म्हणवत नाही. तीच गोष्ट शिवाजी महाराजांनी केलेल्या अफझुलखानाच्या वधाची! खानाचा वध करून महाराज गडावर गेले तेव्हा स्वपक्षीय मराठ्यांनी त्यांची पाठ थोपटली असेल नि त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला असेल. परंतु मोगलांच्या दरबारांत त्या शूर कृत्याची नोंद 'शिवाजी नांवाच्या माथेफिरूने केलेला खून' अशीच झाली असली पाहिजे. सारांश, ज्या ज्या वेळीं राजकीय खुनांसारखे प्रसंग अुद्भवलेले आहेत त्या त्या प्रत्येक वेळीं प्रतिपक्षियांनी त्या त्या खुनांना "माथेफिरूंनी केलेलीं नीच कृत्यें" असेंच संबोधिलें आहे.

परंतु म्हणून तो खून करणारा हुतात्मा कधीहि गडबडून गेलेला नाही. किंबहुना त्याला गडबडून जाण्याचें कारणच असत नाही. तीच गोष्ट मदनलालची झाली. आपण करीत असलेलें कृत्य हें हौतात्म्याचें आहे हें तो पुरेपूर जाणून होता. हें कृत्य करण्यापूर्वी कांही दिवस त्याने भारतभवनांत सावरकरांना अेक अत्यंत सूचक प्रश्न विचारला होता. ती वेळ संध्याकाळची होती. भारतभवनांत सावरकरांना अेका बाजूला घेअून त्याने विचारलें होतें, "हौतात्म्य गाजविण्याची वेळ खरोखरच प्राप्त झाली आहे, असें तुम्हांस वाटतें का?" मदनलालच्या या प्रश्नाला सावरकरांनी तितकेंच सूचक अुत्तर दिलें होतें, "हुतात्मा मनाने खंबीर व सिद्ध झालेला असेल तर हौतात्म्य गाज-

विण्याची वेळ प्राप्त झालेली आहे असें खुशाल समजावें!" त्या वेळे-पासून 'हौतात्म्य' या अेकाच शब्दानें मदनलालच्या अंतःकरणांत घर केलें, आणि त्याचें मन विचारमग्न झालें. कांही कांही शब्दांचा दंशच असा असतो की तो होतांच संस्कारक्षम मनाची झोप अुडते, त्या मनुष्याचे अितर सारे व्यवहार स्थगित होतात आणि अहर्निश त्या माणसाचें मन त्या शब्दार्थाकडे धाव घेत राहतें. सावरकरांनी अुच्चारलेल्या 'हौतात्म्य' या शब्दानें मदनलालच्या मनाची हीच अवस्था झाली आणि 'हौतात्म्य' गाजविण्याची संधी तो शोधूं लागला.

हें कृत्य पार पाडण्यापूर्वी कांही सिद्धतेची आवश्यकता होती. त्याकरता मदनलालनें खटपट करून पिस्तुलाचा परवाना प्रथम मिळ-विला. तो हातीं पडतांच दि. २६-१-१९०९ रोजीं 'गमेज' कंपनी-च्या दुकानांत जाअून त्याने अेक सहाबारी पिस्तुल खरेदी केलें. त्या-नंतर मोर्ले नांवाच्या गृहस्थाकडून त्याने पिस्तुल अुडविण्याचें शिक्षण घेतलें. अशा तऱ्हेने सर्व सिद्धता झाल्यानंतर अेखादा आतुर शिकारी आपल्या सावजाची वाट ज्या अुत्सुकतेने बघत बसतो त्या अुत्सुकतेने तो आपल्या सावजाची वाट बघूं लागला आणि तें सावज हातीं येण्याची संधी त्याला लगोलग प्राप्तहि झाली.

दि. ८ जून १९०९ रोजीं गणेशपंत सावरकर यांना जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली. या गोष्टीचा प्रतिशोध त्वरित घेतला गेला पाहिजे असें मदनलालनें आपल्या मनाशीं निश्चित केलें. त्याच सुमारास 'नॅशनल अिंडियन असोसिअेशन' या संस्थेचा वार्षिक समारंभ दि. १ जुलै १९०९ रोजीं रात्रीं लंडन येथे 'अिंपीरियल अिन्स्टिटयूट'च्या जहांगीर हॉलमध्ये होण्याचें घोषित झालें आणि मदनलाल याला हवी असलेली संधी आपोआपच लाभली.

अेक जुलै रोजीं रात्रीं नअू-साडेनअूचा सुमार होता. बहुतेक सारी निमंत्रित मंडळी समारंभस्थानीं गोळा झाली होती. जमलेल्या मंडळींनी विविध तऱ्हेचे रंगीबेरंगी पोषाख केलेले होते. त्यांच्यामध्ये

हास्यविनोद चालले होते व त्यांच्या हास्याचा ध्वनि दिवाणखान्यांत चाललेल्या संगीताच्या मृदु लहरींमध्ये मिसळत होता. त्यामुळे वातावरणाला अेक प्रकारची प्रसन्नता प्राप्त झाली होती. सारी मंडळी या आनंदांत निमग्न होती तोंच साडेदहा वाजण्याचा सुमार झाला, आणि निवडक मंडळींच्या समवेतच लॉर्ड मोर्ले यांचे 'पोलिटिकल अे. डी. सी.' सर कर्झन वायली व त्यांच्या पत्नी ही मंडळी समारंभस्थानीं मोठ्या डौलाने येअून दाखल झाली.

समारंभाचा गोड कार्यक्रम संपवून जेव्हा सारी मंडळी हळूहळू परतूं लागली तेव्हा घड्याळांत अकराचे ठोके पडत होते. अितर मंडळींशीं बोलतां बोलतां कर्झन वायली मदनलालच्या अगदी नजिक आले आणि त्याच्याशीं बातचीत करूं लागले. कांही काळ याप्रमाणे पुढे सरकला. मदनलालने कर्झन वायलींकडे निरखून बघितलें. सावज शिकाऱ्याच्या पूर्णपणें अटोक्यांत आलें होतें आणि 'हौतात्म्य' गाजविण्याची संधी प्राप्त झाली होती. यापुढे अेका क्षणाचाहि विलंब खपण्याजोगा नव्हता. मदनलालने आपलें पिस्तुल सरसावलें आणि त्या पिस्तुलांतून अेकामागून अेक अशा चार गोळ्या त्याने झाडल्या. दुसऱ्याच क्षणीं अेखाद्या अुन्मत्त हत्तीने लीलया मोडून पाडलेल्या अेखाद्या वृक्षाप्रमाणे कर्झन वायली धरणीवर कोसळले आणि गतप्राण झाले. पहिले कांही बार अैकतांच शांघायचे पारशी डॉक्टर कावसजी लालकाका हे त्या जागेकडे धावून आले. मदनलालने त्यांचीहि तीच गत केली. जणुं अेखादी विराट शक्ति त्याच्या अंगामध्ये अवतीर्ण झाली होती आणि तें संहारकार्य करीत होती.

त्यानंतर आपलें अवतारकार्य समाप्त झालें याच अिराद्याने की काय कुणास ठाअूक, पण मदनलालने लगोलग आपल्या स्वतःवर गोळी अुडवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण सर लेस्ली प्रोब्रिन नांवाच्या अेका गृहस्थाने त्याचा तो हात पकडला व त्यामुळे त्याचा तो हेतु सफल होअूं शकला नाही. मदनलाल त्या वेळीं

अितका बेभान झाला होता की त्या भरांत त्याने असंख्य बळी सहज घेतले असते; परंतु मदनमोहनसिंह नांवाच्या अेका हिंदी विद्यार्थ्याने त्याच्या हातांतून पिस्तुल काढून घेतलें आणि त्याला जमिनीवर अुताणे पाडलें. हें होत असतांना त्याने आपल्या डोक्याला घातलेला अस्मानी फेटा नि त्याचा सोन्याचा चष्मा खाली गळून पडला. तेव्हा तशाहि स्थितींत मदनलालने स्मित करीत म्हटलें, "तेवढ्या गोष्टी मला घेअू दे की!"

आपल्या जीविताचें अेखादें पवित्र अीप्सित कार्य पार पाडल्या-नंतर माणसाच्या अुचंबळेल्या सार्‍या वृत्ति ज्याप्रमाणे शांत नि स्थिर होतात त्याप्रमाणे मदनलालची स्थिति तें कृत्य पार पाडल्यानंतर झाली. तेथे अुपस्थित असलेल्या अेका डॉक्टराने त्याची नाडी तपासली. तेव्हा त्याच्या नाडीचे ठोके नेहमीसारखेच संथपणें पडत होते. त्याचा हात यत्किंचितहि कापत नव्हता किंवा त्याचें अंतःकरण मुळीच क्षुब्ध झाल्यासारखें दिसत नव्हतें.

सगळीकडे स्थिरस्थावर झाल्यानंतर कर्झन वायली यांचें प्रेत अुचलून नेअू लागले, त्या वेळेचा देखावा अत्यंत हृदयद्रावक असा होता. आपल्या पतीचें डोकें मांडीवर घेअून कर्झन वायली यांची पत्नी टाहो फोडून रडत होती. सर विल्यम् यांच्या चेहेर्‍याच्या चिंधड्या झाल्या असून जमिनीवर रक्ताचे पाट वाहात होते व थोड्याच अंतरावर डॉ. लालकाका मृत्यूच्या मांडीवर असह्य वेदनेने तळमळत होते.

परंतु मदनलालच्या अंतःकरणाच्या वेदना मात्र पुरेपूर थांबल्या होत्या. खून केल्यानंतर त्याला पोलीसचौकीवर नेण्यांत आलें. तेथे गेल्यावर त्याला बसावयास अेक खुर्ची दिली. त्या खुर्चीवर बसल्यानंतर त्याने जवळच्या भिंतीवर आपलें डोकें टेकलें व शांतपणें त्याने आपले डोळे मिटून घेतले. त्याच्या अंगांत असलेला कोट काढून घेण्यांत आला. त्याच्या शर्टचे कफ त्याने अुलटे केले होते. मधून मधून तो आपले डोळे अुघडून घड्याळाकडे पाही व पुन्हा डोळे मिटून घेअी. मध्येच त्याने

?3Lee
7CC/7154/5 2 1

आपलें जाकीट मागितलें. पण त्याअैवजी त्याला अेक सखलाद पांघरायास देण्यांत आली. मधून मधून त्याचा चेहरा सस्मित झालेला दिसे. पण अेकहि शब्द त्याने तोंडावाटे बाहेर काढला नाही, किंवा जवळ कोणी जिवंत माणसें असल्याचें त्याला भान आहे असेंहि त्याच्या मुद्रेवरून दिसलें नाही.

सर कर्झन वायली यांच्या मृत्युसंबंधाने लगेच चौकशी सुरू झाली. त्या चौकशीअंतीं असें ठरविण्यांत आलें की, त्यांचा खून जाणूनबुजून करण्यांत आला आहे. पुराव्यावरून असें दिसून आलें की, आपोआप अुडणाऱ्या बेल्जम पिस्तुलाने हा खून करण्यांत आलेला आहे. खुनी माणसाजवळ 'कोल्ट रिव्हॉल्व्हर' होता आणि त्याने आत्महत्या करण्याचाहि प्रयत्न केला. मदनलाल राहत असे तेथे सर कर्झन वायली यांनी मदनलाल यांस लिहिलेलें अेक पत्र सांपडलें. तेंहि चौकशींत वाचण्यांत आलें. त्या पत्रांत सर कर्झन वायली यांनी मदनलाल यास लिहिलें होतें की, "तुझ्या भावाचें मला अेक पत्र आलें असून मला 'अिंडिया ऑफिस' मध्ये येअून त्यासंबंधी तूं भेट." मदनलालच्या निवासस्थानीं अेक वही सांपडली. पिस्तुलाचा अुपयोग करण्यासंबंधाने त्याने जो अभ्यास केला होता त्याची नोंद मदनलालने या वहींत करून ठेवलेली आढळली. गुप्त हेर खात्यांतील अेका अधिकाऱ्याची साक्ष याच वेळीं घेण्यांत आली. त्याने आपल्या साक्षींत सांगितलें की, "या गुन्ह्याच्या कामीं मदनलाल यांस दुसऱ्या कुणाचेंहि सहाय्य नव्हतें असें दिसतें."

याच सुमारास 'पायोनियर' पत्राच्या लंडन येथील बातमीदाराने अशी बातमी प्रसिद्ध केली की, "हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्य अन्यायाचें आहे; आणि तें झुगारून देण्यास कोणताहि अुपाय योजला तरी तो न्याय्य होअील. सर्व हिंदी विद्यार्थ्यांची वृत्ति जर अशा प्रकारची झाली व त्याचप्रमाणे जर कृति घडली तर हिंदुस्थानाला लवकरच

स्वातंत्र्य मिळेल." अशा आशयाचा मजकूर लिहिलेला कागद मदनलालच्या खिशांत सापडला.

परंतु या कृत्याला लंडन पोलिसांनी कटाचें स्वरूप मुळीच दिलें नाही. खून झाल्यानंतर अल्पावधींतच लंडन पोलिसांनी असें प्रकट केलें की, "सर कर्झन वायली यांचा खून करणाऱ्या हिंदी विद्यार्थ्याने अुगीच कांही कारणावरून खून केला असून या कृत्यांत त्याचे सहाय्यक कोणीहि नाहीत. अुगीच कांही तरी सबबीवर हा खून करण्यांत आलेला आहे. या कृत्यावरून मदनलालच्या मूळच्याच तऱ्हेवाअिक स्वभावाची साक्ष पटते. मदनलालच्या भावाकडून आता असें जाहीर करण्यांत आले आहे की, मदनलाल हा बालपणापासूनच वेडसर व तऱ्हेवाअीक आहे. मांजराच्या मिशाच काप, लहान मुलांच्या तोंडांत भाकरीचे तुकडेच कोंब, असा त्याचा तऱ्हेवाअिकपणा त्याच्या भावाने वर्णिला आहे. अिंग्लंडांत ही स्वारी पळून गेली, व गेल्या जानेवारींत अेक पिस्तुल खरेदी करून त्याने गोळीबाराचा अेकसारखा अभ्यास चालविला. अशा स्थितींत माथेफिरूपणाच्या झटक्यांत त्याच्या हातून हा खून झाला."

जगांतील बहुतेक सर्व वृत्तपत्रांनी, मदनलालच्या सग्या-सोयऱ्यांनी, त्याच्या कांही देशबांधवांनी नि पोलिसांनी जरी त्याच्यावर माथेफिरूपणाचा शिक्का मारला असला तरी आपण हें माथेफिरूपणाचें कृत्य केलें आहे असें मदनलाल यास अेक क्षणभरहि वाटणें शक्य नव्हतें. हें कृत्य केल्यानंतर जग आपल्याला 'माथेफिरू' म्हणून संबोधील या गोष्टीची नोंद तें कृत्य करण्यापूर्वी मदनलालने आपल्या मनाशीं करून ठेवली असलीच पाहिजे. अर्थात् त्यामुळेच त्याला त्या आरोपाबद्दल कांहीच वाटलें नाही. आपण केलेलें कृत्य माथेफिरूपणाचें नाहीच नाही; तर अुलट तें कृत्य न्याय्य आहे या गोष्टीची पक्की खूणगाठ त्याने आपल्या मनाशीं बांधली असल्याखेरीज त्याच्या मनाचा हा अढळ शांतपणा सतत टिकून राहणें शक्य नव्हतें. प्रथम अपकार करणाराचा

वध करणें अधर्म होत नाही – नव्हे, तो वध धर्म्यच आहे, हें श्रीरामानें आपल्या कनिष्ठ भ्रात्याला वनवासांत सांगितलेलें तत्त्व तो विसरला नव्हता. ज्या अिंग्रज माणसाचा त्यानें वध केला होता त्याच्या जातिबांधवांनी मदनलालच्या मायभूमीवर गेलीं अनेक वर्षें असंख्य अपकारकृत्यें केलेलीं होतीं. त्यांतूनच त्याच्या मायभूमीनें अिंग्रजांच्या या भूमीशीं अेक प्रकारचा संग्राम अुभा केला होता. शत्रुराष्ट्राशीं अपरिहार्यतेनें आरंभित झालेल्या त्या स्वातंत्र्यसंग्रामांतील हा खून हा मुद्दा अपरिहार्य असाच अेक भाग होय, अशी मदनलालची मनोभूमिका झाली असल्यास त्यांत कांहीं नवल नव्हतें. कारण कविवर्य बायरन यानें म्हटल्याप्रमाणे स्वातंत्र्याचा संग्राम अेकदा आरंभित झाला म्हणजे तो अंतिम यशप्राप्ति झाल्याविना कधींच थांबत नसतो. अेकच नव्हे तर अनेक पिढ्या – पिढ्यान् पिढ्या, हें युद्ध सुरू असतें. समरांगणावर रक्तानें अभिषिक्त झालेला पिता आपल्या हातांतील ध्वज सुपुत्राला सुपूर्त करून अखेरचा श्वास सोडतो; तरी देखील युद्ध पुढे सुरूच असतें. आणि नंतर असा अेक 'सोनियाचा दिवस' अुगवतो की, त्या वेळीं विजयश्री हातीं पुष्पमाला घेअून तुमच्या दाराच्या अुंबरठ्यावर अुभी राहते आणि तत्क्षणींच युद्ध संपतें.

अेकदा अशा प्रकारची भूमिका निश्चित झाल्यानंतर त्या भूमिकेपासून अपाततः निर्माण होणारीं सुखदुःखें भोगण्यास माणूस आपोआपच तयार होतो. हौतात्म्य गाजविण्यास अेखादा मनुष्य ज्या क्षणीं सिद्ध होतो, त्याच क्षणी आपल्या प्राणांबद्दलचें प्रेम त्याच्या मनांतून नाहीसें होतें आणि पुराणांतरीं सांगितलेलें मानवी जीविताविषयीचें तत्त्वज्ञान त्याच्या अंतःकरणांत दृढमूल होअून बसतें. या संसारामध्ये कोणत्याहि प्राण्याला आज ना अुद्या मृत्यु हा प्राप्त होतच असतो. या मर्त्य भूमीवर ज्याप्रमाणे नाश हा सर्व संग्रहांचा परिणाम आहे, पतन हा सर्व अुन्नतींचा शेवट आहे, वियोग हा सर्व संयोगांचा अंत आहे, त्याचप्रमाणे मरण हा मानवी

जीविताचा शेवट आहे; तेव्हा अशा तऱ्हेने अिहलोकींचीं सारीं बंधनें संपलेलीं आहेत असें अेकदा मानल्यानंतर, कोणी निंदो वा वंदो, त्या गोष्टीला अेकाच मापाने मोजण्याची त्या माणसाची वृत्ति बनते. कर्झन वायलींचा वध केल्यानंतर मदनलालची हीच वृत्ति बनली होती. अेखादें अुग्र तपाचरण पार पाडल्यानंतर अेखादा तपस्वी आपलें अपरिहार्य असें अुर्वरित आयुष्य ज्या अेका सुखसमाधींत कंठीत असतो त्याचप्रमाणे मदनलालच्या मनाची परिस्थिति झालेली होती.

त्याला जेव्हा पोलीस कोर्टांत नेण्यांत आलें तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर संपूर्ण निर्भय वृत्ति नांदत होती. आपला अुजवा हात आपल्या विजारीच्या खिशांत घालून आरोपीच्या पिंजऱ्यांत तो बेफिकिरीने अुभा होता. कोर्टांत त्याचा स्नेही अगर त्याच्या देशबांधवांपैकी कोणीहि दिसत नव्हता. त्याच्या वतीने काम चालविण्यास कोणीहि वकील अुभा राहिलेला दिसला नाही. पोलिसांची हकीकत अैकल्यावर मॅजिस्ट्रेटने मदनलाल यांस विचारलें, "यावर तुला कांही प्रश्न विचारावयाचे आहेत काय?" तेव्हा मदनलालने क्षणभर विचार केला आणि नंतर मानेनेच 'नाही' असें दर्शविलें. पुढे अेकदा मॅजिस्ट्रेटने "कांही प्रश्न विचारावयाचें आहेत काय?" म्हणून पुन्हा पृच्छा केली. तेव्हा मदनलाल याने आपली दृष्टि अेकदम मॅजिस्ट्रेटकडे वळवून म्हटलें, "मला अितकेंच सांगावयाचें आहे की, डॉ. लालकाका यांचा मी जाणूनबुजून स्वेच्छेने खून केलेला नाही. तर डॉक्टर मजकडे येतांना मीं पाहिलें. तेव्हा स्वतःचा बचाव करण्याकरता मला त्यांच्यावर गोळी झाडावी लागली."

नंतर मदनलालचा खटला अेक आठवडाभर स्थगित करण्यांत आला.

त्यानंतर कांही दिवसांनी मदनलालवर खटला चालवावा, असें 'ग्रँड ज्यूरी'ने आपलें मत जाहीर केलें. अिंग्लंडमध्ये अशी पद्धत आहे की, न्यायालयांत चालावयाच्या खटल्यासंबंधाचे कागदपत्र शेरिफ यांनी निवडलेल्या २३ लोकांच्या ज्यूरीपुढे जात असतात.

हे कागदपत्र पाहून व आवश्यक असल्यास साक्षीदार बोलावून आरोपीवर सकृत्‌दर्शनी आरोप ठेवतां येतो किंवा नाही ही गोष्ट ही ज्यूरी ठरवीत असते. या वेळीं आरोपी किंवा त्याच्या तर्फेचा वकीलहि अुपस्थित नसतो. 'ग्रँड ज्यूरी'ने खटला चालविण्यास संमति दिली म्हणजे मग नेहमीच्या पद्धतीनुसार खटला चालतो. अशी संमति मदनलालच्या खटल्यासंबंधी देण्यांत आली.

या ज्यूरीपुढे त्यांच्या मुख्य अधिकाऱ्याने असें प्रतिपादन केलें की, खुनाचा हेतु राजकीय असला तरी तो खूनच होय, असें अिंग्लंडच्या कायद्याचें तत्त्व आहे. बुद्धिपुरस्सर व चीड आणणारें कारण नसतांना कोणीं कोणास ठार केलें तर तो खूनच होय. मनुष्य वेडा असून त्या भरांत जर त्याने कोणाचा जीव घेतला तर मात्र तो खून नव्हे.

शनिवार दि. १०-७-१९०९ रोजीं वेस्ट्‌मिन्स्टर पोलिस कोर्टांत मदनलाल धिंग्रा याच्या खटल्याची प्राथमिक चौकशी आरंभित झाली. फिर्यादी पक्षाच्या वतीने जेव्हा साक्षीपुरावा सुरू झाला तेव्हा मदनलाल शांत चित्ताने तो पुरावा अैकत बसला होता. त्याने केलेल्या कृत्याला जेव्हा 'खून' या शब्दाने संबोधलें तेव्हा त्याने त्या शब्दाला आपली हरकत दर्शविली. ज्या ठिकाणीं मदनलाल पिस्तुलाचा नेम मारण्यास शिकला त्या ठिकाणच्या मालकाची प्रथम साक्ष झाली. त्याने आपल्या जबानींत सांगितलें की, "मदनलाल हा कधी कधी सावकाश व कधी कधी अेकामागून अेक अशा भराभर गोळ्या अुडवून पाहत असे. दि. २८ जून रोजीं मदनलालने बारा गोळ्या अुडविल्या व मग त्याने आपलें पिस्तुल साफ करण्यास सांगितलें. ज्या दिवशीं खून झाला त्या दिवशीं साडेपांच वाजतां मदनलालने माझे पैसे दिले व पिस्तुल साफ करून घेतलें."

मदनलाल याच्या खिशांत दोन व त्याच्या बिन्हाडीं अेक असे अेकूण तीन लेख सांपडल्याचें नंतर सांगण्यांत आलें. त्यांपैकी अेका

लेखांत त्याने केलेल्या गुन्ह्यासंबंधीचा मजकूर असून दुसऱ्या अेका लेखांत हिंदुस्थान व हिंदुस्थानाची स्थिति यासंबंधीचीं बनविलेलीं आपलीं मतें मदनलालने दिलेलीं होतीं. मदनलालच्या ब्रिन्हाडीं आणखी अेक फोटो सांपडला. हा फोटो कोणाचा किंवा कशाचा आहे अथवा मदनलालच्या लेखांत काय मजकूर लिहिलेला होता या गोष्टीची मुळीच वाच्यता करण्यांत आली नाही. फोटोखाली कांही मजकूर लिहिलेला आहे अेवढेंच प्रकट करण्यांत आलें.

मग मदनमोहन सिंहाची साक्ष झाली; खून झाला तेव्हा मदनलालचे हात आपण मागून येअून कसे धरले, गुडध्याने धक्का देअून त्यास खाली कसें पाडलें व पोलीस शिपाअी येअीतों त्याला कसें धरून ठेवलें वगैरे हकीकत त्याने आपल्या साक्षींत सांगितली. या ग्रामस्थ सिंहाची साक्ष सुरू असतांना मदनलाल ती लक्षपूर्वक अैकत होता. सिंहाची साक्ष संपल्यावर कोर्टाने मदनलाल यांस विचारलें, "तुला या साक्षीदाराला कांही प्रश्न विचारावयाचा आहे काय?" तेव्हा मदनलाल संतप्त झाला आणि अुसळून म्हणाला, "या साक्षीसंबंधाने माझें म्हणणें अितकेंच आहे की, हा अिसम आपल्या मायभूमीशीं निमकहराम झालेला आहे."

मदनलाल पोलीस कोर्टांत अेकूण पांच तास अुभा होता. त्याची वृत्ति अगदी शांत दिसत होती. अेक प्रकारच्या बेपर्वाअीने व बेफिकिरीने कांही वेळ फिर्यादीतर्फेच्या वकीलाकडे तर कांही वेळ साक्षीदारांकडे, पुन्हा कांही वेळ वकिलाकडे अशा रीतीने पाहत तो अुभा राहिला होता. पोलीस तपासांत मदनलालच्या खिशांत सांपडलेलें त्याचें लेखी व्यक्तव्य दडपून टाकण्यांत आलें होतें. मदनलालने पोलीस कोर्टांत पुन्हा नवें वक्तव्य केलें.

आपल्या या तोंडी जबाबांत तो म्हणाला, "माझा वैयक्तिक बचाव करण्यासाठी अेक अक्षरहि बोलण्याची माझी अिच्छा नाही. पण माझें कृत्य न्याय्य आहे, हें सिद्ध करण्याकरिता मात्र मी कांही

गोष्टी बोलूं अिच्छितों. माझ्या स्वतःविषयी म्हणाल तर, मला पकडण्याचा, कारावासांत डांबून ठेवण्याचा किंवा देहांत शासन देण्याचा अधिकार अिंग्लंडमधील कोणत्याहि न्यायासनाला आहे असें मला मुळीच वाटत नाही. केवळ याचसाठी स्वतःचा बचाव करून घेण्याकरिता मी माझ्या वतीने कोणीहि विधिविशारद अुभा केला नाही."

"अशी कल्पना करा की, जर्मन लोकांनी अिंग्लंड देश पादाक्रांत केलेला आहे; आणि अशा वेळीं अेखाद्या अिंग्रजाने जर्मनांशीं लढा आरंभित करणें हें जर स्वदेशभक्तीचें लक्षण असेल तर मी अिंग्रजांविरुद्ध शस्त्र अुचललें, ही गोष्ट त्याहून फारच न्याय्य नि देशभक्तियुक्त आहे, असें माझें स्पष्ट मत आहे.

"गेल्या पन्नास वर्षांत, हिंदुस्थानांतील माझ्या आठ कोटि देशबांधवांचे खून झाले. त्या खुनांचें सारें दायित्व अिंग्रज लोकांच्यावर आहे असें मी समजतों. माझ्या मायदेशांतून — त्या हिंदुभूमींतून — प्रतिवर्षी दहा कोटि पौंड अेवढी संपत्ति अिंग्लंडमध्ये आणण्यांत येते. या गोष्टीचेंहि दायित्व अिंग्रजांच्याशिवाय दुसऱ्या कुणावर आहे ? अिंग्लिश लोक आपल्या देशबांधवांना जें करावयाचा अुपदेश करीत आहेत तेंच करणाऱ्या माझ्या सहस्रों स्वदेशभक्त देशबंधूंना फांसावर टांगण्यांत आलें किंवा हद्दपार करण्यांत आलें. या गोष्टीला तरी कोण जबाबदार आहे ? तुम्ही — तुम्हीच अिंग्रज लोक ! अेखादा अिंग्रज आपला मायदेश सोडून हिंदुस्थानांत जातो आणि प्रतिमासीं शंभर पौंड मिळवितो. या गोष्टीचा स्पष्ट अर्थ अेवढाच आहे की, तो आपल्या या कृतीने माझ्या अेक सहस्र गरीब देशबांधवांना देहांताची शिक्षा देतो. कारण अिंग्रज अिसम जे शंभर पौंड बहुतेक ख्यालीखुशालींत किंवा नाचरंगांत अुडवितो, त्याच शंभर पौंडांवर माझ्या अेक सहस्र गरीब देशबांधवांचा अुदरनिर्वाह सहज चालविण्यांत येतो.

"अिंग्लंड देश आपल्या दास्यांत ठेवण्याचा ज्याप्रमाणे जर्मन

लोकांना अधिकार नाही, त्याचप्रमाणे हिंदुस्थान देशाला आपल्या कबजांत ठेवण्याचा अिंग्लंडलाहि बिलकूल अधिकार पोचत नाही. अर्थात् आमची पवित्र जन्मभूमि भ्रष्ट करणाऱ्या अिंग्रज अिसमाला आम्ही जर ठार केलें तर तें कृत्य पूर्णपणें न्यायाचेंच आहे !

" प्रतिवर्षी वीस लक्ष लोकांची हत्या करणें किंवा आमच्या स्त्रियांची अब्रू घेणें, यासारखा भयंकर जुल्म आणि अंगावर काटा आणणारे अत्याचार हिंदुस्थानांत प्रत्यक्ष चालू असतांहि, गांजलेल्या मानवजातीचे, अुदाहरणार्थ कांगोंतील किंवा रशियांतील लोकांचे, कैवारी वीर म्हणून अिंग्रज लोक मोठ्या दिमाखाने मिरवितांना मी जेव्हा बघतों, तेव्हा अिंग्रजांच्या भयंकर ढोंगीपणाचें, नाटकीपणाचें व चेष्टांचें मला फार आश्चर्य वाटतें.

" अिंग्लंड देश जर्मनांनी पादाक्रांत करून आपल्या ताब्यांत घेतला आहे आणि अशा वेळीं लंडन शहराच्या रस्त्यांतून जेत्यांच्या अुन्मत्तपणाने जर्मन लोक वावरत आहेत, हें दृश्य पाहून तें अेखाद्या अिंग्रजाला असह्य झालें आणि त्याने अेखाद-दुसऱ्या जर्मनाला ठार केलें अशी कल्पना करा. अशा प्रसंगीं अिंग्लंडांतील लोकांनी त्या अिंग्रजाला जर देशभक्त समजावयाचें असेल तर मी देखील माझ्या मातृभूमीच्या मुक्ततेकरिता कार्यप्रवृत्त झालेला देशभक्तच आहें. याशिवाय मला जें कांही सांगावयाचें होतें तें कोर्टांत दाखल केलेल्या माझ्या लेखी जबाबांत नमूद केलेलेंच आहे.

" मजवर तुम्ही दया करावी ह्या किंवा अशा कोणत्याहि अन्य हेतूनें हा जबाब मी देत आहें, असें आपण समजूं नका. अिंग्रजांनी मला देहांताची शिक्षा द्यावी अशीच माझी अिच्छा आहे. कारण तसें झालें म्हणजे माझ्या देशबांधवांची सूडबुद्धि अधिक तीव्र बनेल. अिंग्लंडबाहेरील जगाला, विशेषतः आमच्या संबंधाने सहानुभूति बाळगणाऱ्या अमेरिकेंतील व जर्मनींतील लोकांना, माझें हें कृत्य

न्यायाचें आहे असें दिसावें म्हणूनच हा जबाब मी देत आहें. बस्स ! यापेक्षा मला अधिक कांही अेक सांगावयाचें नाही. ”

त्यानंतर दि. १९ व २० जुलै रोजीं ओल्ड बेली या प्रसिद्ध कोर्टांत धिंग्रा प्रकरणाची चौकशी होअून दि. २३ जुलै रोजीं या प्रकरणांतील आरोपीचें काम सेशन्समध्ये चालेल, असें घोषित करण्यांत आलें.

मध्यंतरीं म्हणजे दि. २२ जुलै १९०९ रोजीं मदनलालचे गुरुजी सावरकर ब्रिस्टन जेलमध्ये जाअून आपल्या या शिष्योत्तमाला भेटले. प्रत्यक्ष मृत्यूच्या अुंबरठ्यावर या दोन महापुरुषांमध्ये झालेल्या त्या अपूर्व भेटीला अुपमा शोधूनहि सांपडणार नाही. श्रीराम-हनुमान, श्रीकृष्ण-अर्जुन, समर्थ रामदास-कल्याण स्वामी, अित्यादि अनेक थोर गुरुशिष्यांच्या अनुपम जोड्या या भूतलावर होअून गेल्या. अनेक प्रसंगीं त्यांच्या अनेक भेटी झाल्याहि असतील. पण अितिहासांत मदनलाल-सावरकर यांच्यामधील या भेटीला दुसरी तोड मिळणार नाही. आपल्या शिष्यानें केलेल्या या शूर कृत्यासाठीं कारावासांतील अधिकाऱ्यांसमक्ष त्याची प्रकटरीत्या पाठ थोपटणें सावरकरांना शक्य नव्हतें. परंतु तशाहि अडचणीच्या परिस्थितींत “ मी तुझ्या दर्शनासाठीं आलों आहें ” या शब्दप्रयोगानें सावरकरांनी आपलें मनोगत व्यक्तविलें आणि सावरकरांच्या परंपरेंत प्रवीण झालेल्या त्या मान्यवर शिष्यानेंहि आपल्या गुरूची आपल्याबद्दलची आदराची ती भावना ओळखली. भेटीची वेळ संपतांच त्या दोन थोर पुरुषांची ताटातूट झाली खरी; पण त्यानंतर त्या दोन थोर अंतःकरणांचें जें मीलन झालें तें कायमचेंच !

ठरल्याप्रमाणें शुक्रवार दि. २३ जुलै रोजीं लॉर्ड चीफ जस्टिसपुढे मदनलाल यांजवरील खटल्याचें काम सुरू झालें. त्या वेळीं न्यायालयाच्या बाहेर शंभराच्यावर हिंदी लोक अुत्सुकतेनें अुभे होते. कोर्टाच्या गॅलरींत फक्त शिफारशीचींच माणसें तेवढीं येअूं दिलीं जात होतीं.

लॉर्ड चीफ जस्टीस न्यायासनावर येअून बसल्यावर मदनलाल यांस आरोपीच्या पिंजऱ्यांत आणण्यांत आलें. त्याच्या दोन्ही बाजूंस दोन धडधाकट वॉर्डर अुभे केले होते. चालू असलेल्या प्रकरणाशीं जणुं आपला संबंधच नाही, अशा प्रकारच्या पूर्ण बेफिकीर वृत्तीने तो अुभा होता. पोलिस कोर्टातील चौकशीच्या वेळेपेक्षा या वेळीं तो अधिक टापटिपीचा दिसला. मदनलाल आरोपीच्या पिंजऱ्यांत निश्चल असा बसला होता; व मोठ्या मजेने न्यायधिशाकडे, मधूनच न्यायालयांत अुपस्थित असलेल्या लोकांकडे व मध्येच सरकारी वकीलाकडे तो दृष्टी फिरवी व पाहात राही. "तूं अपराधी का निरपराधी?" असा प्रश्न त्यास विचारला तेव्हा तो म्हणाला, "मी ठार मारण्याचें कृत्य केलें नाही, असें मुळीच म्हणत नाही; पण तें न्याय्य असून देशभक्तीचें कृत्य होतें. यापेक्षा मला अधिक कांही अेक बोलावयाचें नाही. मला आणखी जें कांही म्हणावयाचें होतें तें माझ्या खिशांतील लेखांत लिहिलेलें असून तो लेख मजपासून काढून नेला आहे."

मदनलाल राहात असे त्या घराच्या मालकिणीची साक्ष झाल्यावर "या बाअीला कांही प्रश्न विचारावयाचे आहेत काय?" म्हणून लॉर्ड चीफ् जस्टीस यांनी मदनलाल यांस प्रश्न केला. तेव्हा तो अुत्सुकतेने आपल्या जागेवर अुभा राहिला व म्हणाला, "मला जबाब द्यावयाचा आहे. प्रश्न विचारावयाचे नाहीत." तेव्हा न्यायाधीश पुन्हा म्हणाले, "आता प्रश्न विचारावयाचे आहेत काय, अेवढेंच सांग." तेव्हा तो खाली बसला व मानेने 'नाही' असें त्याने दर्शविलें. नंतर अेकामागून अेक साक्षी झाल्या; परंतु त्याने अेकाहि साक्षीदाराची अुलटतपासणी घेतली नाही. अुलटतपासणी नाही, फेरतपासणी नाही, किंवा खुनाच्या खटल्यांतील आरोपी आपला जीव बचावण्याकरिता सहाजिकच जी धडपड करील, असें वाटतें, त्यांतला कांहीअेक प्रकार मदनलालने केला नाही. पौर्वात्यांचा दैववाद व माथेफिरूंत दृग्गोचर होणारी जीविताविषयीची बेपर्वाअी,

या गोष्टी मदनलालमध्ये मूर्तिमंत दिसत होत्या, असें अेका अँग्लो-अिंडियन लेखकानें त्या वेळीं लिहिलें आहे.

जबाब देण्याची वेळ आली तेव्हा मदनलाल म्हणाला, "मी पोलिस कोर्टांत दिलेला जबाब वाचा."

तो जबाब मग ज्यूरीला वाचून दाखविण्यांत आला. तेव्हा वाचणाऱ्या माणसाकडे बघत आपल्या कोटाच्या खिशांत हात घालून मदनलाल अुभा होता. नंतर लॉर्ड चीफ जस्टिस यांनी विचारलें, "तुझ्या-वतीनें तूं कोणी साक्षीदार बोलावूं अिच्छितोस काय? तुला ज्यूरीला आणखी कांही सांगावयाचें आहे काय?" तेव्हा त्यानें 'नाही' म्हटलें. पण लॉर्ड चीफ जस्टिस ज्यूरीकडे वळून भाषण करूं लागणार तोंच, "माझ्या खिशांतील लेख" असें कांही तरी तो पुटपुटला. तेव्हा न्यायमूर्तींनी त्याला अुत्तर दिलें, "तुझ्या खिशांतून काय काढून नेलें या गोष्टीशीं मला कांही अेक कर्तव्य नाही. तो खटल्यांतील पुरावा होअूं शकत नाही. आपल्या बचावासंबंधी ज्यूरीला अुद्देशून तुला कांही बोलावयाचें असेल तर बोल." यावर योगायोगानें पिंजऱ्यांत सांपडलेल्या अेखाद्या क्रुद्ध वनराजाप्रमाणे त्यानें न्यायाधिशाकडे बघितलें आणि आपली मान नकारार्थी हालविली.

त्या वेळीं वॉर्डर त्याच्या अगदी नजीक जाअून अुभे राहिले. लॉर्ड चीफ जस्टिस यांनी ज्यूरीला दोन-चार मिनिटांतच खटला समजावून दिला व बजावलें की, या खटल्यांतील गुन्हा राजकीय दृष्ट्या न्याय्य आहे असें दर्शविण्यांत आलें आहे. त्याकडे तुम्ही लक्ष देण्याचें मुळीच कारण नाही. ज्यूरीनें अेकाच मिनिटांत निर्णय करून जाणूनबुजून खून केल्याच्या अपराधाबद्दल मदनलाल यास दोषी ठरविलें.

शिक्षा सांगण्यापूर्वी, "तुला कांही सांगावयाचें असेल तर सांग?" असा प्रश्न न्यायाधिशानें त्याला पुन्हा विचारला. तेव्हा मदनलालची वृत्ति क्षुब्ध झाल्यासारखी दिसली. कांही वेळानें तो म्हणाला, "छे, मला कांहीच सांगावयाचें नाही. वस्तुतः असा प्रश्न

विचारण्याचा तुम्हांला कोणत्या तरी रीतीने अधिकार पोचतो, ही गोष्टच मला मुळांत मुळीच मान्य नाही. मी तुम्हांला तसें यापूर्वीच सांगितलें आहे. तुम्हाला वाटेल तें तुम्ही करूं शकतां. तुमची अिच्छा असल्यास तुम्ही मला देहांताची शिक्षाहि फर्मावूं शकतां. तुमचें तें कृत्य पूर्णपणें नैर्बंधिक असेंच होअील. परंतु मला त्याची मुळीच पर्वा नाही. सध्या तुम्ही गोरे लोक सर्व शक्तिमान आहां. पण ध्यानांत ठेवा की, आमचाहि कधी तरी अूर्जित काळ येअील. त्या वेळीं आम्ही सबल व सत्ताधीश असूं व तेव्हा आम्हांला हवें तें आम्ही तुमचें करूं. यापेक्षा मला अधिक कांहीच सांगावयाचें नाही."

या वेळीं खुर्चीला पाठ टेकून लॉर्ड चीफ जस्टिस हे दुःखदायक गंभीरपणाने मदनलालकडे पाहत राहिले होते. रीतीप्रमाणे फांशीची शिक्षा सांगण्यापूर्वी त्यांनी आपल्या डोक्यावर काळी टोपी चढविली आणि मदनलालच्या वरील अुत्तरावर ते म्हणाले, "मदनलाल, माझ्या कोणत्याहि बोलण्याचा तुझ्यावर यत्किंचित्‌हि परिणाम होणार नाही हें मी जाणून आहें. खून केल्याचा आरोप तुझ्यावर शाबीत झालेला आहे व म्हणून तुला फांशीची शिक्षा देण्यांत येत आहे."

न्यायालयांत स्मशान-शांतता पसरली होती आणि अेखाद्या निर्जन वनांत गंभीर स्वराने शब्द अुच्चारावेत त्याप्रमाणे न्यायाधिशांचा तो शब्दोच्चार भासत होता. शिक्षा सांगितल्यानंतर धर्माधिकाऱ्याने 'परमेश्वर तुला क्षमा करो' हा मंत्र म्हटला. तोंच मदनलाल अुभा राहून न्यायाधिशाला अुद्देशून कांही तरी बोलूं लागला. आपला डावा हात अुचलून लॉर्ड चीफ जस्टिस यांस सैनिकी थाटाचा त्याने सलाम केला व नंतर म्हटलें, "मला तुम्ही फांशीची शिक्षा दिलीत ही तुमची फार मेहरबानी झाली. कारण माझ्या पवित्र मातृभूमीसाठी माझे क्षुद्र प्राण अर्पण करण्याचा सन्मान मला त्यामुळे प्राप्त झाला. या गोष्टीचा मला खरोखर फार अभिमान वाटतो. मला आता कशा-चीहि चिंता वाटत नाही." तदनंतर दोन्ही बाजूला दोन वॉर्डरांनी

धरून त्याला न्यायालयांतून बाहेर आणलें. न्यायालयाच्या पायऱ्या अुतरतांना तो हसतमुख दिसत होता. अशा रीतीने मदनलालवरील या जगप्रसिद्ध खटल्याची परिसमाप्ति अवघ्या दीड तासाच्या अवधींत झाली.

मदनलालचें न्यायालयांतील हें धीरोदात्त वर्तन बघून कांही अिंग्रज लोक अितके भारावून गेले की, त्यांनी त्याची फांशीची शिक्षा रद्द व्हावी यासाठी लगोलग खटपट सुरू केली; परंतु दुर्दैवाने त्या त्यांच्या खटपटीला यश येअू शकलें नाही. मदनलाल यांस दिलेली मृत्यूची शिक्षा रद्द करण्याचें मि. हर्बट गॅडस्टन यांनी नाकारलें. त्याच वेळीं दुसऱ्या अेका गोष्टीची खटपट सुरू झाली होती; आणि त्या गोष्टीला मात्र अपेक्षेबाहेर यश लाभलें. झडतीच्या वेळीं आपल्या खिशांतून पोलिसांनी लांबविलेलें व तिजोरीबंद करून ठेवलेलें आपलें वक्तव्य न्यायालयांत वाचलें जावें अशी अिच्छा खटला चालू असतांना मदनलालने वेळोवेळीं व्यक्त केली होती; परंतु न्यायालयांतील कार्याचा तो भाग नसल्यामुळे त्याची ती अिच्छा धुडकावून लावण्यांत आली होती. मदनलालची ती अिच्छा मृत्यूपूर्वी जर पुरी झाली नसती तर या मर्त्य भूमींतील परिसरांत मदनलालचा जीव खास घोटाळत राहिला असता; परंतु तसा योगायोग नव्हता. अुभ्या जगतांत आपल्या कर्तृत्वाची नि कुशल कार्यक्षमतेची शेखी मिरविणाऱ्या स्कॉटलंड यार्डच्या हातावर तितक्याच कुशलतेने तुरी देअून सावरकरांनी मदनलालचें 'आव्हान' नामक जगप्रसिद्ध वक्तव्य लंडनच्या 'डेली न्यूज' मध्ये नि लगोलग अितरहि अनेक देशांतून प्रसिद्ध करविलें. मदनलालने लिहून ठेवलेलें तें वक्तव्य पुढील-प्रमाणे होतें :–

"माझ्या असंख्य देशबांधवांना अिंग्रजांनी फासावर टांगलें, नि कित्येकांना हद्दपार केलें. या गोष्टीचा अल्पसा सूड म्हणून त्या दिवशीं मी अेका अिंग्रज अिसमाचें रक्त सांडण्याचा प्रयत्न केला, ही गोष्ट मला मान्य आहे. हा प्रयत्न करतांना, माझ्या वैयक्तिक सदसद्विवेकबुद्धीविना मी अन्य कोणाचाहि सल्ला घेतलेला नाही किंवा माझ्या कर्तव्यबुद्धी-

विना या कटामध्ये अन्य कोणालाहि मी सहभागी होऊं दिलें नाही.

परकीय शस्त्रांच्या सहाय्याने ज्या राष्ट्राच्या पायांत दास्यशृंखला अडकविण्यांत येतात तें राष्ट्र चिरंतन युध्यमानच असतें, असाच माझा विश्वास आहे. निःशस्त्र लोकांना उघड उघड युद्ध देणें ही गोष्ट अशक्यप्राय असते, म्हणून अकल्पितपणाने मीः शत्रुपक्षावर हल्ला चढविला. मला तोफांचा वापर करण्यास नकार देण्यांत आला; म्हणून मी माझें पिस्तुल रोखलें व तें झाडलें.

माझ्या मातृभूमीशीं केलेलें अपकारक कृत्य हा प्रत्यक्ष परमेश्वराचा उपमर्द आहे अशी हिंदु या नात्याने माझी भावना आहे. माझ्यासारख्या निःशक्त नि सामान्य बुद्धीच्या सुपुत्राजवळ मातृभूमीच्या वेदीवर अर्पण करण्यास माझ्या रुधिराविना अन्य नैवेद्य उपलब्ध नव्हता. यास्तव माझें रक्त मायभूमीच्या त्या पवित्र वेदीवर मी सांडलें. माझ्या प्रिय मातृभूमीचें कार्य हें प्रत्यक्ष प्रभुरामचंद्रांचें कार्य आहे आणि माझ्या मातृभूमीची सेवा ही साक्षात् त्या गोपालकृष्णाची सेवा आहे. सांप्रतच्या काळांत या दोन देशांत अस्तित्वांत असलेलें अनैसर्गिक नातें जर संपुष्टांत आलें नाही तर हिंदु वंश नि इंग्लिश वंश हे दोन्हीहि वंश जोंपर्यंत जिवंत आहेत तोंपर्यंत या उभय राष्ट्रांत सुरू असलेला हा स्वातंत्र्य-संग्राम सतत सुरूच राहील.

सध्याच्या काळांत माझ्या मातृभूमीने एकच धडा गिरवणें अगत्याचें आहे. तो धडा म्हणजे आत्मबलिदानाचा! आणि आपला स्वतःचा बळी अर्पण करूनच तो धडा इतरांना शिकविण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच केवळ मी माझें प्राणार्पण करीत आहें. या माझ्या हौतात्म्याचा मला परम अभिमान वाटतो. आता माझी परमेश्वराला एकच प्रार्थना आहे. ती ही कीं, याच मातृभूमीच्या पोटीं पुनः पुन्हा मला जन्म लाभावा आणि त्या मातृभूमीचें पवित्र कार्य पुरें होईपर्यंत पुनः पुन्हा मला याच तऱ्हेचा मृत्यु प्राप्त व्हावा.

माझ्या भरतभूमीला स्वातंत्र्य प्राप्त होअून अखिल विश्वांत माझी मातृभू आपल्या तेजाने तळपूं लागेपर्यंत माझ्या जननमृत्यूचें हें चक्र अव्याहत फिरत राहावें, अितकीच अीश्वरचरणीं माझी अखेरची प्रार्थना आहे."

मदनलालची देहांतशिक्षा कार्यवाहींत येण्यापूर्वी सुमारे २८–३० तास हें वक्तव्य जगांतील बहुतेक साऱ्या राष्ट्रांत प्रसिद्ध झालें ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट झाली. या हृदयभेदक वक्तव्याचा मदनलालने जरी न्यायालयांत प्रकट अुच्चार केला असता तरी न्यायाधिशाने दिलेल्या निर्णयांत मुळीच बदल झाला नसता; परंतु आपलें वक्तव्य प्रसिद्ध व्हावें अेवढी मदनलालची अिच्छा मात्र सफल झाली. त्यामुळे सावरकरांच्याबद्दल अपरंपार आदराने त्याचें अंतःकरण काठोकाठ भरून गेलें असेल आणि झालेली मृत्यूची शिक्षा त्याला त्यापुढे आणखीच सुसह्य वाटली असेल.

मृत्युपूर्वी मदनलालने आपल्या तीन अिच्छा व्यक्तविल्या. आपल्या देहाची अुत्तरक्रिया हिंदुधर्माप्रमाणे झाली पाहिजे; आपल्या प्रेताला कोणाहि अहिंदूचा अगर आपल्या भावाचा स्पर्श न झाला पाहिजे आणि तिसरी अिच्छा, आपल्या खोलींतील अुर्वरित कपडे व पुस्तकें या गोष्टी लिलावाने विकून, येतील ते पैसे लंडन येथील राष्ट्रीय निधीस देण्यांत यावेत.

यांपैकी दुसऱ्या दोन अिच्छा अमान्य करण्याचें वस्तुतः कांहीच कारण नव्हतें. हिंदुधर्माप्रमाणे आपल्या देहाची अुत्तरक्रिया व्हावी ही त्याची पहिली अिच्छा मात्र अमान्य करण्यांत आली. त्याच्या शरिराचें दहन करण्याला स्पष्टपणें नकार दर्शविण्यांत आला. ब्रह्मर्षि वशिष्टांनी आपल्या धेनूच्या रोमरंध्रापासून अपार सैन्य निर्माण करून शत्रूचा निःपात केला त्याप्रमाणे मदनलाल याचा देह जर दहन केला तर त्याच्या रक्षाकणांतून असंख्य मदनलाल हुतात्मे निर्माण होतील व ते पुनः पुन्हा कर्झन वायलीच्या ज्ञातिबांधवांचे बळी घेतील अशी

भीति अिंग्रजांना वाटली असावी. म्हणून त्याच्या मृत शरिराचें दहन करण्याचें त्यांनी साफ नाकारलें. ही गोष्ट अिंग्रज-नीतीस धरूनच झाली.

अखेरीस मंगळवार दि. १७ ऑगस्ट १९०९ हा निर्याण-दिन अुजाडला. प्रभातकालचीं कोंवळीं प्रकाश-किरणें कारावासांत शिरण्यापूर्वीच मदनलाल जागा झाला. आदल्या दिवशीं रात्रीं त्याला गाढ झोप लागली होती. मर्त्य जगांतील त्याची ती अखेरची निद्रा होती. आज चिरनिद्रा घेण्यासाठी त्याचा आत्मा पंचत्वांत विलीन होणार होता. अुठल्याबरोबर त्याने नित्याचे विधि आटोपले; नंतर अुत्कृष्ट प्रकारचा पोषाख केला. जणुं अज्ञात अशा नववधूला वरण्यासाठी नवरदेव घोड्यावर चढण्यासाठी जात होता. तुरुंगाबाहेर त्याचे असंख्य देशबांधव घोटाळत होते. मदनलालच्या बाणेदार वर्तनाचा ज्यांच्या मनावर परिणाम झालेला होता असे अनेक अिंग्रज स्त्री-पुरुषहि तुरुंगाबाहेर अुभे होते. कारावासांतील रिवाजाप्रमाणे मदनलालने प्रातःकालचा फराळ केला. जणुं परलोकीच्या दीर्घ प्रवासाला निघण्यापूर्वी पोटाला कांही तरी आधार असावा. नअू वाजले. तुरुंगांतील घंटेचे टोल पडले. तेथील पद्धतीप्रमाणे ख्रिस्ती धर्मोपदेशक त्याच्या नजिक आले; परंतु त्यांच्या तोंडचा अेकहि शब्द त्याने अैकून घेतला नाही. तो कडवा हिंदु होता आणि हिंदु पद्धतीनेच मृत्यूला माळ घालण्याचें त्याने ठरविलें होतें. अेखादा राजाधिराज निवडक सेवकांसह जातो त्याप्रमाणे मदनलाल निवडक अधिकाऱ्यांच्या परिवारांत वधस्तंभाकडे निघाला. त्याने मस्तकावर कांही अेक घातलें नव्हतें; किंवा असेंहि म्हणणें युक्त ठरलें असतें की, अदृश्य कीर्तीचा मंदील त्याने आपल्या मस्तकावर चढविला होता. दृढ पावलांनी नि खंबीर मनाने तो पळतच वधमंचकावर चढला. वधपाशांत त्या कोवळया पोराची नाजुक मान गुंतली. पायाखालचा टोकळा अुडविण्यांत आला नि मान आवळली गेली. अेका क्षणांत मदनलाल नांवाचा 'माथेफिरू' हुतात्मा बनला आणि युगसमाप्तिकालीं भूमीवर पडणाऱ्या निस्तेज सूर्याप्रमाणे तो दिसूं लागला.

# स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर : : ६

तो विचार सावरकरांच्या मनांत जेव्हा स्थिर झाला तेव्हा कांही काल ते दचकले. कारण 'मोरिया' बोटीचा प्रवास कडक बंदोबस्तात चालला होता; आणि त्या बोटीवरून निसटून जाणें ही गोष्ट कांही साधी नव्हती. परंतु म्हणूनच ती गोष्ट करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा सावरकरांच्या मनांत जागृत झाली. सामान्य माणसांनी जशा सामान्य गोष्टी कराव्यात, त्याप्रमाणे असामान्य माणसांनी असामान्य गोष्टीच करून दाखवाव्यात हें तत्त्व सावरकरांना पुरेपूर अवगत होतें. केवळ त्याचसाठी ते पॅरिसहून लंडन येथे येऊन दाखल झाले होते. 'स्कॉटलंड यार्डच्या' गुप्त पोलिसांनी कितीहि बढाया मारल्या तरी सावरकरांना पॅरिसहून लंडनला आणण्यांत त्यांचा मुळीच हात नव्हता. ज्या लोकांनी आपल्या संसारावर निखारे ठेवून आपल्या सर्वस्वाचा होम केला आणि बालपणापासून त्यांचें पुढारीपण मान्य केलें अशा लोकांना संकटांत सापडलेले पाहून सावरकरांचें अंतःकरण द्रवलें, त्यांच्या मनाची शांति ढासळली आणि आपलें पुढारीपण सिद्ध करण्यासाठी ते तडक लंडनला येऊन दाखल झाले. पॅरिसहून लंडनला येण्यांत धोका आहे ही गोष्ट सावरकर जाणून नव्हते असें मुळीच नाही. परंतु संकटाला स्वतःहून आव्हान देऊन त्यांतून शौर्याने शीरसलामत बाहेर पडण्याची महत्त्वाकांक्षा धरणें हें तर सावरकरांच्या क्रांतिकारक जीवनाचें अेकमेव ध्येय होतें. शिवाजी-महाराज जेव्हा औरंगजेबाच्या दरबारांत जाऊन दाखल झाले तेव्हा त्यांना भविष्यकालीन संकटाची कल्पना नव्हती असें मुळीच नाही. परंतु शिवाजी-सावरकरांच्यासारखे लोक संकटाला न जुमानतां आपल्या कर्तव्याला सतत जागत असतात हीच गोष्ट खरी आहे. परहित साधत असेल तर दधीची ऋषीप्रमाणे स्वतःचीं हाडें अर्पि-

ण्यास हे लोक कधींच मागेपुढे बघणार नाहीत. मानवी जीवन ही अेक अखंड कर्तव्यमालिका आहे या अुच्च तत्त्वाचा विसर त्यांना कधींच पडत नसतो. नाही तर ऋषीमुनींचा पक्ष घेअून श्रीरामाला घोर अरण्यांत शिरून राक्षसकुलाचा संहार करण्याचें कांहीच कारण नव्हतें. कौरव-कुलक्षयाची धास्ती धडधडीत समोर दृग्गोचर होत असतांना श्रीकृष्णाने भगवद्गीतेचा अुच्चार करून अर्जुनाला रणसन्मुख करण्याचें कांहीच प्रयोजन नव्हतें. अडाणी मावळ्यांना अेकत्र जमा करून, प्रत्येक वेळीं स्वतःचा जीव धोक्यांत घालून प्रतिकूल परिस्थितींत हिंदवी साम्राज्य निर्मिण्याची शिवाजी महाराजांना कांहीच आवश्यकता नव्हती; किंवा स्वबांधवांच्यासाठीं मंडालेच्या काळया कारावासांत खितपत पडण्याची तरी लोकमान्य टिळकांना काय जरूरी होती! सारांश, वरीलप्रमाणे जे 'युगपुरुष' असतात ते केवळ स्वकर्तव्यासाठीं जगतात आणि मृत्यु पावतात ते देखील स्वकर्तव्यासाठीच! कोणी त्यांना 'युगपुरुष' म्हणो वा न म्हणो, कोणी त्यांना चुकलेले देशभक्त म्हणो, आपला कर्तव्याचा पवित्र मार्ग ते सतत अनुसरतच असतात.

सावरकरांचें मनदेखील याच कर्तव्य-कल्पनेने भारून गेलें होतें. क्रांतिकारकाला साजेसें सतीचें वाण आपल्या बालपणापासूनच सावरकरांनी आपल्या हातीं स्वेच्छेने घेतलें होतें. आता माघार घेणें अिष्ट नव्हतें. जीवनमरणाचा प्रश्न त्यांच्यासमोर अुभा होता. दि. १३ मार्च १९१० रोजीं रात्रीं अिंग्लंडच्या व्हिक्टोरिया स्टेशनवर स्कॉटलंड यार्डच्या गुप्त पोलिसांनी त्यांना अटक केली. तेव्हापासून त्यांच्यावरील खटल्याचें काम अिंग्लंडमध्ये जवळजवळ तीन महिने चाललें; आणि हिंदुस्थानांत त्यांची पाठवणी करण्याचें निश्चित झालें. त्याचबरोबर हेंहि निश्चित झालें होतें कीं, हिंदुस्थानांतील निर्घृण न्यायालयांत त्यांना देहांताची - क्वचित् काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावण्यांत येणार. तेव्हा फांसावर लटकण्यापेक्षा किंवा अंदमानांत कुजत, कुढत, जळत

पडण्यापेक्षा आपण कांहीतरी असामान्य साहस करून दाखवावें असें त्यांना साहजिकच वाटूं लागलें.

तें कृत्य करण्यांत अनेक गोष्टी साधणार होत्या. त्यामुळे क्रांतिकारक पक्षाची प्रतिष्ठा वाढणार होती, स्कॉटलंड यार्डचा नक्षा अुतरणार होता आणि परराष्ट्राच्या किनाऱ्याला सावरकरांचे अेकदा पाय लागले म्हणजे आंतरराष्ट्रीय निर्बंधांना नि नीतिनियमांना अिंग्लंड हें राष्ट्र किती मर्यादेपर्यंत मान देते ही गोष्ट जगाला दिसणार होती व त्यायोगाने अिंग्लंड या राष्ट्राचे खरे दांत बाहेर पडणार होते.

परंतु त्याचबरोबर दुसऱ्याहि बाजूचा विचार करणें आवश्यक होते. बोटीवरून पळून जाण्यांत जर त्यांची फसगत झाली असती तर मात्र भीषण भवितव्याला त्यांना तोंड द्यावें लागलें असतें. आणि तीच शक्यता अधिक होती. कारण 'मोरिया' बोटीची नादुरुस्ती होअून ती बोट जेव्हा मार्सेलिसच्या किनाऱ्याला लागली तेव्हा सावरकरांच्या भोंवतालचा बंदोबस्त अधिकच कडक झाला. त्यांच्यावर देखरेख करणारे अिंग्रजी पहारेकरी डोळयांत अधिक तेल घालून पहारा करूं लागले; आणि सावरकरांच्या बारीकसारीक हालचालींवरहि लक्ष ठेवूं लागलें. फक्त आंघोळीच्या नि संडासाच्या वेळीं मात्र त्यांना अेकट्याला सोडण्यांत येत होतें.

आणि याच गोष्टीचा सावरकरांनी नेमका फायदा करून घेतला. बोट मार्सेलिसच्या किनाऱ्याला लागल्यानंतर त्यांच्या मनांत विचारांचें नुसतें थैमान माजलें. सर्व बाजूंनी भरपूर विचार केल्यानंतर कृतीची वेळ आता समीप येअून ठेपली होती. काळ मृगगतीने अेकसारखा पुढे धावत होता. रात्रीची वेळ होती. पृथ्वीवर सगळीकडे भीषण अंधःकार दाटला होता. दशदिशा त्या अंधकाराने नुसत्या धुंद झाल्या होत्या. समोर अथांग दर्या पसरलेला होता. माणसाची नजरहि पुरती पोचणार नाही अितक्या दूर अंतराबर त्या सागराला आकाश टेकलेलें दिसत होतें. क्वचितप्रसंगीं क्षितिजावर चमकणाऱ्या

अेखाद्या अंधुक नक्षत्राप्रमाणे सावरकरांच्या मनांत आपल्या मुक्ततेची अंधुक आशा चमकत होती; परंतु अेकंदर वातावरण अंधःकारमय असेंच होतें. अशा वेळीं ज्या भगवान मॅझिनीला सावरकरांनी गुरु-समान लेखलें होतें; त्या भगवान मॅझिनीच्या रूपाने सावरकरांचा क्रांतिकारक आत्मा बोलूं लागला असला पाहिजे. "समोर पसरलेल्या त्या अंधाराच्या पलीकडे या जगताला अुजाळा देणारा भगवान् सूर्यनारायण लवकरच प्रगट होणार आहे. तरी तूं या अंधाराला भिअूं नकोस. समोर दिसणाऱ्या क्षितिजाच्या पलीकडे तुझी प्रिय मातृभूमि आहे. त्या ठिकाणीं तुझे पूर्वज स्वर्गीय निद्रा अुपभोगीत आहेत; आणि तुझे बांधव मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा भार तुझ्यावर टाकून निद्रासुखाचा अनुभव घेत आहेत. स्वदेश हें परमेश्वराने तुला दिलेलें घर आहे. त्या घरामध्ये वाढून तूं त्या परमेश्वराच्या स्वरूपाप्रत जाअून पोंचावें असा त्याचा हेतु आहे. त्या तुझ्या स्वदेशाला तुझें मार्गदर्शन हवें आहे. त्याला तुझें रक्त अर्पण कर, आणि तुझे विचार शिकव. तुझा देश वैभवाच्या शिख-राला जाअून दाखल होणारच होणार, अशी रम्य भविष्यवाणी तुझ्या पूर्वजांनी आपल्या रक्ताने आकाशाच्या पार्श्वभूमीवर कोरून ठेवलेली आहे आणि ती खरी करून दाखविणें आता तुझ्या हातीं आहे. तुला प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांचा वरदहस्त लाभला असल्यामुळे तुला अद्वितीय कर्तृत्वतेज प्राप्त झालेलें आहे. अुभ्या जगाने हेवा करावा असा तुझ्या देशाचा भूतकाल आहे आणि आशेने फुललेला भविष्य-काळ तुझ्यासमोर अुभा आहे. मग अुगाच समोर पसरलेल्या या अंधाराला आणि समोर दिसणाऱ्या या अथांग सागराला भितोस कां? टाक अुडी त्या सागरांत आणि हो स्वतंत्र!"

जणू अेखाद्या अनामिक आकर्षणाने सावरकर भारावून गेले आणि बोटीवरून निसटून जाण्याचा आपला निश्चय त्यांनी कायम केला.

त्या वेळीं अुत्तर रात्र संपून गेली होती आणि पहाटेचा समय

समीप येअून ठेपला होता. अेकदा मनाचा वरीलप्रमाणे निश्चय झाल्यानंतर सावरकर लगोलग पुढील अुद्योगाकडे वळले.

पहारेकऱ्याकडे वळून ते हसत म्हणाले, "मला संडासांत जायचं आहे. नेता का ?"

पहारेकऱ्याने त्यांच्या त्या म्हणण्याला संमति दर्शविली. परंतु त्याने लगेच आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला जागें केलें. तो सावरकरांच्या-बरोबर संडासापर्यंत गेला.

पुढील सारा प्रकार अेका क्षणांत घडून आला. सावरकर संडासांत गेले आणि आंतून त्यांनी कडी लावून घेतली. आपल्या कपड्यांवरून रात्रीं चढवलेला झगा त्यांनी काढला आणि सहजगत्या संडासांतील आरशावर टाकला. त्यामुळे बाहेर अुभ्या असलेल्या पहारेकऱ्याला त्यांच्या हालचाली बघण्याचा मार्ग अजिबात बंद झाला. मग त्यांनी आपल्या अंगावरचे कपडे काढले आणि 'स्वातंत्र्यलक्ष्मी'चा मनां-तल्यामनांत जयघोष करून 'पोर्टहोल'च्या दिशेने झेप घेतली. सावर-करांचें शरीर 'पोर्टहोल'मधून हळूहळू बाहेर पडूं लागलें. निमिषार्धांत त्यांना त्यांचें अीप्सित स्वातंत्र्य प्राप्त होणार होतें तोंच पहारेकऱ्याच्या लक्षांत ती गोष्ट आली. त्याने संडासाचा दरवाजा फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु तो प्रयत्न सिद्धीस जात नाही हें पाहिल्यावर त्याने खिडकीची तावदाने फोडून आंत प्रवेश केला. आता निकराचा सामना घडतो की काय असें वाटूं लागलें. सावरकरांच्या त्या धाडसी प्रयत्नाकडे बघून तो पहारेकरी ओरडूं लागला आणि म्हणूं लागला, "घात झाला !" परंतु त्यांच्या मागोमाग 'पोर्टहोल'मध्ये अुडी घेण्याची त्याची छाती कांही केल्या होअीना. अर्थात् त्या स्वातंत्र्यवीराची बरोबरी करणें त्या भाडोत्री नि पोटार्थी शिपायाला शक्य नव्हतें. त्याने खूप आरडाओरडा केला. परंतु अितक्या अवधींत 'पोर्टहोल'-मधून सावरकर निसटले होते आणि त्यांचें शरीर समुद्रपृष्ठाला टेकलें होतें. हा 'न भूतो न भविष्यति' अशा प्रकारचा प्रयत्न करतांना

त्यांच्या शरीराची कातडी सोलून निघाली होती. परंतु त्यांचें स्वातंत्र्योत्सुक अंतःकरण, प्राप्त झालेल्या त्या स्वातंत्र्याने अितकें हर्षोत्फुल्ल झालें होतें की त्यापुढे शरीरवेदनांची त्यांना मुळीच पर्वा वाटली नाही. अप्राप्य स्वातंत्र्य टिकविण्यासाठी ते भराभर पोहूं लागले. कांही यार्डांच्या अंतरावर मार्सेलिसचा किनारा – ती फ्रान्सची स्वातंत्र्यभूमि त्यांना स्पष्टपणाने दिसत होती. आपल्या जिवाचें रान करून ते पोहत होते. कधी सागराच्या पृष्ठभागावर तर कधी सागरजलाच्या पोटांतून तर कधी लाटांच्या अुत्तुंग शिखरांवर स्वार होअून त्यांचा तो स्वातंत्र्य-प्रवास सुरू होता. अिकडे अधिकाऱ्यांची मात्र अेकच धांदल अुडाली. सावरकरांच्या सुटकेच्या रूपाने त्यांची नामुष्कीच जणू जलपृष्ठावर तरंगत होती. सावरकरांच्या पाठोपाठ अंतराअंतराने त्या अथांग सागरांत अेकामागून अेक अुड्या पडल्या; आणि अेखाद्या विद्ध झालेल्या वनराजाचा हट्टी शिकारी कुत्र्यांनी जसा पाठलाग करावा त्याप्रमाणे त्या जखमी झालेल्या नरसिंहाचा अविरत पाठलाग आरंभित झाला. क्रुद्ध शत्रु हात धुअून पाठीमागे लागलेला आहे आणि अिकडे स्वातंत्र्य तर हातातोंडाशीं येअून ठेपलेलें आहे, अशा तऱ्हेचा अपूर्व सागर-संगर जगाच्या अितिहासाने त्या दिवशीं अगदी पहिल्या-प्रथमच अवलोकन केला असेल. श्रीहनुमानाने केलेल्या लंका-अुड्डाणाची अेकच अुपमा या शूर कृत्याला कांही अंशाने केवळ लागूं पडली असती.

अितक्यांत सावरकरांच्या कानावर पिस्तुलाचे बार पडले. क्षणभर ते थास्तावले असतील. परंतु दुसऱ्याच क्षणीं त्या गोष्टीची त्यांना धन्यता वाटली. झडणाऱ्या गोळीबाराने कदाचित् आपला बळी घेतला जाअील, परंतु ती गोष्ट आपल्याला अुचित अशीच होणार आहे. त्यांच्यासारख्या वीरवराला यापेक्षा गौरवाचा दुसरा कोणता प्रकारचा मृत्यु येणार होता! त्या अपार सागराच्या रणांगणावर त्यांचा देह तर अशा तऱ्हेने पंचत्वांत विलीन

पावला असता तर स्वर्गींच्या देवदेवतांनी, अष्ट दिशांना स्थित असलेल्या दिग्गजांनी, सागरांतील जलदेवतांनी आणि भूपृष्ठावरील मानवांनी त्यांच्यावर अविरत पुष्पवृष्टि खचित केली असती. त्यांच्या स्वागतार्थ आकाशांत मेघ गरजले असते, भूलोकीच्या त्या शूर सम्राटावर आपल्या जलधारांच्या योगाने त्या मेघांनी अभिषेक धरला असता. त्यांच्या त्या अद्वितीय पराक्रमाचें तेज प्रतिबिंबित झाल्यामुळे सूर्याला अधिकच तेज चढलें असतें आणि समीरणाच्या सहाय्याने पृथ्वीमातेने त्यांचें तें यशोगान दशदिशांना प्रसृत केलें असतें; परंतु योगायोग अगदी निराळा होता !

सावरकरांनी मोठ्या मिनतवारीने फ्रान्सच्या भूमीवर पाय ठेवला; आणि त्यानंतर ते अेकसारखे पळत सुटले. त्यांच्यामागून अिंग्रज अधिकारीहि पळत होते. समोरच्या रस्त्यावरून ट्रॅमगाड्या, बसगाड्या धावत चाललेल्या त्यांना दिसत होत्या. परंतु त्यांमध्ये त्यांना प्रवेश मिळण्याची शक्यता नव्हती. अंगावर वस्त्र नाही, सारा देह भिजलेला, अंगावरील कातडी सोलून निघाल्यामुळे त्या ठिकाणाहून रक्त पाझरत असलेलें आणि केस अस्ताव्यस्त झालेले अशा प्रकारच्या परिस्थितींत त्यांना ट्रॅम अगर बसमध्ये प्रवेश मिळणें शक्य नव्हतें. त्याशिवाय भाडें देण्यासाठी त्यांच्याजवळ अेक पै देखील नव्हती. नेपोलियन बादशहाने केवळ दोन मिनिटांकरिता वॉटर्लूची लढाअी गमावली. सावरकरांनी दोन पेन्स जवळ नव्हते म्हणून आपलें स्वातंत्र्य गमावलें. त्यामुळे पळण्याशिवाय त्यांना दुसरें गत्यंतर नव्हतें. त्यांच्या पाठीमागे चवताळलेले अिंग्रज अधिकारी आणि त्यांच्या जोडीला रस्त्यावरील असंख्य लोक 'चोर, चोर' अशी हाकाटी करीत अेकसारखे पळतच होते. समुद्रांत पोहण्याचे अनावर परिश्रम सावरकरांना आधीच झाले होते. त्यांतून हा पळण्याचा ताण पडल्यामुळे ते थकले आणि समोर अुभ्या असलेल्या अेका फ्रेंच पोलिसाला धापा टाकीत मोडक्यातोडक्या फ्रेंच भाषेंत म्हणूं लागले, "मला अेखाद्या न्याया-

धिशासमोर घेअून चल!" पुनः पुन्हा त्यांनी तो शब्दोच्चार केला. परंतु त्या पोलिस शिपायाला त्यांच्या म्हणण्याचा नि अेकंदर त्यांच्या या वागणुकीचा कांहीच अर्थ कळेना. लगोलग त्यांच्या पाठीशीं त्यांचा पाठलाग करणारे ते सारे अधिकारी येअून अुपस्थित झाले. त्यांच्या बोलण्यावर त्या फ्रेंच शिपायाचा साहजिकच विश्वास बसला. त्याशिवाय त्या अधिकाऱ्यांनी त्या फ्रेंच शिपायाच्या हातांत चकचकीत नाणीं टाकलीं. तो प्रकार सर्वापेक्षा बिनतोड असाच होता आणि त्याचा योग्य तो परिणाम लगेच घडूनहि आला. त्या कवडी किंमतीच्या मर्कटाने सावरकरांसारखें अमोल माणिक मागचा-पुढचा मुळींच विचार न करतां त्या अिंग्रजी अधिकाऱ्यांच्या खुशाल स्वाधीन केलें.

सावरकर पुन्हा बंदिवान झाले. पराक्रमाची शर्थ करून शत्रूच्या जाळ्यांतून निसटलेला सिंह पुन्हा पारध्याच्या जाळ्यांत अडकला.

सावरकरांना धरून पुन्हा बोटीवर आणल्यानंतर अेका अधिकाऱ्याने त्यांच्या डोक्यावर अेक ठोसा लगावला. ती गोष्ट सहन न होअून सावरकरांनी त्याच्या हातून आपली सुटका करून घेतली आणि मोठ्या त्वेषाने ते त्या अधिकाऱ्याच्या अंगावर तुटून पडले आणि म्हणाले, "ही गोष्ट लक्षांत ठेवा की, तुमच्यापैकी निदान अेकाचा तरी मुडदा पाडल्याविना मी मरणार नाही!" त्यांचा तो त्वेष बघून अितर सारे अधिकारी चपापले आणि त्यांच्या भोवतीं जमा झालेली गर्दी हटवूं लागले.

मग बोटीवरील अेका बाजूच्या केबिनमध्ये मोठ्या कडक बंदोबस्तांत त्यांची पाठवणी करण्यांत आली. झाल्या प्रकारामुळे त्यांना परमावधीचा थकवा आला होता. त्यांना धाप लागली होती. आपला शारीरिक आजार बळावेल की काय अशी भीति निर्माण झाली. पदरीं पडलेल्या अपयशामुळे त्यांच्या मनावर भयंकर परिणाम झाला. त्यांचें धैर्य या प्रकारामुळे खचेल की काय असें वाटूं लागलें. अिंग्रजी अधिकाऱ्यांच्यावर मोठाच ठपका आल्यामुळे ते त्यांच्यावर अगदी चव-

टाळून गेले होते. बोटीचा प्रवास पुन्हा आरंभित झाला. सुटकेची सारी आशा त्यांच्या अंतःकरणांतून आता नष्ट झाली होती. हळुहळू रात्र पडली. त्या रात्रीं त्यांच्यावर विशेष जागता पहारा ठेवण्यांत आला. त्यांच्या केबिनमध्ये त्यांना दिसेल अशी अेक नागवी तरवार लटकूं लागली. रात्रंदिवस त्यांच्या हातापायांत बेड्या घालण्यांत येअूं लागल्या. संडासांत देखील त्यांना अेकटें सोडण्याची अनुज्ञा नव्हती. त्या लहानशा अरुंद केबीनमध्ये सावरकरांचें आयुष्य अशा तऱ्हेने चाललें होतें. गगनांत स्वच्छंदाने विहार करणाऱ्या या गरुडाला फक्त चार फुटाच्या जागेंत जखडून टाकण्यांत आलें होतें. केबिनमध्ये विजेचा मोठा दिवा रात्रंदिवस त्यांच्या सोबतीला ठेवण्यांत येत असे. त्यामुळे आधीच कोंदट असलेल्या त्या केबिनमध्ये मनस्वी अुष्मा होअूं लागला. त्या केबिनमधून आकाशाचा अल्प खंड देखील सावरकरांना दिसत नव्हता. कित्येक दिवस त्यांना आकाश-मार्गाचें नुसतें ओझरतें दर्शन देखील झालें नाही. मधूनच निरनिराळे अधिकारी त्यांच्या भेटीस येत आणि दमदाट्या देअून परत जात. त्या दिवशीं रात्रीं त्यांच्या केबिनमधील अितर अुतारूंना दुसरीकडे हालविण्यांत आलें. तो प्रकार सावरकरांना कांहीसा चमत्कारिक वाटला. अधिकारी-वर्गाने वेळोवेळीं दिलेल्या छळाच्या धमक्या खऱ्या होण्यापूर्वीची तर ही सिद्धता नसेल ना ! मग नजिकच्या भविष्यकालांत होणाऱ्या निर्घृण छळासाठी त्यांनी आपलें मन तयार केलें.

आपली तुमान समोरच्या खिळयाला अडकवून रात्रीचा अेक पहारेकरी झोपला तेव्हा त्याने आपल्या तुमानीच्या खिशांत भरलेलें पिस्तुल ठेवलेलें आहे ही गोष्ट सावरकरांच्या नजरेस आली. त्या रात्रीं घडणाऱ्या प्रकारासाठी त्यांनी आपलें धैर्य अेकवटलें. परंतु त्यांना कांही केल्या झोप येअीना; नुसते डोळे मिटून ते स्वस्थ पडून राहिले. मग पिंजऱ्यांत अडकलेल्या सिंहाला कोल्ह्या-कुत्र्यांनी डिवचावें असा प्रकार सुरू झाला. त्यांना अैकूं येतील असे अपशब्द अेका पहारे-

कऱ्याने अुच्चारले. छळाचीहि धमकी त्याने सावरकरांना दिली. त्याबरोबर अेखाद्या तीराप्रमाणे सावरकर ताडकन् अुभे राहिले आणि आपला आवाज अुंचावून त्या पहारेकऱ्याला म्हणाले, "छळाची भाषा कुणासमोर अुच्चारतोस? अरे, आधीच मेलेल्याला भय रे कशाचें वाटणार! माझ्या आयुष्यांत मी जेव्हा या क्रांतिकार्याला प्रथम प्रारंभ केला तेव्हाच स्वहस्ताने माझ्या घरावर मी निखारा ठेवला आणि मगच अितरांचीं घरें भस्मसात करण्याच्या अुद्योगाकडे मी वळलों. मी माझें शिर केव्हाच धडावेगळें करून ठेवलेलें आहे. प्रश्न फक्त तुझा आहे. मुलांबाळांच्या संगतींत तुला अजून तुझें आयुष्य मौजेने जगावयाचें आहे. तेव्हा माझ्यासमोर छळाची भाषा अुच्चारण्यापूर्वी अेकदा नव्हे तर दोनदा विचार करून ठेव. तुम्हां सर्वांच्या समोर माझें अेकट्याचें कांहीच चालणार नाही ही गोष्ट मी पुरेपूर जाणून आहें. परंतु तुम्ही सुद्धा ही गोष्ट जाणून असा की तुमच्यापैकी निदान अेखाद्याचा तरी निकाल लावल्याविना मी मरणार नाही हें खास!"

अेखादी यक्षिणीची कांडी फिरावी त्याप्रमाणे सावरकरांचा छळ नि छळाची भाषा त्यानंतर लगेच बंद पडली.

अेडन बंदरानंतर सावरकरांचा प्रवास अेस्. अेस्. साष्टी या बोटींतून सुरू झाला. त्या बोटीच्या तिसऱ्या मजल्यावर सावरकरांना अेका बंद खोलींत ठेवण्यांत आलें होतें. ती जागा अतिशय कोंदट होती. त्यामुळे तेथील अुष्मा त्यांना अतिशय जाणवूं लागला. श्वासोच्छ्वास करणेंहि त्यांना कष्टप्रद होअूं लागलें. त्यांना आपला जीव अगदी नकोनकोसा झाला. अशा परिस्थितींत अेकच समाधान त्यांना सोबत करीत होतें. त्यांच्या या साहसी प्रयत्नांत जरी त्यांना जयप्राप्ति झाली नव्हती तरी त्यांनी आपलें पवित्र कर्तव्य चोखपणाने बजावलेलें होतें, हें अेकच समाधान त्यांच्या अंतःकरणाच्या पृष्ठभागावर तरंगत होतें.

परंतु तेंहि समाधान फार काळ टिकूं शकलें नाही. भोवतालची

परिस्थिति प्रतिक्षणीं असह्य होअूं लागली; आणि त्या वेळीं आत्महत्येचे विचार सावरकरांच्या मनांत प्रबळ होअूं लागले. त्यांच्या मनांत विचारांचा डोंब अुसळला आणि त्या परिस्थितींत पुढील काव्यात्मक आर्त विचार त्यांच्या मनांत अुद्भवले. "माझें तारूं सागरांतून प्रवास करीत पुढे पुढे चाललें आहे. हा अुष्मा मला आता सहन होअीनासा झाला आहे. त्यामुळे जीविताचा भारहि सहन करणें मला शक्य होअील असें दिसत नाही. मग आता हें जीवन जगण्यांत तरी कोणता अर्थ आहे ! दुष्ट शत्रूच्या रथ-चक्राला बांधून घेअून फरफटत ओढले जाण्याकरिताच का जगायचें ! का त्या शत्रूचें यश अधिक अुज्ज्वल करण्यासाठी जगायचें ! जगायचें तरी कशासाठी ! म्हणून हे मृत्यो, ये. लवकर ये. हे सागरा तुझ्या परिसरांत अेखादें तुफान वादळ निर्माण करून तुझ्या अुत्तुंग लाटांच्या पोटांत मला सामावून घे. अरे, अेके काळीं पॅरिसला असतांना माझा प्राण व्याकुळ होअून मला मातृभूमीला नेण्याविषयीं मी तुला प्रार्थिलें होतें. माझी ती प्रार्थना तूं अैकलीस खरी. पण किती वेगळ्या तऱ्हेने ! तुझा हा आशीर्वाद मला आता शापवचनापेक्षाहि अधिक भीषण वाटत आहे. आता तरी मला तुझ्या अुदार अुदरांत घेअून या कठीण प्रसंगीं मला साहाय्य कर. तुझा क्रोधाग्नि प्रज्वलित कर. तुझ्या पृष्ठभागावर लाटांचा कल्लोळ अुसळून दे; आणि त्यांच्या करवी माझें भक्षण कर. मला पदतलीं तुडविण्याचें माझ्या शत्रूचें समाधान तरी त्यामुळे नष्ट होअील. तेव्हा ही गोष्ट करच !"

परंतु सागराने सावरकरांची हीहि प्रार्थना अैकली नाही. अखेरीस शुक्रवार दि. २२–७–१९१० रोजीं सकाळीं साष्टी बोट मुंबअीच्या किनाऱ्याला लागली आणि बंदिवान या नात्याने सावरकरांनी आपल्या प्रिय मातृभूमीवर पदार्पण केलें.

त्याच दिवशीं सावरकरांना मुंबअीहून नाशिकास नेण्यांत

आलें; व तेथे त्यांना अटकेंत ठेवण्यांत आलें. त्या ठिकाणीं तपासाचें काम पुरें झाल्यानंतर त्यांना येरवड्याच्या तुरुंगांत नेण्यांत आलें. त्या तुरुंगांत असतांना दिनांक १३–९–१९१० रोजीं बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांची नि सावरकरांची भेट झाली. तत्पूर्वी नाशिकचे फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेट मि. मॉंटगॉमरी यांनी सावरकर व त्यांच्या-बरोबरचे अितर आरोपी यांच्यावरील आरोपांची प्राथमिक चौकशी करून त्यांच्यावरील खटला 'सेशनकमिट' केला.

त्यानंतर गुरुवार दि. १५–९–१९१० रोजीं मुंबअी हायकोर्टांतील सरन्यायाधीश सर बेझिल स्कॉट, न्यायमूर्ति चंदावरकर नि न्यायमूर्ति हीटन या तिघांच्या खास न्यायाधीशमंडळासमोर नाशिक येथील कटाच्या सुप्रसिद्ध खटल्याला मुंबअी हायकोर्टाच्या अिमारतींत प्रारंभ झाला. प्रथम या प्रकरणीं अेकंदर तीन खटले भरण्यांत आले. हा खटला चालावयाचा म्हणून न्यायालयांत विशेष प्रकारचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यांत आला होता. कोणासहि प्रेक्षक म्हणून न्यायालयांत येण्यास बंदी करण्यांत आलेली होती. बॅरिस्टर व वकील यांसच काय ती आंत येण्याची सवलत ठेविलेली होती. त्याशिवाय 'टािअम्स ऑफ अिंडिया', 'सांज वर्तमान' व 'अिंदुप्रकाश' या तीन पत्रांच्या बातमीदारांनाच आंत सोडण्यांत आलें होतें. अेकंदर या पहिल्या खटल्यांत ३८ आरोपी होते. त्यांच्यासाठीं बंदिस्त गॅलरीसारखा सभोवार कठडा लावलेला मोठा पिंजरा मुद्दाम तयार केला होता. दहा वाजण्याच्या सुमारास आरोपींना कैद्यांच्या गाड्यांतून न्यायालयांत आणलें आणि त्या भव्य पिंजऱ्यांत बसविलें. त्या पिंजऱ्यांतील बिन-पाठीच्या बाकांवर सर्व आरोपी जेव्हा स्थानापन्न झाले तेव्हा दरअेक रांगेच्या शेवटीं पोलिस अुभे करण्यांत आले. आरोपीचे पोषाख साधेच पण नीटनेटके होते आणि खटल्याचें काम सुरू होअीपर्यंत आरोपी आपसांत मनमोकळेपणानें बोलत होते. न्यायालयाच्या निरनिराळ्या मार्गांवर पोलिसांचा सक्त पहारा अुभा होता. पोलिस कमिशनर मि.

अेडवर्ड्स् हे जातीने:न्यायालयांत अुपस्थित:होते· आणि बंदोबस्ताचें काम डोळ्यांत तेल घालून बघत होते.

न्यायमूर्ति न्यायासनावर अधिष्ठित होण्यास आता थोडा अवधि होता. अितक्यांत सावरकरांना मोठ्या बंदोबस्तांत न्यायालयांत आणण्यांत आलें. त्या वेळीं अिंग्रजी धर्तीचा पोषाख त्यांनी केलेला होता आणि ते हसतमुख दिसत होते. पोलिस अधिकारी सावरकरांचा मार्सेलिसचा पराक्रम अजून विसरले नव्हते. त्यामुळे त्यांना न्यायालयांत आणण्यापूर्वी विशेष प्रकारची खबरदारी घेण्यांत आली होती.

अेखाद्या सेनापतीला शोभेल अशा लष्करी थाटांत जेव्हा सावरकरांना न्यायालयांत आणण्यांत आलें तेव्हा त्यांच्या सहकाऱ्यांनी नि सहाभियुक्तांनी त्यांच्याबद्दल आपला यथायोग्य आदर व्यक्तविण्यासाठी अंतस्फूर्तीने टाळ्या वाजविल्या. तेव्हा सावरकरांच्या अंतःकरणांत हर्षलहरी अुत्पन्न होअून त्यांना धन्यता वाटली. त्यांच्यापैकी कांहींनी सावरकरांची केवळ मैत्री पत्करली म्हणून त्यांना या यमयातनांना तोंड द्यावें लागलें होतें. सावरकरांशीं नुसती ओळख दर्शविणें याचा अर्थ त्यांच्या क्रांतिकार्यांत आपण सहभागी आहोंत ही गोष्ट मान्य करण्यासारखें होतें; परंतु तरी देखील त्यांच्या नुसत्या दर्शनाने त्या सर्वांचीं मनें आनंदाने पुलकित झालीं. त्यांच्या आयुष्यांत नवी चेतना निर्माण झाल्याचा त्यांना स्पष्ट भास झाला आणि आपल्या त्या परमप्रिय पुढाऱ्याला त्यांनी सहजस्फूर्त अशी वंदना दिली. फांशीच्या रक्तबंबाळ खांबाच्या कृष्णछायेंत त्या सर्वांचे देह अुभे असतांना, त्या गोष्टीची यत्किंचित्‌हि पर्वा न करतां, त्यांनी व्यक्तविलेला आपल्याबद्दलचा तो आदरभाव बघून सावरकरांना कृत्यकृत्य झाल्यासारखें वाटलें. आतापर्यंतच्या आपल्या आयुष्यांत सावरकरांना लोकप्रिय नायकाचें भाग्य लाभलेलें आहे. लक्षावधि लोकांच्या मिरवणुकींत मोठ्या मानाने मिरविण्याचा योग त्यांना अनेक वेळा लाभलेला आहे. आपल्या प्रिय मातृभूमीच्या कानाकोपऱ्यांतील परिसरांत फुललेल्या

पुष्पमालांनी त्यांच्या सुवर्ण देहावर आतापर्यंत असंख्य वेळा गर्दी केलेली आहे. परंतु त्या सन्मानापेक्षा अिटलीच्या अगर रशियाच्या अुज्ज्वल परंपरेनुसार आरंभित केलेल्या क्रांतिकार्यात ज्या त्यांच्या सहकाऱ्यांनी अहमहमिकेने भाग घेतला, त्या अेकनिष्ठ सहकाऱ्यांनी, देहांतशिक्षेच्या काळया छायेखाली अंतस्फूर्तीने दिलेल्या त्या वंदनेने सावरकर खरोखर धन्य झाले. खऱ्या शूराचा खरा सन्मान समरांगणावरच होत असतो. व्यासपीठावर नव्हे !

सावरकर स्थानापन्न झाल्यावर परिचयाचा मौजेचा कार्यक्रम त्यांच्यामध्ये सुरू झाला. सावरकरांना सर्वांची ओळख पटली; परंतु अेका व्यक्तीला त्यांनी ओळखलें नाही. ती व्यक्ति म्हणजे त्यांचे धाकटे बंधु नारायणराव सावरकर ही होय. जेव्हा त्यांना धाकट्या बंधूची ओळख पटली तेव्हा सावरकर आपल्या कनिष्ठ बंधूला कडकडून भेटले. ती भरत-राम भेट बघून साऱ्यांचे डोळे पाणावले; परंतु त्या भेटीचें तें अपूर्व दृश्य बघून पोलिसांचा क्रोध अनावर झाला; आणि तें सहाजिकच होतें. कारण अितक्या अुदात्त गोष्टी बघण्याची संधी त्या खात्याला क्वचि-तच लाभते. तो व्यक्तीचा दोष नसून साऱ्या खात्याचा दोष आहे. असो. मग या अितिहास-प्रसिद्ध खटल्याला प्रत्यक्ष प्रारंभ झाला. सरकारच्या वतीने ॲडव्होकेट जनरल मि. जार्डिन, मि. वेल्डन, मि. वेलिणकर नि मि. निकोल्सन प्रभृति विधिज्ञ अुभे राहिले. सावर-करांच्या वतीने सुप्रसिद्ध बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांनी काम चालविलें.

खटल्याच्या आरंभीं मि. जार्डिन यांचें भाषण सुरू झालें. १९०५–६ सालाच्या सुमारास स्थापन झालेल्या मित्र-मेळयापासून नाशिक येथील कटास प्रारंभ झाला असा शोध त्यांनी लावला. या 'मित्र-मेळयाची'च पुढे 'अभिनव भारत मंडळी' बनली. तेथपासून 'अिंडिया हाअुस'मधील सावरकरांच्या क्रांतिकारक हालचालींचें त्यांनी दिग्दर्शन केलें. त्यानंतर आरोपींवरील आरोपमालिका वाचून दाखविण्यांत आली. ती पुढीलप्रमाणे होती :–

आरोपींनी नाशिक व ब्रिटिश हिंदुस्थानांतील आणखी कित्येक ठिकाणीं व वि. दा. सावरकर यांनी लंडन येथे ( १ ) युद्ध करण्याचा प्रयत्न केला, ( २ ) युद्ध करण्याच्या अुद्देशाने आपसांत कट केला, ( ३ ) ज्या गुन्ह्याबद्दल १२१ कलमाप्रमाणे शिक्षा देण्यांत येते असे गुन्हे करण्याच्या अुद्देशाने कट केला, ( ४ ) बादशहांचें हिंदुस्थानावरील राज्य काढून घेण्याच्या अुद्देशाने कट केला, ( ५ ) मुंबअी सरकार व हिंदुस्थान सरकार यांस गुन्हा होअील अशा तऱ्हेने धाक दाखविण्याकरिता कट केला, ( ६ ) युद्ध करण्याच्या अुद्देशाने हत्यारें व दारूगोळा जमा केला, ( ७ )युद्ध करण्याचा हेतु आहे ही गोष्ट बेकायदेशीरपणाने छपवून ठेवली.

हे सारे आरोप आरोपींना वाचून दाखविण्यांत आले. तेव्हा सावरकरांखेरीज अितर सर्व आरोपींनी आपल्यावरील आरोपांविषयींच्या चौकशीचें काम चालावें असें सांगितलें. सावरकरांनी ' मी गुन्हेगार नाही ' अेवढेच सांगितलें.

मग सरकारच्या वतीने अेकामागून अेक साक्षी सुरू झाल्या. " साक्षीदारांना कांही प्रश्न विचारावयाचे असल्यास विचारा " असें कोर्टाने सांगितलें असतां, सावरकर अुभे राहून म्हणाले, " मी या खटल्याकडे कोणत्या दृष्टीने पाहतों, हें सांगण्याकरिता मात्र मी अुभा राहिलों आहे. फ्रान्सने माझें संरक्षण करावें, अशी माझी हक्काची मागणी आहे. फ्रेंच राष्ट्राचा बहुमानाचा पाहुणचार लाभावा म्हणून मी तेथे गेलों. पण ब्रिटिश शिपायांनी मला जबरदस्तीने पकडून परत आणिलें. अिंग्लंड हें आंतरराष्ट्रीय कायद्याचें पुरस्कर्ते राष्ट्र होतें, आणि पळून आलेल्या पुष्कळ राजकीय गुन्हेगारांना अिंग्लंडने आश्रयहि दिला होता. मी फ्रान्सच्या अभ्रतीवर भरंवसा टाकून आहे. तेव्हा मजवरील खटल्याची चौकशी करण्याचें काम या कोर्टाच्या अधिकारकक्षेच्या बाहेरचे असून मी या खटल्याशी कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवूं अिच्छित नाही. "

सरकारी साक्षी संपल्यानंतर सर्व आरोपींचे जबाब झाले. सरन्यायाधिशांनी सावरकरांना त्यांचा जबाब मागितला तेव्हा ते म्हणाले, " मी अगदी निरपराधी आहें; आणि माझी सदसद्विवेक बुद्धि मी गुन्हेगार नाही अशी मला ग्वाही देत आहे. पण ब्रिटिश कोर्ट किंवा हिंदुस्थानांतील कोर्ट यांचा, माझ्या खटल्याची चौकशी करून निवाडा करण्याचा अधिकार मान्य करण्यास असमर्थ असल्यामुळे मी कोणताहि जबाब देण्याचे नाकारतों. "

सर्व आरोपींनी बचावाकरिता पुरावा देण्याचें नाकारलें तेव्हा सरकारच्या वतीने अॅडव्होकेट-जनरल यांचें भाषण झालें. आरोपींच्या वकिलांचीं बचावाचीं भाषणेंहि यथावकाश पार पडलीं.

या खटल्याचें काम अेकंदर ६९ दिवस चाललें व सत्तराव्या दिवशीं कोर्टाने निर्णय सांगितला. या खटल्यांत तीनशेच्या वर साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. खटल्यांतील निशाण्यांची ( Exhibits ) संख्या चारशेवर झाली. अशा मोठ्या नि महत्त्वपूर्ण खटल्याचा निर्णय शनिवार दि. २४।१२।१९१० रोजीं सांगण्यांत आला.

त्या दिवशीं कडक बंदोबस्तांत सर्व आरोपींना न्यायालयांत आणण्यांत आलें. आज निर्णयाचा दिवस म्हणून अेकाहि आरोपीच्या चर्येवर चिंतेची यत्किंचितहि छटा अुमटलेली दिसत नव्हती. अुलट आपापसांत त्यांचे निरनिराळे हास्यविनोद चालले होते. सरन्यायाधिशाने निर्णयपत्र वाचण्यास प्रारंभ केला तेव्हा न्यायालयांत सगळीकडे भीषण शांतता पसरली.

सर्व आरोपींचे कबुलीजबाब ग्राह्य धरण्यांत आल्याचें सांगून निर्णयपत्रकांत पुढे म्हटलें होतें, " मित्रमेळ्याचा हेतु क्रांतिकारक होता. सावरकर हे त्याचे पुढारी होते. शारीरिक व मानसिक शिक्षणाचा कार्यक्रम राज्यक्रांतिकारक हेतूकरिताच योजलेला होता; आणि नवनवीन वाङ्मय प्रसिद्ध करण्याचें कार्य चालू ठेवून सावरकरांनी आपण अंगिकारिलेल्या मार्गाचेंच अवलंबन ' अिंडिया हाअूस 'मध्ये

असतांना चालविलें होतें. या साऱ्या गोष्टींबद्दल आम्हांला तिळमात्रहि शंका नाही. सरकारी कामदारांचे खून करण्याकरिता व सरकाराशीं संबंध असलेल्या अितर अिसमांचेहि जीव घेण्याकरिता विनायक सावरकरांनी लंडनहून पिस्तुलें पाठविलीं व सरकारास घाबरवून सोडण्याचा प्रयत्न केला यावर आमचा विश्वास आहे. चेंगिरीराव व कोरेगांवकर यांच्या साक्षींवरून, ब्रिटिश हिंदुस्थानावरील बादशहांचें राज्य बादशहांच्या हातांतून काढून घेण्याचा विनायक सावरकरांचा हेतु होता हें अुघड आहे. सर्वसाधारण कट झाला होता, आणि भाषणें करून, चोपडीं, हस्तपत्रकें वगैरे वाटून व पिस्तुलें आणि 'बॉम्ब-मॅन्युअल' पाठवून सावरकरांनी त्या कटाच्या हेतूचें प्रवर्तन अिंग्लंडांत केलें यावर कोर्टाचा विश्वास आहे."

कटाचा सारा पुरावा ग्राह्य धरून या न्यायाधीश-मंडळाने वेगवेगळ्या आरोपींना निरनिराळ्या शिक्षा दिल्या. मात्र त्या सर्वांचे धुरीण सावरकर यांना जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली आणि जखमेवर मीठ चोळण्याच्या अिरादाने त्यांची सारी मालमत्ताहि जप्त केली.

लगेच सावरकरांना बेड्या ठोकण्यांत आल्या; आणि या जगताच्या रंगभूमीवरून त्या शूर सम्राटाला लगेच दृष्टीआड करण्यांत आलें. आपल्या सहकाऱ्यांना धीर यावा यासाठी पुढील आशयाची अुज्वल कविता सावरकरांच्या मुखांतून त्या वेळीं बाहेर पडली.

" हे मातृभूमे, आपल्या अर्भकांची ही अल्पस्वल्प सेवा गोड मानून घे; आणि त्यांतच आनंद मान. तुझ्या स्तनपानाने आम्ही खरोखर धन्य झालों आहोंत. जन्मजन्मांतरीं तुझें तें अपूर्व ऋण फेडणें आम्हांला शक्य होणार नाही. पाहा ! या धडाडलेल्या यज्ञकुंडाकडे बघ. त्या यज्ञकुंडाच्या वेदीवर देहार्पण करून आम्ही तुझ्या अुपरोक्त ऋणाचा ' पहिला हप्ता ' फेडला आहे. पुनःपुन्हा नवनवीन जन्म घेअून तुला दास्यमुक्त करण्यासाठीं या पेटलेल्या यज्ञकुंडांत आम्ही आमच्या देहाचा हविर्भाग पुनः पुन्हा अर्पण करूं.

वण सावरकरांनी बालपणापासून आपल्या मनाला लावून घेतलेली होती. त्यामुळे घडलेल्या अेकाहि प्रकाराबद्दल त्यांना किंचित्‌हि विषाद वाटला नाही किंवा ते धास्तावूनहि गेले नाहीत.

अखेरीस १९११ सालाचा फेब्रुवारी महिना संपला आणि 'हेग' न्यायालयाचा प्रतिकूल अपेक्षित निर्णय सावरकरांच्या हातीं पडला. त्या दिवशीं त्यांच्या अंगावरचे नेहमीचे कपडे अुतरविण्यांत आले आणि बंदिवानाचा पोषाख त्यांच्या अंगावर चढविण्यांत आला. त्या वेळीं आपल्याला झालेल्या शिक्षेचा पन्नास वर्षांचा कालावधि त्यांच्या डोळ्यांसमोर अुभा राहिला आणि त्यांचें चित्त विचलित झालें; परंतु तें कांही काळच! सावरकरांच्या अेकंदर जीवनाची बैठकच तत्त्वज्ञान्याची आहे. आपल्या पवित्र कर्तव्य-मंदिराकडे आपली अढळ नजर राखून अेखाद्या कर्मयोग्याप्रमाणे त्यांचा जीवन-प्रवाह अेकसारखा चाललेला आहे. तेव्हा कांही क्षण जरी त्यांचें मन विचलित झालें तरी लगेच त्यांनी अुच्च मानवी तत्त्वज्ञानावर आपली बैठक मारली आणि आपल्या शिक्षेचा प्रवास त्यांनी सुरू केला. सावरकरांनी आपल्या मनाला स्पष्टपणाने बजावलें की, "सिद्धीच्या मानससरोवरावर क्रीडा करण्याचें ज्या पिढीचें भाग्य असेल ते राजहंस सुखेनैव मुक्ताफळभोजन करून बिसतंतूंचा फराळ करोत. परंतु प्रयत्नांच्या मृतसरोवराच्या विषारी प्रदेशांतून ज्या पिढीस मार्ग कंठावयाचा आहे तिने प्रतिकूलाचे लोखंडाचे चणेच खावयाची व पचवावयाची सवय ठेविली पाहिजे."

अेकदा हें तत्त्वज्ञान मान्य झाल्यानंतर कुठलें आलें आहे दुःख नि कुठला आला आहे विषाद? सारें दुःख नि विषाद दशदिशा पळून गेले!

अशा प्रकारच्या अुदात्त तत्त्वज्ञानाची कास धरून सावरकरांनी अंदमानाचें प्रस्थान ठेवलें. डोंगरीचा कारागृहवास आता लवकरच संपुष्टांत येणार होता. त्या सुमारास सावरकरांच्या पत्नी माअी

आपल्या सौभाग्य-ठेव्याला भेटण्यासाठी आल्या. ज्या सौभाग्याबद्दल कोणत्याहि स्त्रीने धन्यता मानावी असा तो अमोल ठेवा होता आणि म्हणूनच माअी खऱ्या अर्थाने सौभाग्यवती होत्या. त्या अलौकिक पति-पत्नींची डोंगरीच्या कारागृहांत जी अपूर्व भेट झाली नि पुढे जो दारुण विरह झाला त्या भेटीचें नि त्या विरहाचें शब्दचित्र अेखाद्या महाकवीलाहि रेखाटतां येणार नाही. निरपराध रामाला कैकेयीने चौदा वर्षें वनवासाची शिक्षा सांगितली. त्या वेळीं तो वनवास सुसह्य करण्यासाठीं श्रीरामासमवेत सीतामाअी याहि वनामध्ये जाणार होत्या. परंतु या आधुनिक श्रीरामाला आपल्या पन्नास वर्षांच्या वनवासांत तेंहि भाग्य लाभणार नव्हतें. ती भेट अखेरचीच होती ही दुःखद जाणीव दोघांच्याहि अंतःकरणांत जागृत होती. त्या भेटीच्या वेळीं जे शब्द अुच्चारले जाणार होते तेहि अखेरचेच ठरणार होते. सावरकरांनी आपल्या प्रिय पत्नीला अुद्देशून जे शब्द त्या वेळीं अुच्चारले ते जरी अखेरचे ठरले असते तरी सप्तजन्मांतरीं ते शब्द माअींच्या कर्णसंपुटांत अेकसारखे निनादतच राहिले असते. कांही अलौकिक शब्द जे अुच्चारले जातात ते युगायुगाच्या अवकाशांतून अेकसारखे घुमतच राहतात. तशाच प्रकारचे सावरकरांचे ते शब्द होते.

या भेटीच्या वेळीं माअींना अुद्देशून सावरकर म्हणाले, " जर कधी ह्या सामान्य संसाराचा मोह होअू लागला तर असा विचार करा की, मुलांमुलींची वीण वाढविणें व चार काटक्या अेकत्र करून घरटीं बांधणें ह्यालाच जर संसार म्हणावयाचें असेल तर असले संसार कावळे-चिमण्याहि करीतच आहेत; पण संसाराचा याहून भव्यतर अर्थ जर घेणें असेल तर मनुष्यासारखा संसार थाटण्यांत आपणहि कृतकार्य झालों आहोंत. आपलीं चार चूलबोळकीं आपण फोडून टाकलीं; पण त्या योगे पुढेमागे हजारों जणांच्या घरीं क्वचित सोन्याचा धूर निघेल आणि घर घर म्हणून करीत असतांहि लगने नाही का

शेकडो जणांची घरें ओसाड पाडलीं, लग्नाच्या मंडपांतून नवरानवरीस विलग हिसडून, मृत्यूच्या दाढेंत ढकलून, दैवाने विजोड करून टाकलीं! असा विवेक करून संकटांस तोंड द्या."

मानवी संसाराचा याप्रमाणे भव्यतर अर्थ माईंना सांगून सावरकर आपल्या कोठडींत परतले. तेव्हा त्यांची शक्ति क्षीण झाली होती. परंतु आपली शक्ति क्षीण करून त्यांना आता भागण्यासारखें नव्हतें. मनाचा धीर करून अंदमानांत आपला वैयक्तिक संसार थाटण्यासाठी त्यांना लवकरच निघावयाचें होतें.

अंदमानाला जाण्यासाठी 'महाराजा' बोटीवर सावरकरांनी जेव्हा पहिलें पाऊल ठेवलं तेव्हा त्यांच्या जिभेवर तुकाराममहाराजांच्या काव्यपंक्ति खचित उभ्या राहिल्या असतील,

"आता कैचें येणें जाणें। सहज खुंटलें बोलणें॥"

आपल्या पराक्रमाचें तेज जगाला अल्पवयांतच दाखवून, वयाच्या अवघ्या सत्ताविसाव्या वर्षी जगाचे डोळे दिपवून सावरकर अंदमानांत निघाले. शौर्याची शर्थ करून विश्वासरावाने अल्पवयांतच समरांगणीं आपला चिमकुला देह ठेवला. त्याच समरांगणाच्या धुमश्चक्रींत त्याचा पितृबंधूसदाशिवरावभाऊ अल्पवयांतच त्या भाऊगर्दींत नाहीसा झाला. श्रीज्ञानेश्वरांनी आपलें अीप्सित कार्य अल्पवयांतच संपवून आपली अवतारसमाप्ति केली; आणि विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी देखील आपल्या तेजस्वी बुद्धीची अुज्वल ध्वजा फडकावून अिहलोकींची यात्रा अल्पवयांतच संपविली. थोरल्या माधवरावांनी पराक्रमांची दीर्घ मालिका गुंफून आपला देह ठेवला तोहि अल्पवयांतच! त्याच अल्पवयांत हा स्वातंत्र्यवीर आपलें अफाट कर्तृत्व नि अजोड शूरत्व जगाला दर्शवून, त्या कर्तृत्वाने नि शूरत्वाने जगाचे डोळे दिपवून, अेखाद्या कर्मयोग्याप्रमाणे अंदमानाच्या काळ्यापाण्यावर, श्रीरामाप्रमाणे केवळ चौदाच वर्षे नव्हे तर आयुष्याची पन्नास वर्षें वनवास भोगण्यासाठी स्वकर्तव्यपालनाच्या विशाल आनंदांत निघून गेला.

पोलिसांनी तपासाची शर्थ केली. परंतु खुनाचा तपास कांही केल्या लागेना. भर दिवसा लाहोर शहराच्या परिसरांतील पोलिस चौकीनजिक अेका पोलिस अधिकाऱ्याचा खून करण्यांत आला होता. खुनी मनुष्य शोधून काढण्यासाठी सहस्रो रुपयांचीं बक्षिसें घोषित करण्यांत आलीं होतीं. परंतु खुनी मनुष्याचा पत्ता कांही केल्या लागेना. शहरांत झडतीचें नि अटकेचें अविरत सत्र सुरू झालें. परंतु खुनी कोण या प्रश्नाचें अुत्तर मात्र अखेरीस अनिर्णीतच राहिलें.

राजसत्तेला या खुनी कृत्याचें जरी विलक्षण आश्चर्य वाटलें तरी ज्या लोकांनी तें कृत्य पार पाडलें त्या लोकांना त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें वस्तुतः कांहीच कारण नव्हतें; कारण त्या खुनामागे तशीच पार्श्व-भूमि होती. दि. ३० ऑक्टोबर १९२८ रोजी स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा धडधडीत खून पाडणारें सायमन कमिशन लाहोर येथे येअून दाखल झालें. त्या कमिशनच्या निषेधार्थ अेक प्रचंड मिरवणूक लाहोर शहरांतून निघाली. त्या मिरवणुकीला बंदी करण्यांत आली. त्या मिरवणुकीचें नेतृत्व पंजाबकेसरी लाला लजपतराय यांच्याकडे होतें. मिरवणुकीचा अथांग सागर पसरला होता, आणि अेखाद्या दीपस्तंभाप्रमाणे लालाजी मिरवणुकीच्या अग्रभागीं तळपत होते. मिरवणूक हटण्याचें जेव्हा चिन्ह दिसेना तेव्हा पोलिसांनी लाठीमार करण्यास प्रारंभ केला. लालाजींच्या हृदयावर अेकामागून अेक लाठ्या बसूं लागल्या; परंतु तरीहि त्यांचें धैर्य विचलित झालें नाही. अखेरीस हृदयावर अुमटलेल्या जखमांमुळे दि. १७ नोव्हेंबर १९२८ रोजीं त्यांनी अिहलोकीची यात्रा मोठ्या धीरोदात्तपणाने संपविली.

लालाजींची अेक जीवनज्योत विझली खरी, परंतु त्या ज्योतींतूनच

लगोलग अेक प्रखर तेज निर्माण झालें आणि त्याचें दाहकत्व अित-स्ततः पसरूं लागलें. आपल्या मृत्यूपूर्वी कांही दिवस लालाजींनी केलेल्या अेका भाषणांत झालेल्या या अुपमर्दाचें निराकरण करण्याचा स्पष्ट मार्ग देशाला दाखवून दिला होता. या अुपमर्दाचें निराकरण राष्ट्रीय स्वातंत्र्यानेच होणारें आहे असें त्यांनी सांगितलें व सरकाराला स्पष्टपणाने बजावलें की, "हा लाठ्यांचा मार मजवर नसून ब्रिटिश साम्राज्यावर आहे. सरकार व त्यांचे अधिकारी जनतेशीं असलें वर्तन चालू ठेवतील तर आमच्यांतील तरुण माणसें आमच्या मर्यादेबाहेर जाअून राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सापडेल तो मार्ग स्वीकार-तील. हा प्रसंग बघण्यास मी जिवंत असेन वा नसेन, पण मी जिवंत असलों किंवा नसलों तरी असा प्रसंग सरकाराने आमच्या तरुणांवर आणल्यास त्या झगड्यांत माझा आत्मा त्यांना आशीर्वादच देअील."

हे शब्द लालाजींनी अुच्चारले मात्र, सारीं तरुण अंतःकरणें अेक-मेव भावनेने पेटलीं. सूड! सूड! हा अेकच शब्द सर्वांच्या अंतःकर-णांत घुमूं लागला. येअील तो प्रसंग निमुटपणे सहन करणारे ते निष्प्रभ लोक नव्हते. लालाजींच्या विशाल वक्षःस्थलावर ज्या नराधमाने लाठीचे निर्दय प्रहार केले त्या नराधमाला त्याच्या त्या बाहुदंडा-बरोबरच यमसदनाला धाडण्यास्तव अनेक तरुण बद्धपरिकर झाले. लालाजींनी त्यांना मार्ग दाखवून दिला होता. आपल्या अंतःकरणां-तील दुर्दमनीय अुत्साह जागृत करून, भ्याड वृत्तीचा त्याग करून, त्या मार्गाची वाटचाल करणें अेवढीच गोष्ट त्यांना आता ठाअूक होती. ज्या तरुणांचीं अंतःकरणें अशा करुण नि दारुण प्रसंगांनी पेट घेत नाहीत तीं षंढांचीं अंतःकरणें होत असा घोष वातावरणांत निनादूं लागला. त्या तरुणांचें अहिंसाव्रत-पालन आता संपुष्टांत आलें होतें. त्यांची मनःशांति पार ढासळून गेली होती. "झालें गेलें विसरून जाअूं या!" असें म्हणण्याचा तृतीय पंथ त्यांनी झुगारून दिला होता. प्रलयकालाच्या तीव्र वन्हीप्रमाणे जगाला अेक तर आपलें तेज दर्शवूं;

नाही तर आपणच खुशाल भस्मसात होऊन जाऊं, असा पण त्यांनी उच्चारला. रणांतील मृत्यु हाच आता त्यांना प्रिय होता; आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये निसर्गतःच वसणारी एकमात्र सूड-भावना त्यांच्या अंतःकरणांत उफाळून उठली. सूड ! नृशंस राजसत्तेचा सूड ! !

या सार्‍यांच्या अग्रभागीं सरदार भगतसिंग हा तरुण वावरत होता. आपल्या वयाचीं कांही वर्षें त्याने अहिंसा-व्रताचें मोठ्या कसोशीने पालन केलें होतें; परंतु लालाजींच्या मृत्यूनंतर अहिंसा-धर्मावर असलेला त्याचा विश्वास पार उडाला आणि त्याने सूडाची कास धरली. " १८५७ चें स्वातंत्र्य-समर " ही सावरकरांची क्रांति-गीता त्याने यापूर्वीच आत्मसात केली होती. मग त्या उज्ज्वल क्रांतिगीतेत ग्रथित केलेलें " सूडाचें तत्त्वज्ञान " विसरणें त्याला शक्य होतें काय ?

सूडाची भावना या जगतांत जर जन्म पावली नसती तर जिकडे तिकडे आसुरी शक्तीचा नंगा नाच आरंभित झाला असता. अधर्माचें अधिराज्य इतस्ततः नांदलें असतें. ऋषि-मुनींचा नि सज्जन साधूंचा ठायींठायीं उपमर्द झाला असता; आणि पाशवी शक्तीचें निर्मूलन करण्यास कोणतीहि शक्ति समर्थ ठरली नसती. अधर्माच्या सार्वभौम राज्यावर अधिष्ठित होऊन लंकाधीश रावण सर्वसत्ताधीश ठरला असता नि न्यायप्रिय प्रभुरामचंद्रांना भणंगभिकारी होऊन रानावनांत दिवस कंठावे लागले असते. प्रतिपक्षाच्या अंतःकरणांत सूडाची यत्किंचितहि भावना नाही अशी जर खात्री झाली असती तर कंस, जरासंध आदि त्या वेळेच्या उन्मत्त राजसत्ता अधिक उन्मत्त होऊन त्यांनी भगवान श्रीकृष्णाला पदतलीं घालून त्याच्यावरच आपलें राजसिंहासन थाटलें असतें. एखादा प्रलय-वन्ही अंतःकरणांत सतत धुमसत ठेवावा त्याप्रमाणे भीमसेनाने सूडाची ज्वाला आपल्या अंतःकरणांत चेतवली नसती तर याज्ञसेनीला भरसभेंत सव्य ऊरू दर्शविणाऱ्या दुःशासनाला आपला कंठनाल कधी काळीं चिरला जाईल आणि त्यामधून स्रवणारें उष्ण रक्त प्राशन

केलें जाअील अशी धास्ती वाटण्याचें कांहीच प्रयोजन नव्हतें. अभिमन्यु-वधाचा केवळ सूड म्हणून पार्थाने सिंधुराज जयद्रथाच्या वधाची घोर प्रतिज्ञा अुच्चारली नसती तर अखिल कौरव-कुलाचा थरकाप अुडून त्यांना निष्प्रभ होण्याचें कांहीच कारण नव्हतें. सूडाची ही भावना सूड घेणाऱ्याच्या अंतःकरणांत जोंपर्यंत दडून असते तोंपर्यंत त्या भावनेचें रुद्र स्वरूप प्रकटरीत्या दृग्गोचर होत नाही. परंतु अंतःकरणांत स्थित असलेल्या सूडाचें यज्ञकुंड अेकदा का चेतलें म्हणजे मग त्यामधून प्रतिक्षणीं प्रलयंकर ज्वाला अुफाळूं लागतात. आणि नंतर त्या सूड-चक्राला परशुरामाच्या परशूची, श्रीरामाच्या कोदंडाची, श्रीकृष्णाच्या सुदर्शन-चक्राची, पार्थाच्या गांडीव धनुष्याची नि भीमाच्या गदेची प्रचंड शक्ति आपोआपच प्राप्त होते. त्यानंतर अप्रतिहत अशा वेगाने ते चक्र आपल्या पीडकावर प्रहार करतें आणि त्या अन्याय-पीडकाला मारीत मारीत मरतें किंवा मरत मरत मारतें. तेव्हा या सूड-चक्राला कोणी गति देअूं नये हेंच अुत्तम ! परंतु अेकदा का त्या चक्राला गति लाभली म्हणजे ती गति देणाऱ्या व्यक्तीला वा समष्टीला नष्ट केल्याविना तें सूडचक्र केव्हाहि थांबत नाही. सूड चक्राला क्षमा कधीहि संमत नसते.

तेव्हा जी सूडाची नैसर्गिक भावना न्यायप्रिय नि सत्यनिष्ठ प्रभु रामचंद्रांनी आणि पूर्णावतार समजल्या जाणाऱ्या श्रीकृष्णांनी आपल्या अंतःकरणांत धर्म्य म्हणूनच बाळगली ती भावना भगतसिंगाने आपल्या अंतःकरणांत वागविली असली तर त्यांत त्याचा कांहीच दोष नव्हता. ही भावना बाळगीत असतांना तीमधून कांही निष्पन्न होअील अशी आशा त्याने कधीहि आपल्या अंतःकरणांत धरली नव्हती. चक्रव्यूह भेदून पुन्हा परत येण्याची विद्या विदित नसतांना केवळ तो चक्रव्यूह शत्रुपक्षाने निर्माण केलेला आहे आणि त्यामध्ये जर आपण प्रवेश केला नाही तर आपल्या कुलाची प्रतिष्ठा कलंकित होअील यास्तव बाल अभिमन्यूने कोणत्याहि प्रकारचा अन्य विचार न करतां त्या

व्यूहांत प्रवेश केला; त्याप्रमाणे अिंग्रजी राजसत्तेच्या विशाल चक्र-व्यूहांत प्रवेश करतांना भगतसिंगाच्या मनांत हाच विचार असला पाहिजे की, या हिंदुभूमीवर मन मानील तसे अत्याचार करून चालणार नाही. त्या अत्याचारांचें परिमार्जन आज ना अुद्या झाल्याविना कधीहि राहणार नाही, अशी स्पष्ट जरब शत्रुपक्षाच्या अंतःकरणांत आधण निर्माण करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे.

तें पवित्र कर्तव्य पार पाडण्यासाठी ठिकठिकाणचे तरुण सरदार भगतसिंगाच्या या क्रांतिकार्यांत प्रत्यक्ष येअून सामील झाले होते. बिहार, ओरिसा, बंगाल, मध्यप्रांत, पंजाब अित्यादि प्रांतांतून अनेक गुप्तमंडळ्या यापूर्वीच स्थापन झालेल्या होत्या. पण १९२८ च्या ऑक्टोबरपर्यंत या गुप्तमंडळ्यांकडून कोणतेंहि महत्त्वपूर्ण कार्य घडलें नाही. तोंपर्यंत सारे तरुण संधीची जणुं वाट बघत होते. नोव्हेंबर महिना अुजाडला आणि त्या तरुणांना हवी असलेली संधी प्राप्त झाली.

कोणतेंहि कृत्य प्रत्यक्ष करण्यापूर्वी कांही तरी तात्कालिक कारण हें घडावेंच लागतें; परंतु तें तात्कालिक कारण त्या कृत्याचें प्रमुख कारण मात्र होअूं शकत नाही. तत्पूर्वीचीं अनेक कारणें तें कार्य घडवून आणण्याची क्रिया करीत असतात. शिशुपालाचा केवळ शंभरावा अपराध त्याच्या वधाला कारणीभूत झालेला नाही. तर तत्पूर्वीचे अनेक अपराध त्याला हळूहळू त्याच्या मृत्यूसमीप आणून खेचीत होते. शिशुपालाचा शंभरावा अपराध भरेपर्यंत श्रीकृष्णाला वाट बघावी लागली होती. त्याप्रमाणे भगतसिंग नि त्याच्या सहकाऱ्यांना कांही अेका विशिष्ट मर्यादेपर्यंत थांबावें लागलें होतें. पोलिसांनी केलेल्या निर्घृण लाठीमारामुळे दि. १७ नोव्हेंबर १९२८ ला लालाजींनी अिहलोकींची यात्रा संपविली. मदांध झालेल्या राजसत्तेचा जणुं तो शंभरावा अपराध होता. यापुढे सहनशक्तीची कमालमर्यादा झाली होती. भगतसिंग नि त्याच्या सहकाऱ्यांनी ठरविलें की, लालाजींच्या या वधाचा प्रतिशोध हा घेतला गेलाच पाहिजे; आणि त्या दृष्टीने दि. ९ नि १०

डिसेंबरला मोझँग हाउसमध्ये त्या साऱ्या क्रांतिकारक तरुणांची बैठक भरली नि त्या बैठकींत पोलिस प्रमुख मि. स्कॉट याचा खून करण्याचा बेत कायम करण्यांत आला. मि. स्कॉट यानेच लालाजींना लाठीचा प्रसाद दिला होता असा त्या सर्वांचा समज होता. दि. १७ डिसेंबर १९२८ हा दिवस त्या खुनासाठी निश्चित करण्यांत आला.

दि. १७ डिसेंबरला दुपारीं २ वाजतां मोझँग हाउसमध्ये पुन्हा त्या सर्वांची शेवटची बैठक भरली. या बैठकीला चंद्रशेखर आझाद तथा 'पंडितजी', सुखदेव, शिवराम राजगुरु, जयगोपाल नि महावीरसिंग हे तरुण अुपस्थित होते. यापूर्वी झालेल्या बैठकीला सरदार भगतसिंग हाहि अुपस्थित होता. परंतु या बैठकीच्या प्रसंगीं भगतसिंग कुठे दिसला नाही. त्या वेळीं तो अेका निराळ्याच अुद्योगांत गुंतला होता. "स्कॉट यांची यमसदनाला रवानगी!" अशा आशयाचीं पत्रकें लिहिण्यांत त्या वेळीं ही स्वारी अगदी रंगून गेली होती. या कार्यात हंसराज व्होरा यानेहि त्याला सहाय्य दिले. किशोरीलाल हाहि त्या वेळीं अुपस्थित होता आणि त्या लेखन-कार्याला आपला हातभार लावीत होता.

अशा तऱ्हेने खुनाची सर्व सिद्धता झाल्यानंतर दुपारीं दोन वाजतां मोझँग हाउसमध्ये अखेरची बैठक झाली; आणि त्यानंतर सर्वजण आपापलें नियुक्त कार्य पार पाडण्यासाठी मोझँग हाउसमधून बाहेर पडले.

त्या दिवशीं सकाळीं १० वाजतां जयगोपालने पोलीस कचेरीला भेट दिली आणि स्कॉटच्या हालचालींवर ठरल्याप्रमाणे त्याने पाळत ठेवली.

परंतु आयत्या वेळीं अेक निराळाच घोटाळा झाला! दुपारचे चार वाजले होते. त्या वेळीं तांबड्या रंगाच्या अेका मोटार-सायकलवरून अेक पोलिस अधिकारी पोलिस कचेरींतून बाहेर पडला. त्याला बघून कांही तरुणांनी आपलीं पिस्तुलें सरसावलीं. जयगोपालने ठरल्याप्रमाणे त्या सायकलस्वाराकडे अंगुलिनिर्देश केला. मोटार-सायकलने अजून

फारसा वेग घेतलेला नव्हता. पोलिस चौकींतून तो पोलिस अधिकारी बाहेर पडला. मोटार-सायकल जवळ येतांच शिवराम राजगुरूने आपलें पिस्तुल सरसावलें आणि त्या पोलिस अधिकाऱ्यावर गोळी झाडली. गोळी लागतांच तो अधिकारी कोलमडून खाली पडला आणि त्याचा अेक पाय मोटार-सायकलच्या चाकाखाली अडकला. अितक्यांत भगतसिंग विजेप्रमाणे धावून त्या ठिकाणीं आला आणि त्याने आपल्या पिस्तुलांतून भराभर गोळ्या झाडण्यास प्रारंभ केला. त्या पोलिस अधिकाऱ्याच्या शरिराची अक्षरशः चाळणी झाली. जणुं ज्या राजसत्तेचा तो प्रतिनिधि होता त्या राजसत्तेने केलेल्या प्रत्येक अपराधाबद्दल भगतसिंगाने अेकेक गोळी अुडविली होती. हें पवित्र कार्य पार पाडल्यानंतर भगतसिंग, राजगुरु नि जयगोपाल यांनी पळण्यास प्रारंभ केला. त्यांच्या पाठीमागून चननसिंग नांवाचा पोलिस शिपाअी नि फर्न नांवाचा रहदारी प्रमुख हे दोघेजण धावू लागले. हा पाठलाग चालू असतांना सरदार भगतसिंगाने फर्न याचे वर अेक गोळी झाडून वृक्षावरून गळणाऱ्या अेखाद्या पक्व फळाप्रमाणे त्याला खाली पाडलें. चननसिंगाने अजून पाठलागाची चिकाटी सोडली नव्हती. जणुं तो आपल्या मृत्यूच्या मार्गाकडेच अेकसारखा धावत होता. परंतु त्याला फार वेळ धावावें लागलें नाही. पंडीतजीने अेक गोळी त्याच्यावर झाडली आणि त्याचें जीवन समाप्त केलें. त्यानंतर दयानंद अँग्लो-वैदिक कॉलेजमधील वसतिगृहाचा आरोपींनी आश्रय घेतला आणि आपलं पवित्र कर्तव्य पार पाडल्याच्या आनंदांत त्या सर्वांनी ती रात्र घालविली.

हा सारा प्रकार कांही क्षणांतच घडून आला. परंतु तो घडल्यानंतर त्यांना कळून आलें की, त्यांच्या पिस्तुलाला बळी पडलेला माणूस हा स्कॉट नसून त्याचा दुय्यम् अधिकारी मि. जे. पी. सॉन्डर्स हा होता.

परंतु त्याबद्दल विषाद मानण्याचें त्यांना आता कांहीच कारण नव्हतें. कारण ज्या राजसत्तेच्या प्रतिनिधीने लालाजींचा बळी घेतला

होता त्या राजसत्तेच्या कोणत्याहि प्रतिनिधीचा केवळ प्रतिशोध म्हणून बळी घेणें त्यांना आपलें कर्तव्य वाटलें. त्याप्रमाणे त्यांनी आपलें तें पवित्र कर्तव्य बजावलें.

दुसरे दिवशीं लाहोर शहरांत जिकडे तिकडे पत्रकें फडकूं लागलीं, " लालाजींच्या खुनाचा बदला ! सॉन्डर्सचा खून ! ! लालाजींच्या खुनाचा सूड ! ! ! "

आणि त्याचबरोबर अटकेचें नि झडत्यांचें सत्र सुरू झालें. पिसाळलेल्या रानडुकराने अेखाद्या नंदनवनांत अप्रतिहत संचार करून जसा धुमाकूळ घालावा त्याप्रमाणे साऱ्या लाहोर शहरांत राज्यसत्तेचा धुमाकूळ आरंभित झाला. मन मानेल त्याला पकडावें, त्याची झडती घ्यावी, त्याचा छळ करावा आणि अखेरीस कांहीच निष्पन्न होत नाही असें पाहून त्याला सोडून द्यावें, असे प्रकार सरसहा घडूं लागले. खुनी मनुष्य शोधून काढण्यासाठीं सहस्रो रुपयांचीं बक्षिसें घोषित करण्यांत आलीं. परंतु राजसत्तेचा हा हिशेब सर्वस्वी चुकला. पारितोषिकांच्या विलोभनाला बळी पडून देशभक्तांचा विश्वासघात केला जाअील ही अधिकाऱ्यांची कल्पना फोल ठरली. त्यांना अेक गोष्ट माहीत नव्हती की, जेव्हा सारा देश किंवा त्या खंडप्राय देशाचा अेखादा भूभाग क्रांतीच्या अुंबरठ्याशीं अुभा असतो, तेव्हा फंदफितुरी, विश्वासघात या हीन गोष्टींची कांही काल कां होअीना, पण पीछेहाट होत असते. क्रांतिसूर्याच्या प्रखर तेजाने विश्वासघाताचें धुकें कोठल्या कोठे पळून जातें; आणि क्रांतीचें स्पष्ट दर्शन जगाला होत असतें. अशा परिस्थितींत सहस्रो रुपयांच्या पारितोषिकांना बळी पडून त्या क्रांतिकारकांचीं नांवें अुच्चारलीं जातील ही गोष्ट शक्य होती काय ?

परंतु दुसऱ्याच अेका विचित्र घटनेने या खुनाला वाचा फुटली !

ती घटना दि. ८ अेप्रिल १९२९ या दिवशीं घडून आली. दिल्ली येथे हिंदी पार्लमेंटामध्ये अनेक लोकविरोधी निर्बंध संमत करून घेण्याचें धोरण नोकरशाहीने आखलें. या गोष्टीचा भगतसिंगाला

मनस्वी संताप आला. पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असतांना देखील भगतसिंगाने बटुकेशर दत्त नांवाच्या आपल्या सहकाऱ्यासमवेत असेंब्लीच्या सभागृहांत प्रवेश मिळविला. त्या वेळीं सभागृहाचे अध्यक्ष पटेल हे 'पब्लिक सेफ्टी बिला'वर आपला अंतिम निर्णय घोषित करण्यासाठी अुभे राहिले होते. कुणालाहि कल्पना नसतांना अकस्मात प्रलयकालाच्या मेघनादाप्रमाणे बॉंबच्या आवाजाने सारें सभागृह दणाणून गेलें; आणि जिकडे तिकडे अेकच गोंधळ माजला. "कोण ? कोण ! धावा ! धरा ! पकडा " अित्यादि गर्भगळित आवाज सभागृहांत घुमूं लागले आणि ज्या दिशेने बॉंबचा आवाज आला होता त्या दिशेकडे साऱ्यांच्या नजरा धावल्या. परंतु जणुं कांही घडलेंच नाही, किंवा जें घडलें तें वास्तविक घडायलाच हवें होतें, अशा आवि-र्भावाने भगतसिंग नि दत्त हे गॅलरींत हसत अुभे होते. त्यांच्यावर पोलिसांनी झडप घातली; परंतु त्यांना थांबवून ते दोघे म्हणाले, "हीं घ्या आमचीं पिस्तुलें आणि आम्ही तर अिथे अुभेच आहोंत. पकडा आम्हांला !"

कोणत्याहि प्रकारचा प्रतिकार न करतां ते दोघे क्रांतिवीर पोलि-सांच्या स्वाधीन झाले.

बॉंब टाकतांना भगतसिंगाने सभागृहांत रक्त-पत्रकांचा पाअूस पाडला होता. त्या पत्रकांचा आशय पुढीलप्रमाणे होता.

"जगप्रसिद्ध क्रांतिकारक फ्रेंच हुतात्मा व्हिलान्ट याने अेकदा असे अुद्गार काढले आहेत की 'बधिर लोकांच्या कानांत आवाज शिरावा यास्तव खूप मोठ्यांदा ओरडावें लागतें.' या सार्थ अुक्तीचें सहाय्य घेअून आम्ही आमच्या या कृत्याचें सहज समर्थन करूं शकतों. असहाय्य हिंदी जनतेवर मन मानील ते निर्बंध तुम्ही लादीत आहांत. परमपूजनीय लालाजींचा खून पाडण्यास तुम्ही प्रवृत्त झालांत. या गोष्टींच्या निमित्ताने तुम्हांला अेक अिशारा आम्ही देअूं अिच्छितों. तो हा की, तुम्ही व्यक्ति नष्ट करण्यासाठीं

जरी अुद्युक्त झालांत तरी त्या योगाने तत्त्वें कधींहि नष्ट होणार नाहींत. व्यक्ति ही क्षणभंगूर असली तरी तत्त्वें हीं केवळ अमर होअूनच नांदतात. मोठमोठीं प्रचंड साम्राज्यें जमीनदोस्त होतात, पण तत्त्वें मात्र जिवंतच राहतात. बुर्बोन वंश नि झारशाही या जुलमी सत्ता धुळीस मिळाल्या आणि क्रांति मात्र चिरायु बनून त्यांच्या छाताडावर नाचली. मानवी जीवित आम्ही पवित्र मानतों. त्या मानवाला भविष्यकाळांत निश्चित प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्यांत सुखाने नांदतां येअील असा आमचा अुत्कट विश्वास आहे. आम्ही मानवाचें रक्त पवित्र मानतों. यासाठीच आम्हांला आज हें मानवी रक्त सांडावें लागत आहे. दुसऱ्याच्या श्रमावर माणसाने आपल्या सुखाचें मंदिर बांधूं नये यास्तव क्रांतीच्या पवित्र स्थंडिलावर आम्ही आपलें जीवित-पुष्प अर्पण करीत आहोंत. क्रांति चिरस्थायी होवो."

भगतसिंग नि बटुकेशर दत्त यांना पकडण्यांत आल्यानंतर दि. ४ जून १९२९ रोजी त्यांच्यावरील खटल्यास दिल्ली येथे प्रारंभ झाला. प्रथम फिर्यादीच्या वतीने बरेच साक्षीदार तपासण्यांत आले. त्यांनी बॉंब-स्फोटाची सारी हकीगत निवेदन केली. त्यानंतर दि. ६ जून १९२९ ला दोघां आरोपींनी पुढील आशयाची लेखी कैफियत सादर केली.

त्या कैफियतींत त्यांनी म्हटलें आहे, 'मुकी बिचारी कुणी हाका' अशी मजुरांची होत असलेली स्थिति पाहून आम्हांला अत्यंत वाअीट वाटलें. गव्हर्नर जनरलचे माजी लॉ-मेंबर अेस्. आर. दास यांनी आपल्या पुत्रास लिहिलेल्या अेका पत्रांत म्हटलें होतें की, "अिंग्रज माणसास आपल्या स्वप्नांतून जागें करण्यास बॉंबखेरीज अन्य अुपाय नाही." या त्यांच्या अुक्तीचें आम्हांला स्मरण झालें व ज्यांना आपलें अंतरीचें दुःख सांगण्यास अन्य साधन नाही अशांच्या वतीने निषेध करण्या-साठी म्हणून आम्ही बॉंब टाकले. गुरु गोविंदसिंह, शिवाजी महाराज, केमालपाशा, रेझाखान, वॉशिंग्टन, गॅरिबॉल्डि, फिफायट, लेनीन अित्यादि थोर पुरुषांच्या शिकवणी नि संदेश यांना अनुसरून आपल्या

देशांत क्रांतीचे पडघम निनादूं लागले आहेत. आपले डोळे अुघडे राखून नि कान मोकळे करून या नव्या क्रांतियुगाकडे परकीय सत्तेने नि त्या सत्तेच्या पाठीराख्यांनी बघावें नि तो क्रांतीचा घोष अैकावा अेवढ्याचसाठी केवळ आम्ही हा अुपक्रम केला. आमच्याप्रमाणेच अितरांचेंहि अंतःकरण जळत असलें पाहिजे. आता जरी वरकरणी देशांत शांतता दिसत असली तरी ती वादळापूर्वीची शांतता आहे. म्हणून भविष्यकालांतील धोक्याची केवळ सूचना देण्याचें काम आम्हीं केलें आहे व अहिंसेचें काल्पनिक राज्य संपलें हें सत्य या गोष्टीने आम्हीं स्पष्ट केलें आहे.

"या संबंधांत होअील ती शिक्षा भोगण्यास आम्ही सिद्ध आहोंत. परंतु साम्राज्यवाद्यांनी अेवढें मात्र ध्यानीं धरावें की, व्यक्ति नष्ट झाल्या तरी कल्पना कधीच नष्ट होत नसतात. आमच्यासारखीं दोन क्षुद्र माणसें मारल्याने राष्ट्रें चिरडलीं जाणार नाहीत असाच आजवरच्या अितिहासाचा दाखला आहे. असंख्य लोकांना पकडून बास्टाअिलसारखे तुरुंग भरले तरी त्याच तुरुंगांत पुनः पुन्हा क्रांतीचे शब्द नि प्रतिशब्द अुच्चारले गेले नि त्या शब्दांनी सारें आसमंत दणाणून सोडलें; आणि त्यांतूनच फ्रान्सच्या पदरांत क्रांतीचें यश पडलें. असंख्य क्रांतिवीरांच्या रक्तबिंदूंनी फाशीचे खांब रक्तलांछित झाले. सहस्रो क्रांतिवीरांचीं जीवनें सैबेरियाच्या खाणीवर खपत असतांना झिजून झिजून समाप्त झालीं. पण त्या योगाने रशियन राज्यक्रांति टळली नाही. आयर्लंडांत काय कमी रक्तपात झाला? ब्लॅक ॲन्ड टॅन्समुळे आयरिश स्वातंत्र्याची चळवळ मुळीच बंद पडली नाही. मग तुम्ही हिंदुस्थानांत कितीहि जुलमी निर्बंध संमत केले तरी त्यामुळे स्वातंत्र्याची ज्योत कधीहि मालवणार नाही. स्वातंत्र्याचा ज्वालामुखी जुलमी कायद्यांनी कसा विझेल? यासंबंधीं आम्हांला जें युक्त वाटलें तें कर्तव्य आम्हीं पार पाडलें.

"राज्यक्रांतीमध्ये व्यक्तीला कधीहि स्थान नसतें. केवळ बॉंब अगर

पिस्तुलें यांच्या योगानें क्रांति होणार नाही. प्रस्तुतचा राज्यकारभार केवळ अन्यायावर आधारलेला आहे. त्यांत मूलतः बदल झाला पाहिजे. कामकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळत नाही. त्यांचे जन्मसिद्ध अधिकारहि हिरावून घेतले गेले आहेत. धान्य पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचें कुटुंब अुपासमारीने मरत आहे. कोष्ट्यांच्या अंगावर पुरेसें वस्त्र नाही. मोठमोठे प्रासाद अुठविणाऱ्या कामकऱ्यांना चंद्रमौळी झोपड्यांत आपलें जीवन कंठावें लागत आहे. समाजांतील ही अनिष्ट विषमता समाजांत गोंधळ अुडविल्याविना कधीहि राहणार नाही. हा असंतोषाचा ज्वालामुखी आज बाहेरून थंड वाटला तरी त्याचा केव्हा तरी स्फोट हा होणारच हें विसरतां कामा नये. भांडवलशाही नष्ट होअून कामकऱ्यांची सत्ता प्रस्थापित झाली पाहिजे हें आमचें ध्येय आहे; व त्याचसाठी आम्ही ही धोक्याची सूचना मोठ्यांदा दिली. राज्यक्रांति हा मनुष्याचा अीश्वरदत्त हक्क आहे आणि स्वातंत्र्य हा मनुष्यमात्राचा अविनाशी असा जन्मसिद्ध हक्क आहे. कामकरी हा समाजाचा खरा आधारस्तंभ आहे व त्याची सत्ता हें आमचें अंतिम ध्येय आहे. त्यासाठी आमच्यावर कोसळतील तीं संकटें सोसण्यास आम्ही सिद्ध आहोंत. क्रांतीचा विजय असो ! ”

या बॉंब खटल्यांत दोन्ही आरोपींच्या वतीने बॅ. असफअली हे काम चालवीत होते. मॅजिस्ट्रेटने निर्णय देतांना दोघांवरहि ‘ असेंब्लींत प्राणघातक बॉंब फेकण्याचा आणि जवळ स्फोटक द्रव्यें बाळगण्याचा ’ असे दोन आरोप ठेवून दोघांस काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावली. ती शिक्षा अैकून दोघांपैकी कोणीहि कचरलें नाही. जणुं स्वागतार्थ अर्पण केलेली पुष्पमाला धारण करतांना जें समाधान नि जो अुत्साह मुद्रेवर व्यक्त व्हावा तसें समाधान नि तसा अुत्साह त्या दोघांच्याहि चेहेऱ्यावर दृग्गोचर होत होता.

परंतु अेवढ्या अल्प शिक्षेने काम भागण्यासारखें नव्हतें.

लाहोर येथील कट व सॉन्डर्सचा खून या प्रकरणांत पकडलेल्या

आरोपींवरील खटल्यास दि. १० जुलै १९२९ रोजीं लाहोरच्या सेंट्रल जेलमध्ये प्रारंभ झाला. या खटल्यांतील माफीचा साक्षीदार जयगोपाल याच्या साक्षींत सॉन्डर्सच्या खुनांत भगतसिंगाचा संबंध होता अशी माहिती बाहेर आल्यामुळे या खटल्यांत भगतसिंगालाहि अडकविण्यांत आलें. एकूण ३३ आरोपींवर हा खटला भरण्यांत आला. रायसाहेब पंडित श्रीकृष्ण नांवाच्या खास न्यायाधिशासमोर १९२९ च्या जुलै महिन्यांत या खटल्याला प्रारंभ झाला. हा खटला सुरू असतांना तुरुंगाच्या परिसरांत पोलिसांनी फारच कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. आरोपींना जेव्हा कोर्टासमोर आणण्यांत आलें तेव्हा त्यांना बघून रस्त्यावरील असंख्य लोकांनी "क्रांति चिरायु होवो!" या जयजयकारानें आरोपींचें स्वागत केलें. आरोपींनीहि त्याच घोषणेने प्रत्युत्तर दिलें. आरोपींच्या नातलगांशीं नि वकीलांशींहि पोलीस नीट वागत नाहीत अशी तक्रार कोर्टापुढे आणण्यांत आली. अेका पोलिसाने आपणास शिव्या दिल्या, त्याचा बंदोबस्त कोर्टानें न केल्यास आपणास कायदा हातीं घ्यावा लागेल, असें प्रेमदत्त नांवाच्या अेका आरोपीनें कोर्टाला स्पष्टपणे बजावलें.

आरोपींच्या वतीनें लाला दुनीचंद, अमोलकराम नि पूरनचंद अित्यादि वकिलांनी कामें चालविलीं. आरोपींपैकी बरेचजण माफीचे साक्षीदार बनले.

नंतर सरकाराच्या वतीने मि. गॉर्डन नॉड यांनी फिर्याद मांडली. तींत बादशहाची सत्ता अुलथून पाडण्यासाठीं कटवाल्या आरोपींनी केलेले प्रकार सांगितले.

अशा तऱ्हेने लाहोर कटाच्या या खटल्यास प्रारंभ झाला; परंतु मध्यंतरीं अेक अनपेक्षित प्रकार घडला आणि या खटल्याची गति अेकदम कुंठित झाल्यासारखी झाली.

हिंदी तुरुंगांत सर्वसाधारण युरोपियन कैद्यांना ज्याप्रमाणे वागविण्यांत येतें त्याप्रमाणे आपणांस वागविलें पाहिजे अशी मागणी

करून त्या मागणीचा स्वीकार होईपर्यंत या खटल्यांतील अनेक बंद्यांनी अन्नत्याग केला, त्यामुळे सरकार पेचांत पडलें. या अन्नत्यागामुळे भगतसिंगप्रभृति आरोपी अितके अशक्त झाले होते की, कोर्टांत येण्याची शक्तीहि त्यांच्या अंगांत शिल्लक अुरली नव्हती. आरोपींच्या अनुपस्थितींत खटला चालविण्यास कोर्टाला अधिकार मिळावा अशा आशयाचे प्रयत्नहि लोकपक्षाच्या जोरदार विरोधामुळे धुळीस मिळाले. अन्नत्याग हा अपराध ठरविणारें 'हंगर स्ट्राअिक' नांवाचें अेक बिलहि संमत करून घेण्याचा प्रयत्न झाला. त्या बिलाप्रमाणे तुरुंगाधिकाऱ्यांना असा अधिकार प्राप्त होणार होता की कोणा बंद्याने अन्नत्याग केल्यास त्याला बळजबरीने अन्न अगर अितर पदार्थ खाअू घालतां यावेत.

परंतु सरकाराचा हा डाव सपशेल फसला. खटला तर पुढे सुरू होअीना आणि सत्याग्रहींचा अुत्साहहि मावळेना. दीड महिन्याच्या अन्नत्यागानंतर भगतसिंगाचा अुत्साह किती दुर्दमनीय होता या गोष्टीचें पुढील वर्णन अेका तत्कालीन वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालें आहे.

"दीड महिन्याच्या अन्नत्यागानंतर भगतसिंगाच्या खांद्याला आधार देअून त्याला तुरुंग-न्यायालयांत आणण्यांत आलें. त्या वेळीं सर्व आरोपींनी 'क्रांतीचा जयजयकार असो; साम्राज्यवाद नष्ट होवो!' अशा गगनभेदी गर्जना करून त्याला अुभे राहून वंदना दिली. त्याच्या मुद्रेवर त्याहि स्थितींत अेक अजब तेज व चालीत अैटदार मस्ती दिसत होती. लाल शर्ट, कोट व पायजमा अशा पोषाखांतहि तो अेखाद्या सुंदर नवरदेवासारखा दिसत होता. तो अेका आरामखुर्चीवर बेपर्वाअीने बसला होता व आपल्या सोबत्यांबरोबर गप्पा मारण्यांत दंग होता. सांसारिक बंधनांपासून मुक्त असलेल्या महद्व्यक्तीच्या मुखावरील आकर्षण, बेडर माणसाच्या वाणींतील रस आणि जगत्प्रेमी गृहस्थाच्या नेत्रांतील अुन्माद यांचें त्याच्या ठिकाणीं पूर्ण वास्तव्य होतें."

या अुताऱ्यावरून भगतसिंगाच्या अंतःकरणांत असलेल्या दुर्दम-

नीय अुत्साहाची कल्पना येअील. या अन्नत्याग प्रकरणामुळे सरकार नि क्रांतिकारक यांच्या दरम्यान जणुं अेक प्रकारचा नवीनच संग्राम आरंभित झालेला होता; आणि कोणताच पक्ष आता मागे सरकणार नव्हता.

आणि अशांतच अेक भीषण घटना घडून आली. ६२ दिवसांच्या अन्नत्यागानंतर या खटल्यांतील अेक आरोपी जतींद्रनाथ दास अखेरीस अेका शुक्रवारीं दोन प्रहरीं दीड वाजतां अिहलोक सोडून निघून गेला. आपल्या हातांतील सारीं शस्त्रास्त्रें शत्रुपक्षाने भेदून टाकल्यानंतर केवळ रथचक्राच्या सहाय्याने लढणारा वीर अभिमन्यु ज्याप्रमाणे लढतां लढतां रणांत पतन पावला त्याप्रमाणे या जतींद्राची अखेरीस अवस्था झाली. रणांत सन्मुख असतांना धारातीर्थी पतन पावणाऱ्या वीरांना जसा स्वर्गलोक प्राप्त होतो तसा तो या आधुनिक अभिमन्युलाहि खास प्राप्त झाला असेल.

परंतु या प्रकारामुळे भगतसिंगाला मात्र मनस्वी दुःख झालें. रणांगणावर युद्ध अैन रंगांत आलें असतांना आपला अेखादा निष्ठावंत सहकारी अकल्पितपणाने सांडावा त्याप्रमाणे त्याची परिस्थिति झाली होती. त्यानंतर तत्कालीन व्हाअिसरॉय लॉर्ड अॉर्विन यांनी दिनांक १ मे १९३० ला दुसरा वटहुकूम काढला. आरोपींच्या अनुपस्थितींतहि खटला चालविण्याचा अधिकार लाहोर हायकोर्टाच्या खास न्यायाधीश मंडळाला या हुकुमान्वये बहाल करण्यांत आला!

अशा आडमार्गाने जेव्हा खटला पुन्हा प्रारंभित झाला, तेव्हा आपला बचाव करण्याची अिच्छा भगतसिंगाच्या अंतःकरणांतून पार मावळून गेली होती. त्याचे वडील सरदार किशनसिंग यांनी त्याला आपला बचाव करण्याबद्दल जेव्हा सुचविलें, तेव्हा मोठ्या कडक शब्दांत त्याने आपल्या पित्याची निर्भर्त्सना केली. त्या बाबतींत आपल्या पित्याला लिहिलेल्या पत्रांत भगतसिंगाने म्हटलें आहे, "माझा बचाव करण्याची मनीषा मी कधीहि बाळगलेली नाही. तसा

विचारहि माझ्या अंतःकरणाला कधी शिवलेला नाही. माझ्यावर कितीहि भयानक आरोप लादले गेले तरी त्या गोष्टीकडे लक्ष देखील द्यावयाचें नाही, असें धोरण मी प्रथमपासूनच आखलें आहे. अेवढेंच नव्हे तर माझें असें स्पष्ट मत आहे की, राजकारणाच्या आखाड्यांत अुतरणाऱ्या प्रत्येक माणसाने दंडविधानाकडे नि न्यायासनाकडे आपली पाठच फिरवून बसलें पाहिजे."

अखेरपर्यंत आपल्या बचावासाठी त्याने अेक अक्षरहि अुच्चारलें नाही. दिनांक ७ ऑक्टोबर १९३० रोजीं न्या. हिल्टन, अबदुल कादर व टॅप या तिघांच्या खास न्यायमंडळाने या अभूतपूर्व खटल्याचा निर्णय घोषित केला. अेकूण पंधरा आरोपींचा निर्णय देण्यांत आला. अुरलेल्यांपैकी पांच आरोपी अखेरपर्यंत फरारीच राहिले. अेकाचा विचार करण्यांत आला नाही. दोघांना सोडून देण्यांत आलें. बटुकेश्वर दत्तावरील खटला काढून घेण्यांत आला. पुढे आलेल्या पुराव्यावरून न्यायमूर्तींचें असें मत बनलें की, हा कट म्हणजे बॉंब करून, खून पाडून आणि दरोडे घालून बादशहाविरुद्ध युद्ध पुकारण्याच्या स्वरूपाचा होता आणि त्यांत पंजाबपासून बिहारपर्यंत गुप्त मंडळ्यांचा समावेश करण्यांत आला होता. भगतसिंगाबद्दल न्यायमूर्तींनी पुढील गोष्टी नमूद केलेल्या आहेत.

सप्टेंबर १९२८ मध्ये दिल्ली येथे जो क्रांतिपक्ष अुत्पन्न झाला त्याचें जनकत्व भगतसिंगाकडे होतें. त्यापूर्वीहि त्याने क्रांतिकारक चळवळी केल्या होत्या. पंजाब शाखेचा तो अेक कार्यकर्ता होता. पंजाबपासून कलकत्त्यापर्यंतच्या क्रांतिपक्षाच्या शाखांचे संबंध जोडण्याचें काम त्याच्याकडे होतें, आणि त्यासाठी तो अेकसारखा प्रवास करीत होता. पंजाब नॅशनल बॅंक लुटणें व सॉन्डर्सचा खून करणें, यांत त्याचा हात होता. जे. एन्. दास यांनी क्रांतिकारकांना बॉंबची कृति शिकवावी म्हणून यानेच पत्रव्यवहार केला. आग्रा येथे बॉंब करणें, जोगेंद्रचंद्र चतर्जींची मुक्तता करणें, झांशीच्या प्रवासांत बॉंबची तपासणी करणें

आणि असेंब्लींत बॉंब फेकणें या अत्याचारांत त्याने साक्षात् भाग घेतला होता. साक्षीदार, माफीवाले व भगतसिंगाच्या हस्ताक्षराचें पत्रक या तीन प्रकारांच्या पुराव्यावरून भगतसिंगाने सॉन्डर्सचा खून केला असें ठरतें. त्या कृत्याबद्दल त्याने मोठी प्रौढी मिरविली असेंहि माफीच्या साक्षीदारांनी सांगितलें. हे सर्व आरोप शाबीत धरून भगतसिंगाला देहान्त शिक्षा देण्यांत आली.

परंतु याहि वेळीं तो मुळीच कचरला नाही. त्याचें धैर्य मुळीच विचलित झालें नाही. खटल्याच्या निर्णयासंबंधी तो अितका बेफिकीर होता की तो निर्णय अैकण्यासाठी न्यायालयांत जाण्याचेंहि त्याने नाकारलें. आणि आपल्या जीविताविषयीची ही त्याची बेफिकीर वृत्ति त्याने अखेरपर्यंत कायम ठेवली. आपलें पवित्र कर्तव्य ज्या दिवशीं त्याने पार पाडलें त्याच दिवशीं जणुं त्याने आपली जीवनगंगा पंचमहाभूतांत विलीन केली.

या खटल्यांतील क्रांतिकारकांना झालेली देहदंडाची शिक्षा अैकून साऱ्या देशाला दुःखाचा हादरा बसला. त्यांचा मृत्यु टळावा म्हणून त्यांच्या वतीने देशांतील कानाकोपऱ्यांत देखील प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यांत आली. अखेरीस भगतसिंग प्रभृतींनी व्हाअिसरॉयांकडे दयेचा अर्ज करावा असेंहि त्यांना सुचविण्यांत आलें. परंतु दया मागण्याचें त्यांनी साफ नाकारलें. “ दया मागायला आम्ही काय चोर आहोंत, डाकू आहोंत का मवाली आहोंत ? आम्ही स्वातंत्र्ययुद्धांतील राजकीय कैदी आहोंत ! ” असें त्यांनी सरकाराला स्पष्टपणाने बजावलें. शत्रूने गिळंकृत केलेलें स्वातंत्र्याचें माणिक शोधून काढण्यासाठी संकटांच्या अथांग सागरांत या क्रांतिकारकांनी बुद्धिपुरस्सर अुडी टाकली होती, ती कांही जीव बचावण्याच्या अुद्देशाने खचित टाकलेली नव्हती. अेक तर यशप्राप्ति, नाही तर देहार्पण, या दोनच गोष्टी त्यांना माहीत होत्या. ते खऱ्या अर्थाने देशभक्त होते. केवळ देहभक्त नव्हते. स्वदेहापेक्षा स्वदेशावर त्यांचें अधिक प्रेम होतें.

अेवढ्यावरच त्या क्रांतिकारकांचें श्रेष्ठत्व थांबलें नव्हतें. त्यांनी त्याहीपुढे जाअून सरकाराला असेंहि विनविलें की, "वधस्तंभाच्या मंचकावर चढण्याची गोष्टहि आम्ही पसंत करीत नाही. आम्ही शूर वीर आहोंत. तेव्हा आमचा वीरोचित सन्मान करण्यासाठी आम्हांला गोळ्या घालून अगर अेखाद्या तोफेच्या तोंडासमोर अुभे करून ठार मारा. राजकीय स्वातंत्र्याचे नैसर्गिक अधिकार प्राप्त करून घेअू अिच्छिणाऱ्या क्रांतिकारकांना फांसावर टांगल्याचें अेकहि अुदाहरण जगाच्या अितिहासांत आजवर अुपलब्ध झालेलें नाही. यास्तव आम्हांला काळ्या पाण्यावर पाठविण्यापेक्षा तुमचे सैनिक कारागृहांत पाठवा नि आमच्यावर खुशाल गोळ्या झाडा. त्या गोळ्यांना अेखाद्या पुष्पमालेप्रमाणे आम्ही आमच्या अंतःकरणावर धारण करूं आणि स्वखुषीने मृत्यूला आलिंगन देअूं. फांशीसारख्या फुसक्या शिक्षेची याचना करतो कोण ? आम्हां वीरांना तसली शिक्षा खचित शोभणार नाही !"

आपल्या लहान भावास पाठविलेल्या पत्रांत देखील त्याने आपल्या देहाबद्दल हीच तुच्छता-वृत्ति दर्शविली आहे. त्या पत्राच्या अखेरीस भगतसिंगाने आपल्या देहाची जणुं लेखणी करून सांडलेल्या रक्ताच्या शाअींत ती बुडवून लिहिलें आहे, "बंधूंनो, माझा अखेरचा प्रणाम. अरुणोदय होत असतांना आपलें पवित्र कर्तव्य बजावून प्रभातींच्या अुगवत्या किरणांत विलीन पावणाऱ्या ताऱ्याचें भाग्य मला लाभलें आहे. क्रांतीची ठिणगी पाडण्यासाठी आम्ही आमचे देह अडचणींच्या लोहावर आपटले, त्याबद्दल केव्हाहि आम्हांला अभिमानच वाटतो. आता वधमंचकावर आरूढ होतांना मला मुळीच विषाद वाटणार नाही."

या थोर क्रांतिकारकांचा जीव वाचावा यासाठी लोकांनी मात्र अखेरपर्यंत प्रयत्न करण्याचे सोडलें नाही. दि. २३ मार्च १९३१ रोजीं आरोपींचे वकील रा. ब. बद्रीदास यांनी प्रीव्ही कौन्सिलकडे

अर्ज करण्यास अनुज्ञा असावी अशाबद्दल लाहोर हायकोर्टाकडे पुन्हा अर्ज केला. न्यायमूर्ति भिडे यांनी हा अर्ज आपल्यापुढे चालविण्याचें नाकारल्याकारणाने सर ॲलन ब्रॉग्वे व मि. जॉन्सन यांजपुढे अर्जाची सुनावणी झाली. या अर्जाचा आजच्या आज निर्णय झाला पाहिजे अशी स्थानिक सरकाराची सूचना असल्याचें नैर्बंधिक सल्लागाराने कोर्टाच्या नजरेस आणलें. तेव्हा अर्जाची सुनावणी त्वरित आरंभित झाली. न्याय-मूर्तींनी अर्ज फेटाळून लावला आणि फाशीची शिक्षा कायम केली !

ही वार्ता कानीं पडतांच लाहोरमध्ये अस्वस्थता अुत्पन्न होअून शहरांतील सर्व व्यवहार बंद पडले. सर्वत्र औदासिन्याची छाया पसरली. सरकारानेहि शहरांत जागोजागीं पोलिसांचे पहारे बसवून बंदोबस्त केला.

दिनांक २३ मार्च १९३१ रोजीं हें घात-कृत्य पार पाडण्याचें सरकारी अधिकाऱ्यांनी निश्चित केलें. त्या वीरवरांचा तसल्या प्रकारचा भीषण मृत्यु अवलोकन करणें देखील आपल्याला शक्य होणार नाही या दुःखद जाणिवेने भगवान् सूर्यनारायणाने क्षणभर पश्चिम क्षितिजा-वर थबकून त्या श्रेष्ठ पुरुषांचें अखेरचें दर्शन घेतलें आणि त्यांना अुद्देशून आपला अखेरचा आशीर्वाद अुच्चारून तोहि अस्ताचलीं निघून गेला. मग सारी धरित्री काळी ठिक्कर पडली. कारण तिच्याच साक्षीने आता तें खुनी-कृत्य पार पडणार होतें. त्यामुळेच की काय शरमेने ती कृष्णवर्णा बनली. जिकडे तिकडे भीषण शांतता पसरली होती. जणु सारें चराचर विश्व अेकप्रकारच्या भीतीने गांगरून गेलें होतें. तुरुंगांत जिकडे तिकडे कडक बंदोबस्त दिसूं लागला. साफसुफी सुरू झाली. अितर सर्व बंद्यांचीं जेवणें रोजच्यापेक्षा जरा लवकरच आटोपण्यांत आलीं. अितक्यांत ‘ अिन्किलाब जिंदाबाद ! ’ या गगनभेदी गर्जनेने तें सारें कारागृह दणाणून गेलें. सर्व बंद्यांचें लक्ष त्या आरोपींकडे गेलें. समोर बघतात तों सरदार भगतसिंग धीरोदत्त पावलें टाकीत हसतमुखाने अधिकाऱ्यांच्या

गराड्यांतून वधमंचकाकडे जातांना त्यांना दिसला. त्यांचें काळीज चरकलें. अेका क्षणांत सर्व प्रकार त्यांच्या लक्षांत आला. अंतःस्फूर्तीने त्यांच्या मुखांतून शब्द निघूं लागले, 'अिन्किलाब जिंदाबाद!' भगतसिंगाने पुन्हा त्या आरोळ्यांना प्रत्युत्तर दिलें. क्षणांत सारें कारागृह त्याच अेका आरोळीने दुमदुमून गेलें. तेथील साऱ्या लोकांच्या अितर साऱ्या वृत्ति जणु बधिर होअून गेल्या आणि अंतः-करणाच्या विशाल दरींतून त्या क्रांतिघोषणेचा अेकच अेक निनाद घुमूं लागला. कोठडींतून वधस्तंभाकडे नेत असतां भगतसिंगाने मॅजि-स्ट्रेटचें अभिनंदन करून म्हटलें, "मॅजिस्ट्रेटसाहेब, तुम्ही व तुमचे सहकारी खरोखर फारच भाग्यवान् आहांत. कारण स्वातंत्र्ययुद्धां-तील शूर सैनिक मृत्यूला कसे बेदरकारपणाने कवटाळतात हें आम्ही आज आपणांस दाखविणार आहोंत!"

आणि खरोखरच त्याने आपले हे शब्द खरे करून दाखविले. जिवंत कोणी राहावें याबद्दल या पृथ्वीवर अनेक कलह आजवर निर्माण झालेले आहेत; आणि त्या साऱ्या कलहांना अर्थातच जीवन-कलह असें अभिधान आपोआपच प्राप्त झालेलें आहे. परंतु त्या दिवशींच्या भीषण रात्रीं वधमंचकावर अेक निराळेंच दृश्य जगाला दिसलें. त्या अुज्ज्वल दृश्याचें तेज अितकें प्रखर होतें की, त्या तेजाने अंधकारांत व्यापृत झालेल्या दशदिशा अुजाळल्या. वधमंचकावर चढल्यानंतर प्रथम कोणी फासावर जावें याविषयी त्या तिघांच्यामध्ये प्रेमकलह सुरू झाला. अखेरीस प्रथम सुखदेवाने, नंतर भगतसिंगाने नि शेवटीं राजगुरूने फासावर जावें अशा तऱ्हेची तडजोड झाली. जीवनाचे प्रश्न जसे तडजोडीने मिटतात तसे मृत्यूचेंहि प्रश्न तडजोडीने मिटूं शकतात हीहि गोष्ट त्या दिवशीं सिद्ध झाली!

फासाची दोरी तिघांच्या गळ्याला अडकली. तरीहि त्यांची मनःशांति ढळली नाही. अुलट या अैहिक दास्ययुक्त बंधनांतून मुक्त

करणाऱ्या त्या दोरीचें त्या तिघांनी मोठ्या प्रेमानें चुंबन घेतलें. कांही वेळानें ती दोरी आवळली जाणार होती; आणि त्यांच्या साऱ्या ऐहिक गोष्टींना कायमची गांठ बांधली जाणार होती. ज्या स्वर्गामध्ये मृत्यु नाही, जिथे दास्य नाही, जिथे जुलूमजबरदस्ती नाही, जिथे स्वातंत्र्याचें सुराज्य, स्वाराज्य, निरपवादपणानें नांदत आहे अशा ठिकाणीं त्या तिघांना जावयाचें होतें. आपल्या बलिदानानें आपली प्रिय मातृभूमि दास्यमुक्त होईल असा दृढ विश्वास त्यांच्या अंतःकरणांत त्याहि वेळीं वसत होता. यथावकाश फासाच्या दोऱ्या आवळल्या गेल्या, आणि सगुणाची ती साकार त्रिमूर्ति एका क्षणांत निर्गुणनिराकार अशी बनून गेली. त्यांचें पार्थिव रक्त मात्र फाशीच्या स्तंभावर सांडलें नि त्याच वेळीं अुभ्या देशाच्या डोळ्यांतून दुःखाचे अश्रू ओसंडले.

लालाजींच्या वधाचा केवळ प्रतिशोध म्हणून या क्रांतिकारकांनी हें खूनकृत्य केलें; आणि विचित्र योगायोग असा कीं, त्या लालाजींच्या निधनस्थानींच, – फेरोजपूरच्या सतलज नदीच्या पवित्र तीरीं या तीन क्रांतिवीरांचा अंत्यविधि सरकारी रीत्या घाईघाईनें अुरकण्यांत आला.

कौरवकुलाच्या नाशानें पावन झालेल्या कुरु क्षेत्रानजिक ज्या परमपवित्र सिंधु नदीच्या तीरीं आर्यांनी आपली पहिली मुहूर्तमेढ रोवली त्या नदीच्या आसमंतात् नि गुरुगोविंदसिंहांच्या पवित्र भूमीवरं या तिघां क्रांतिकारांनी आपला अखेरचा श्वास घेतला. या ठिकाणीं हें पर्व समाप्त झालें. परंतु असें म्हणणें कितपत युक्त ठरेल ! असल्या अैतिहासिक घटना त्या त्या वेळेपुरत्याच घडून नंतर संपणें शक्य आहे काय !

या प्रश्नाचें अुत्तर अगदीं सोपें आहे. 'जेव्हा जेव्हा धर्माची ग्लानि होते नि अधर्माचें प्राबल्य माजतें तेव्हा तेव्हा मी अवतार घेत असतों. साधूंच्या संरक्षणार्थ आणि दुष्टांना निर्दाळण्यासाठी युगायुगाच्या ठिकाणीं मी जन्म घेत असतों, ' अशी स्पष्ट घोषणा श्रीकृष्णानें करून ठेवलेली

आहे. श्रीकृष्णाच्या निर्याणानंतर श्रीकृष्णपर्व कधीहि समाप्त झालेलें नाही. भगतसिंगाचा पुनर्जन्मावर मुळीच विश्वास नसतांना देखील त्यानेंहि अशीच घोषणा केल्याचें अैकिवांत आहे की, पुन्हा याच नातेच्या पोटीं नअू महिन्यांच्या कालावधीनंतर मी जन्म पावेन आणि पुन्हा मी याच पवित्र राष्ट्रकार्यार्थ अुभा ठाकेन.

भगतसिंगाची ही घोषणा खरी ठरली असेल किंवा नसेल. तो ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न आहे; परंतु अेक गोष्ट मात्र निश्चित; ती ही की, या तिघां क्रांतिकारकांना फाशी देअून राजसत्तेने कांहीहि साधलें नाही. कारण भगतसिंगाची ही दिव्य वाणी अेका निराळ्याच अर्थाने खरी होती. भगतसिंगासारखे जे हुतात्मे असतात त्यांचा स्वातंत्र्य-युद्धांत लढतां लढतां पार्थिव देह जरी नष्ट झाला तरी त्यांचा आत्मा मात्र देशस्वातंत्र्याच्या भोवतीं सदैव भ्रमण करीत राहतो आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच अशा आत्म्यांना मुक्ति मिळत असते. फिनिक्स नांवाच्या पक्ष्याची अेक गोष्ट सांगतात. तो पक्षी मृत झाला म्हणजे त्याच्या रक्षेंतूनच दुसरा तसलाच पक्षी निर्माण होतो. त्याचप्रमाणे भगतसिंगांसारखे अनेक क्रांतिवीर नष्ट झाले तरी त्यांच्या पवित्र रक्षेंतूनच दुसरे अनेक क्रांतिवीर निर्माण होतात आणि स्वातंत्र्य-प्राप्तीसाठी शत्रूविरुद्ध दुप्पट अुत्साहाने रणांत अुभे ठाकतात.

मग भगतसिंगप्रभृतींना त्या दिवशीं फांशी दिलें त्याचा अुपयोग काय !

लेखनकाल :
२०।९।५८ ते २९।९

7832
REFBK-0007632

# भा. द. खेर यांचें वाङ्मय

## प्र-का-शि-त

### कादंबऱ्या

- विजय
- सुखाचा लपंडाव
- प्रायश्चित्त
- क्रांतीच्या वाटेवर
- शुभांगी
- शुभमंगल
- गुलाबाचं फूल

### कथासंग्रह

- मादळहुरी
- ऐतिहासिक गुजगोष्टी

### इतर

- क्रांतिकारक खटले

## आ-गा-मी

### अयोध्या

रामायणावर आधारलेली हृदयंगम कादंबरी

### स्वातंत्र्यवीर

स्वा. सावरकरांच्या अद्भुतरम्य जीवनावर लिहिलेली रोमांचकारी कादंबरी

## संदर्भ-ग्रंथ


### वीराग्रणी तात्या टोपे

( १ ) सेनापति तात्या टोपे – डॉ. ना. दा. सावरकर ( २ ) १८५७ चें स्वातंत्र्य-समर – बॅ. वि. दा. सावरकर ( ३ ) शमीपूजन – श्री. का. न. केळकर ( ४ ) मॅलेसनचा अितिहास ( ५ ) सन १८५७ – प्रो. ना. के. बेहेरे.

### आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत

( १ ) वा. ब. फडके-चरित्र – वि. श्री. जोशी ( २ ) श्री. खोरवणकर यांनी लिहिलेले चरित्र ( ३ ) मुंबअी गॅझेट ( ४ ) अैतिहासिक गुजगोष्टी – भा. द. खेर.

### योगी अरविंदबाबू घोष

( १ ) योगी अरविंद घोष – पु. बा. कुलकर्णी ( २ ) The Alipoor Bomb Trial – Bejoy Krishna Bose ( ३ ) स्फुट लेख ( ४ ) केसरी फाअील.

### मृत्युंजय दामोदर हरी चाफेकर

( १ ) लो. टिळक यांचें चरित्रखंड १ – न. चिं. केळकर ( २ ) स्वा. सावरकर चरित्र – शि. ल. करंदीकर ( ३ ) चरित्र-कोश ( ४ ) स्फुट लेख ( ५ ) केसरी फाअील १८९७, १८९८.

### हुतात्मा मदनलाल धिंग्रा

( १ ) स्वा. सावरकर-चरित्र – शि. ल. करंदीकर ( २ ) सावरकरांचे सहकारी – शि. ल. करंदीकर ( ३ ) लंडनचीं बातमीपत्रें – बॅ. वि. दा. सावरकर ( ४ ) केसरी फाअील १९०९.

### स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

( १ ) स्वा. सावरकर-चरित्र – शि. ल. करंदीकर ( २ ) Life of Barrister Savarkar – Chitra Gupta ( ३ ) केसरी फाअील १९१०, १९११ ( ४ ) मॅझिनी – स्वा. सावरकर.

### सरदार भगतसिंग

( १ ) सरदार भगतसिंग – चं. ह. पळणिटकर ( २ ) १८५७ चें स्वातंत्र्य-समर – स्वा. सावरकर ( ३ ) मॅझिनीची प्रस्तावना – स्वा. सावरकर ( ४ ) Famous and Historical Trials – K. L. Gauba ( ५ ) केसरी फाअील १९२८, १९२९, १९३०, १९३१ ( ६ ) साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांची व्याख्यानें.